म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२५६

मुकुंदराजांची अंबानगरी कोणती ?

★

लेखक :

विश्वेश्वर अंबादास कानोले

★

REFBK-0011476

तिहाससंशोधन मंडळ,' नांदेड
तिहास व वाङ्मयसंशोधन मंडळ)

एकमेव विक्रेते:
मॉडर्न बुक एजन्सी, नांदेड.

मुकुंदराजांची अंबानगरी कोणती?

(स्वीय प्रकाशन पहिलें)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३९६६ वि: १७.८.६५
क्रमांक १३५५ नों: दि: २८।१०।
लेखक :
विश्वेश्वर अंबादास कानोले
म. ग्रं. संग्रहालय ठाणे
वा. क्र. १९४०६
मूल्य : रु. १.५० न. पै.
REFBK-0011476

गोदातीर इतिहाससंशोधन मंडळ, नांदेड.

प्रकाशक :

वि. अं. कानोले,
चिटणीस, गोदातीर
इतिहाससंशोधन मंडळ,
नांदेड.

★

आवृत्ति पहिली
१९६१
मूल्य १।। रु.

★

मुद्रक :

जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
सराफा,
औरंगाबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१५६८ विः १२१५
क्रमांक ७३५८ नोंः दिः २६-८-५

निवेदन

१९४० च्या पूर्वी एक-दोन वर्षे आधीं योगेश्वरी विद्यालयाच्या वार्षिक समारंभाच्या निमित्तानें मी अंबेजोगाईस प्रथमच गेलों होतों. माझ्या इतिहाससंशोधनाला गुरुवर्य दत्तोपंत पोतदार यांच्या आशीर्वादानें त्या वेळीं थोडाफार आरंभ झालेला होता. इतिहासप्रसिद्ध अंबेजोगाईच्या सर्व प्राचीन स्थलांचें दर्शन घेतांना आदिकवि मुकुंदराजांच्या समाधीचेंहि दर्शन घडलें व मन भक्तिभावानें भरून गेलें. परंपरागत आख्यायिकेप्रमाणें, संतबचनप्रमाणानें व स्मृतिचिन्हानें मुकुंदराज जोगाई–अंब्याचे असाबेत अशी खात्री झाली; व त्यामुळें स्थल–निर्णयाच्या प्रश्नाकडे मी जोरानें खेचला गेलों. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या १८३७ च्या लेखामुळें याबाबतींत परिवर्तन झालेलें होतें. त्यांनी बैनगंगेच्या आधारें मुकुंदराजांना नागपूरजबळील अंभोरें येथील ठरबलें व त्यांच्या मतांचा अनुवाद भावे–पांगारकरांनी केला. मुकुंदराज, रामचंद्र, हरिनाथ, मुकुंदराजी परंपरेचे मठ व राजा जैत्रपाळ हे सारेच अंभोरच्या आसपास जखडून टाकले गेले. या वेळीं अजून डोळके, बोबडे, ढोक आदि प्रादेशिक अभिमानानें भारलेली मंडळी पुढें आलेली नव्हती. माझ्या पद्धतीप्रमाणें मी स्थल–निर्णयाच्या बाबत खुद्द मुकुंदराजांचें मार्गदर्शन शोधूं लागलों. या बादांत योगेश्वरीमाहात्म्य हा ग्रंथ निर्णायक महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचा आणि बिबेकसिंधूतील

'तेथिचा महिमा भविष्योत्तर पुराणीं' या वचनाचा सांधा सर्वप्रथम आम्ही जोडला. बादांत नडणारा वैनगंगेचा प्रश्न 'गौतमीमाहात्म्या'च्या आधारें आणि 'योगेश्वरीमाहात्म्या'च्या आधारें आम्ही सोडवून दाखवला व मूळ पाठ 'वाणी' गंगा असावा हें मत नोंदविलें. या विषयावरील माझें लिखाण 'मराठवाडा गद्य विहार' व 'सह्याद्रि' यांतून संशोधकांपुढें आलें, पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. जुन्या मुद्द्यांना नवे आग्रह व संशयास्पद असे नवे पुरावे सतत जोडले गेले. प्रस्तुत लेखकाचा स्वभाव सतत लिहिण्याचा नाहीं; त्यामुळें जणूं काय आम्ही पराभूत होऊन गप्प बसलों असाहि भास निर्माण झाला. यामुळें पुन्हां एकदां १९५५ सालीं आम्ही आमचीं मतें विस्तारानें मांडलीं, पण त्याचाहि परिणाम झाला नाहीं. शेवटीं हा बाद या पुस्तिकेच्या रूपानें शक्य तों साधार व सविस्तर संशोधकांच्या सेवेंत सादर केलेला आहे. याबरून मुकुंदराज, त्यांची शिष्यपरंपरा, गुरुपरंपरा, स्थलनिर्णय यांविषयीं पुष्कळशी माहिती वाचकांच्या पुढें येईल; आणि मुकुंदराज हे अंबेजोगाईचेच होते, याविषयीं वाचकांची खात्री होईल असा विश्वास वाटतो.

आमचे आदरणीय मित्र संशोधक, प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ माननीय कृ. पां. कुळकर्णी यांच्याबर या पुस्तिकेंत जागोजागीं कठोर हल्ला आढळेल. वस्तुतः त्यांनी परिश्रमपूर्वक विवेकसिंधूची जी चिकित्सक आवृत्ति सिद्ध केलेली आहे; ती मराठी भाषेचें एक लेणें व्हावें या योग्यतेची आहे. विवेकसिंधूच्या प्राचीनत्वाचा त्यांनी दिलेला व्याकरणिक पुरावा सदर ग्रंथांत प्रक्षेपक भागांची जी वाढ झाली त्याचें त्यांनी केलेलें दिग्दर्शन, त्यांनी सिद्ध केलेला पोथ्यांचा वंशवृक्ष, हे सारेच मराठी ग्रंथांच्यासाठीं जबळ जबळ अपूर्व आहेत. वस्तुतः अंभोरचा वाद त्यांनी आपल्या गळीं

अडकवून घ्यावयास नको होता. आमच्या पाहण्यांत अंभोर पक्षाची जास्तींत जास्त चांगली मांडणी त्यांची असल्यामुळें 'प्रधानमल्लनिबर्हण' न्यायानें त्यांना पूर्वपक्ष गृहीत धरलें आहे. बोबडे, डोळके, ढोक या नवख्या मंडळींना उत्तरें देण्यापेक्षा मित्रबर्य कृ. पां. कुळकर्णी यांचें खंडन करणें आम्हांला उचित बाटलें. अर्थातच यथावकाश सर्वांचाच परामर्श घेतला आहे. मित्रबर्य कुळकर्णी आमच्याबर रुसणार नाहींत अशी अमची रास्त अपेक्षा आहे. या बादाच्या समर्थनाच्या भरांत ते इतके बाहत गेले कीं, 'कळमेश्वर मंदिरां'तील कागदपत्र 'अंभोरेंमाहात्म्य' लिहिणाऱ्या ढोकांनाहि ज्ञात नव्हतें हेंहि ते विसरले. असो.

हें पुस्तक लिहितांना ज्या बाबी राहून गेल्या व ज्या आमचे मित्र श्री. नरहर कुरुंदकर यांनी आमच्या निदर्शनास आणल्या त्या या निमित्तानें थोडक्यांत नोंदबितों : १. ज्याप्रमाणें स्वतःला भविष्यपुराणांतर्गत म्हणबिणाऱ्या पण भविष्यपुराणांत न आढळणाऱ्या योगेश्वरीमाहात्म्याचा उल्लेख, भविष्योत्तर पुराणीं असा मुकुंदराजांनी केला आहे, त्याला समांतर अशा एखाद्या महत्त्वाच्या प्रकरणाच्या आम्ही शोधांत होतों. धर्म–निर्णय–सिंधुकार कमलाकर भट्टानें स्वतःला ब्रह्मांड पुराणांतर्गत म्हणबिणाऱ्या, पण ब्रह्मांडपुराणांत न आढळणाऱ्या 'मल्हारीमाहाम्या' चा असाच उल्लेख, चंपाषष्ठी-व्रतप्रकरणीं केला आहे. २. दासोपंतांच्या बाङ्मयांत मुकुंदराजांचा उल्लेख नाहीं असें मत बऱ्याच आग्रहानें मांडलें जातें, पण त्यांत अर्थ नाहीं. दासोपंत कट्टर दत्तसंप्रदायी, त्यांनी कुणाचाच उल्लेख केलेला नाहीं, तेव्हां कुणाचाच उल्लेख जो करावयास तयार नाहीं त्या दासोपंतानें मुकुंदराजांचा उल्लेख केलेला नाहीं याविषयीं बिचार करण्याचें कारण नाहीं. ३. मुकुंदराजांनी केलेला माया आणि अबिद्या यांतील फरक

'कठरुद्रोपनिषदांत' आलेला असल्यामुळें या फरकाचें मुकुंदराज काल-निर्णयांत स्थान उरत नाहीं. ४. "तेथिचा महिमा अद्भुतु। भविष्योत्तर पुराणीं" या ओबीचा अर्थ, बोबडे यांनी पाशुपतव्रताकडे जोडला आहे. कृ. पां. कुळकर्णी यांनी या प्रकाराला मान्यता दिली आहे. पण हें बरोबर नाहीं; कारण पाशुपतव्रताचें बर्णन पुढें स्वतंत्र आलेलें आहे.

सदर ग्रंथास महाराष्ट्रांतील एक थोर विचारवंत, निर्भीड व चिकित्सक इतिहासज्ञ यांची प्रस्तावना असावी, असा आग्रह आमच्या मित्रांचा होता. माझे आणि प्रो. फाटकांचे संबंध अतिशय जुने व स्नेहाचे. त्यांचा मराठवाड्याबरील लोभ, माझ्याबिषयींची त्यांची आस्था इत्यादींमुळें, त्यांची प्रस्तावना घेण्याची कल्पना मला एकदम मान्य झाली. अनंत व्यापांतून त्यांनी ही प्रस्तावना लिहून दिली आहे. प्रथमपासूनच ते अंब्रेजोगाईबादी होते. या निमित्तानें त्यानीं आपले विचार निःसंदिग्धपणें प्रकट केले व आम्हांला सर्वस्वीं उचलून धरलें याबाबत आम्ही त्यांचे ऋणी आहों. गुरुबर्य म. म. पोतदार यांचा पुरस्कार दीर्घकाळ थांबूनहि येऊं शकत नाहीं. ज्या संस्थेच्या बतीनें हें प्रकाशन प्रसिद्ध होत आहे तिचे अध्यक्ष, लेखकाचे गुरु आणि अंब्रेजोगाई पक्षाचे एक समर्थक या दृष्टीनें त्यांचा पुरस्कार आवश्यक होता; पण त्यांचा आशीर्बाद आहेच असें गृहीत धरून ही पुस्तिका प्रकाशित कराबी लागत आहे, याबद्दल खेद नमूद करणें आवश्यक आहे.

प्रस्तुत पुस्तकाची मुद्रणप्रत आमचे मित्र श्री. भुजंग बाडीकर यांनी मोठ्या परिश्रमानें करून दिली. ते ब श्री. नरहर कुरुंदकर यांच्याशीं या पुस्तिकेबाबत सतत तपशीलबार चर्चा कराव्या लागल्या व या चर्चांच्या योगानें सदर पुस्तिकेंत अनेक बारकावे ग्रथित झाले

आहेत. उभयतांनी नेटानें व सतत आग्रहानें जर जोर धरला नसता तर माझ्या जड लेखणींतून ही पुस्तिका कदाचित् येतीं अनेक बर्षें बाहेर पडली नसती. सदर पुस्तिका गोदातीर संशोधन मंडळाचें पाहिलें पुष्प म्हणून प्रकाशित होत आहे, याबद्दल मंडळाची कार्यकारिणी आणि प्रकाशनाचा खर्च ज्यांच्या अनुदानांतून केला गेला आहे, तें नांदेड जिल्हा लोकल बोर्ड, या उभयतांच्या ऋणांतून माझी मुक्तता होणें सर्वस्वीं अशक्य आहे.

या पुस्तिकेमुळें आदिकवि मुकुंदराजांचें खरें स्थान अंबेजोगाई आहे ही गोष्ट बादातीत ठरेल व एक वादग्रस्त प्रश्न धसाला लागेल, अशी आशा आहे.

–विश्वेश्वर अंबादास कानोले

मराठीचे आद्यकवि श्रीमुकुंदराज यांची समाधि,
अंबेजोगाई.



मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर.
अनुक्रमांक ३१६५५५ दि. १९/५/५५
क्रमांक १३५५५ दि. २८/१०/५५

प्रस्तावना

श्री. वि. अं. कानोले यांनीं 'मुकुंदराज व अंबेजोगाई' या विषयाचें विवेचन पूर्वी पुष्कळदां केलें असून आतां त्याचें लहानशा पुस्तकाच्या स्वरूपांत जें संकलन केलें आहे, त्याची माहिती वादांत शिरण्यापूर्वी वाचकांना करून देणें अवश्य वाटतें. या पुस्तकाचे अ, ब, क, ड, इ असे पांच विभाग असून पहिल्यांत त्यांनीं वादाचें थोडक्यांत इतिवृत्त सादर केलें आहे. अंभोर पक्षाचीं मुख्य आग्रहस्थानें सांगून त्यांची परीक्षा करतांना अंबेजोगाई पक्षाचें म्हणणें नमूद केलें आहे. दुसऱ्या ब विभागांत स्थल-निर्णयाचा विषय मांडलेला आहे आणि तो अतिशय महत्त्वाचा आहे. कारण खरा वाद स्थळासंबंधाचा आहे. तिसऱ्या क विभागांत मुकुंदराज आणि अंबेजोगाई यांचा संबंध मराठी संतसाहित्य, कांहीं सनदा यांच्या आधारें कितव्या शतकापर्यंत मागें जातो, याचें स्पष्टीकरण आहे. हें स्पष्टीकरण १९१८ पर्यंत अर्वाचीन काळाशीं जोडून श्री. कानोले यांनीं आपला पक्ष सबळ बनविला आहे. ड विभागांत गुरुपरंपरा व तिच्या ओघांत आलेल्या अनेक मुद्द्यांचा विचार आहे. इ विभागांत अंभोरपक्षाच्या उपांगरूप ग्रंथांची व अर्वाचीन कागदपत्रांची छाननी आहे. या व निरनिराळ्या विभागांतून कांहीं विषयांसंबंधांत पुनरुक्तीसारखें वाटणारें विवेचन श्री. कानोल्यांना करावें लागलें असलें तरी तो विभाग वाचल्यास पुनरुक्ति विषयाच्या स्पष्टते-साठीं आवश्यक होती, असें ध्यानांत येईल. सारांश, विवाद्य प्रश्नांचा श्री. कानोल्यांनीं वर्गीकरणपूर्वक पाल्हाळ टाळून आपल्या पक्षाचें फार व्यव-स्थित समर्थन केलेलें आहे. तथापि त्यांनीं पुस्तकसमाप्ति करतांना म्हटल्या-प्रमाणें अंभोर पक्षाचें समाधान त्या योगानें होईल असा विश्वास बाळगणें सार्थ आहे. दोन्ही पक्षांबाहेरील वाचकांना अंबेजोगाई पक्षाचें समर्थन पटेल अशी श्री. कानोल्यांची अपेक्षा, त्यांचें संपूर्ण पुस्तक पाहिल्यास अस्थानीं किंवा अप्रस्तुत ठरणारी नाहीं.

महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें उजेडांत आणणारे अद्वितीय संशोधक कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं अनेक स्फुट विषयांवर जीं टांचणें–टिपणें वेळोवेळीं प्रसिद्ध केलीं, तीं सारींच त्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रें, याद्या वगैरे साधनांइतकीं ग्राह्य ठरणारीं नसतांनाहि त्यांत कांहीं टांचणा–टिपणांतून व्यक्त झालेलीं मतें-जणूं शंभर टक्के सत्य अशा श्रद्धेनें महाराष्ट्रांत इतस्ततः स्वीकारलीं गेलीं आहेत. याचें एक उदाहरण म्हणजे सुमारें ५० वर्षांमागें कै. राजवाड्यांनीं वऱ्हाड–नागपुरांकडील अंभोर म्हणजे मराठी भाषेंतील एक प्राचीन कवि जे विवेकसिंधुकार मुकुंदराज त्यांचें स्थान. अंबेजोगाईशीं मुकुंदराजांचा जोडला गेलेला संबंध हा सपशेल खोटा. पुरावा काय तर अंभोर हें वैनगंगेच्या कांठीं आहे आणि मुकुंदराजांच्या विवेक-सिंधूंत वैनगंगेच्या तीरीं अंबानगरी असल्याचा आधार आहे. मराठवाड्यांतलें अंबेजोगाई हें गांव वैनगंगेच्या कांठीं नाहीं, अंभोरला हरिनाथाची समाधि आहे, असा राजवाड्यांचा दुसरा पुरावा आहे. अंभोर पक्षाच्या पुष्ट्यर्थ राजवाड्यांनीं वऱ्हाडांतील मुकुंदराजांच्या परंपरेचे आढळणारे मठ जमेला धरले आहेत. राजवाड्यांचा हा शोध पुढें हळूंहळूं महाराष्ट्रसारस्वतकार भावे-कै. पांगारकर यांनीं स्वीकारून मान्यता दिली. भावे-पांगारकर यांची मराठी वाङ्मयांसंबंधांतील कामगिरी मोठी असली तरी त्यांची ग्राह्याग्राह्यतेची कसोटी सर्वांनी सदैव शिरोधार्य समजण्याइतकी निर्दोष नाहीं. परंतु भावे–पांगारकरांमागून आजगांवकरांनी अंभोरला उचलून धरलें. विदर्भाचे प्रख्यात संशोधक श्री. य. खु. देशपांडे यांनीं महानुभाव साहित्यांतून अंबेजोगाईला संशयांत लोटणारें एक वचन प्रकाशांत आणून अंभोरला दुजोरा दिला. अगदीं अलीकडे तर अंभोर कीं अंबेजोगाई, हा वाद अटीतटीनें चाललेला दिसतो. या वादांतील अनेक विद्वानांचा अंभोरविषयक आग्रह स्थानपरत्वें किंवा स्वार्थपरत्वें समजूं शकतो व त्यामुळेंच त्यांच्या प्रतिपादनाचें मोल बेताचेंच ठरतें. राजवाड्यांच्या मताची सयुक्तिकता ठरविणारे जे कागद बाहेर निघाले आहेत, त्यांनाहि संशयाच्या पलीकडे ठाकतां येत नाहीं.

मराठवाड्यांतील अंबेजोगाईच्या बाजूनें राजवाड्यांच्या मूळ शोधाचें व तदनुसारी प्रमाणांचें आणि विवेचनाचें परीक्षण फक्त एकच गृहस्थ

श्री. कानोले हे वेळोवेळीं करीत आलेले आहेत. श्री. कानोले हे मराठवाड्यांतील संशोधक असल्याबद्दल मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नसावी. परंतु मराठवाडा हा मोगलाईतला प्रदेश आतां जुन्या मुंबई राज्यांतील महाराष्ट्राशीं भौगोलिक दृष्ट्या संलग्न झालेला असला तरी तेथील जनतेचा जसा परिचय पूर्वोक्त महाराष्ट्राला व्हावा तसा अद्यापि घडलेला नाहीं. म्हणून श्री. कानोले यांची संशोधक शब्दानें थोडीशी ओळख करून दिली. त्यांनीं अंबेजोगाई हेंच विवेकसिंधुकार मुकुंदराजांचें वस्तिस्थान, असें महाराष्ट्रांतील जनतेला पटविण्याचा उद्योग अतिशय चिकाटीनें चालविला आहे. त्यांचा प्रस्तुत लहानसा प्रबंध हा त्याच उद्योगाचा परिणाम असून सदर प्रबंधांत श्री. कानोले यांनीं अंबेजोगाई विरुद्ध अंभोर या वादाची गुंतागुंत दाखवून तिच्यांतल्या वेगवेगळ्या गांठी सोडवून मोकळ्या केल्या आहेत. त्यांचा हा प्रबंध खरोखरींच अभ्यासायोग्य आहे. प्रतिपक्षाच्या मताची आपल्यास नडणारी बाजू झांकून ठेवणें व अनुकूल असलेली बाजू अभ्यासकांच्या डोळ्यांवर पुनः पुनः घालीत राहणें, असा प्रकार श्री. कानोले यांच्या प्रस्तुत प्रबंधांत नाहीं.

महाराष्ट्र सारस्वताच्या वाढीचीं आणि विकासाची पद्धतशीर माहिती असणारांना जर अंभोर या गांवाचा मराठी साहित्यांतील निर्देशक्रम केव्हांचा म्हणून प्रश्न केल्यास तो राजवाड्या (१९१३) पूर्वींचा नाहीं असेंच कबूल करावें लागेल. अंबेजोगाईला अव्हेरून अंभोरसारख्या अज्ञात स्थानाला जो विलक्षण आणि अपूर्व मान दिला, याचें मूळ राजवाड्यांनीं वैण्यगंगेला वैनगंगा ठरविणाऱ्या तर्कांत आढळून येईल. तेथें हरिनाथाची समाधि आणि आजूबाजूस मुकुंदराजांच्या परंपरेचे मठ असा प्रकार दिसतांच नदीचा प्रश्न राजवाड्यांनीं निकालांत काढला. विवेकसिंधूच्या बहुसंख्य हस्तलिखित प्रतींमधून नदीच्या नांवात न ऐवजीं जो ण सांपडतो, तो कां याच्या संशोधनांत राजवाडे शिरले नाहींत. समाधि आणि परंपरा यांच्याशीं जुळणारी वैनगंगा नदीच मुकुंदराजांची वैण्यगंगा अशी तोड राजवाड्यांनीं पत्करली. अंबानगरीचें भाषाशास्त्राप्रमाणें अंभोर असें रूपांतर होणें शक्य आहे कीं नाहीं याचा राजवाडे यांनी विचार केलेला नाहीं. वैण्यगंगेंतला णकार नडतो

यासाठीं मनोहर अंबानगरी । या चरणांतील न ला ण (मणोहर, णगरी) बनवून णकाराची अडचण ओलांडण्याचें उदाहरण श्री. कानोले यांनीं एका ठिकाणीं निदर्शनास आणलेलें आहे. आपल्या ग्रंथांत (विवेकसिंधूत) मुकुंदराजांनीं जी स्वतःशीं निगडित असलेल्या स्थळाची व व्यक्तींची माहिती नमूद केलेली आहे, तिच्यांत न सांपडणाऱ्या कल्पना अंभोरच्या समर्थनार्थ पुढें रेटण्यासाठीं होणाऱ्या प्रयत्नांचा मनोरंजक वृत्तान्त श्री. कानोले यांनीं दाखवून दिला आहे.

शके १७३१ हें वर्ष ज्यांत नोंदलेलें आहे, असे कागद अस्सल पुराव्याच्या नात्यानें उलगडून अंभोराचें नांव एकदां अंबानगरी होतें, पण एका नागपूरकर भोसले राजानें तें बदललें आणि अंभोर असें ठेवलें हा त्या कागदांतील दावा अगदींच पोंचट आहे. त्या कागदांत "हल्लीं" असा एक शब्द आहे. हल्लीं म्हणजे केव्हां याचा खुलासा अंभोरवाद्यांनीं उदाहरणें देऊन केलेला नाहीं. एका अंबानगरीचेंच नांव कां बदलावें ? हा प्रश्न उपस्थित होऊं नये म्हणून "बरेच गांवांचें नांव बदललें त्याप्रमाणें" असा त्या कागदांतील माहितीमध्यें मजकूर जोडला आहे. परंतु मूळ लेखकानें अंभोराखेरीज दुसरें एखाद्या बदललेल्या गांवाचें नांव आपल्या माहितीच्या बळकटीसाठीं सांगायला हवें होतें. त्यानें जसा हा विषय गुलदस्तांत ठेवला आहे तसाच त्याच्या आजकालच्या पुरस्कर्त्यांनीं तो गुलदस्तांतच ठेवलेला आहे. अंबानगरींत असा कोणता दोष होता कीं ज्याच्या निरसनासाठीं या अनामिक 'भोसले राजेसरकारनी' अंभोर हें नांव स्वीकारावें, याचाहि सामान्य वाचकाला अंभोरवाद्यांच्या लिखाणांतून बोध होऊं नये, हें या प्रकरणांतील आणखी एक आश्चर्य आहे. तथापि शके १७३१ च्या कागदाला चिकटणारांनीं त्यापूर्वीचा पुरावा दाखविल्यास आपण त्याचें स्वागत करूं, अशा आशयाचा भलेपणा एका आग्रही अंभोरवाद्यानें दाखविल्यामुळें रामदासस्वामीच्या उद्धवसुत (शके १६९६) महीपती (शके १७१०) आत्मारामस्वामी (शके १७२५) यांनीं लिहिलेलीं चरित्रें श्री. कानोल्यांनी प्रतिपक्षापुढें ठेवलीं आहेत. पण एवढ्यावरच न थांबतां या चरित्रांतील अंबेजोगाई व मुकुंदराज यांच्या संबंधाची माहिती शके १७३१ नंतरच्या

काळांत राजाराम प्रासादी (शके १७५६) आणि १९१८ सालीं प्रसिद्ध झालेल्या औरंगाबाद गॅझेटिअर यांच्या दरम्यानच्या इ. स. १७५७ व १८४९ या वर्षांतील दोन सनदांशिवाय देशिकलीलामृत व शिळाछापाचा 'भारत-कोश' यांचे आधार दिलेले आहेत ते निराळेच. हे आधार मुकुंदराज हे अंबेजोगाईचे रहिवासी होते असें सिद्ध करणारे आहेत. रामदासांचीं चरित्रें रामदासाच्या काळापर्यंत अंबेजोगाई व मुकुंदराज यांच्या संबंधाची परंपरा नेऊन पोंचवितात तर इतिहासकालीन सनदा, मुकुंदराजांची समाधि अंबे-जोगाईस असल्याची खात्री, सनदा देणारांना होती असें दर्शवितात. भारतकोश हा चौकसपणानें लिहिलेला ग्रंथ आहे; अर्थात् त्याच्या कर्त्याला मुकुंदराज अंबेजोगाईचे राहणारे अशी माहिती मिळाल्याखेरीज त्यानें तसें नमूद केलें नसतें. श्री. कानोले यांनी औरंगाबाद गॅझेटिअरचा उतारा दिला आहे. अंभोरपक्षातर्फे बैतूल जिल्ह्याच्या गॅझेटिअरची वाच्यता केली गेली आहे, परंतु तें गॅझेटिअर व त्याचा पुरवणीखंड यांतून अंभोर, अंबेजोगाई यांविषयीं कांहींच निष्पन्न होत नाहीं.

जोगाई हें योगिनी शब्दाचें मराठी रूप असून या योगिनी देवीचें योगेश्वरीमाहात्म्य उपलब्ध आहे. माहात्म्यांत भविष्योत्तर पुराणांतर्गत अशी ग्वाही आहे. पण माहात्म्याचा भविष्योत्तर पुराणांत अंतर्भाव नाहीं, एवढ्यानें त्या माहात्म्यरचनेची उपेक्षा करण्यासारखें तें टाकाऊ ठरत नाहीं. योगेश्वरी-देवीचें तीर्थ म्हणून हें माहात्म्य लिहिलें गेलें, हें उघड आहे. माहात्म्यांत रचनेचे दोन थर आढळतात, यावरून त्याची सारी रचना १५ व्या शत-कांतली, हें अनुमान चुकीचें असलें तरी अंबानगरीची योगेश्वरीदेवी मुकुंद-राजापूर्वीच्या शतकामध्यें अस्तित्वांत होती, या मुद्द्याला कबुली मिळते, असें जें श्री. कानोले यांनीं सुचविलें आहे, तें यथार्थ आहे. अंबानगरींतील 'अंबा' हा देवीवाचक शब्द विचारांत घेतल्यास एकदां अंबा नांवानें ओळ-खल्या जाणाऱ्या नगरीला देवी निश्चितपणें कोणती, हें सिद्ध होण्यासाठीं योगेश्वरी-मराठींत जोगाई–हा शब्द जोडला जाण्याची शक्यता मनाला स्पर्श करते. अंबेचें आंबा–आम्र याप्रमाणें कालांतरानें रूपांतर झालें.

श्री. कानोले हे पौराणिक योगेश्वरीमाहात्म्यावर विसंबून राहिलेलें नाहींत; त्यांनीं शके १०६६ मधील उदयादित्याचा व शके ११५० मधील खोलेश्वराचा असे दोन शिलालेख पुराव्यांत घेतलेले आहेत. दुसऱ्या शिलालेखांत आम्रपूर व या दोन शिलालेखांव्यतिरिक्त श्री. कानोले यांना माहीत असलेल्या तिसऱ्या शिलालेखांत आम्रदेश असा निर्देश आढळतो. उदयादित्याच्या शिलालेखांत 'अंबा' शब्द असल्यानें तो पुढें सुमारें शंभर वर्षांत आंबा–आम्र याप्रमाणें बदलला. अंबा असो कीं, आम्र–आंबा असो, जोगाईची म्हणजे योगेश्वरीची उपपत्ति कशी लावायची, या प्रश्नाला उदयादित्याच्या शिलालेखामध्यें योगिनीच्या वज्रदंडाचें भय ज्या वाक्यानें दाखविलें आहे तें वाक्य उद्धृत करून समर्पक उत्तर दिलेलें आहे. खोलेश्वराच्या लेखांत अंबानगरीचें विस्तीर्ण वर्णन आहे. कदाचित् मुकुंदराजांनीं "माझी अतिमंदवाणी। ते महिमा केवि वाखाणी" ही नम्र भूमिका अंबानगरीच्या मनोहरत्वाचा विस्तार टाळण्याकरितांहि स्वीकारली असेल. खोलेश्वराच्या वर्णनांतील अनंत तपोधनांचा उल्लेख शिवकल्याणाच्या अमृतानुभव टीकेंतील "योगिजना विश्रामस्थान" या वचनानें श्री. कानोले यांनी बळकट केला आहे. योगेश्वरीमाहात्म्य जुनें असेल, त्यांत मुकुंदराज आहेत का, या प्रश्नाचा निकाल त्या माहात्म्यांतील मुकुंदराजांची कथा सांगून श्री. कानोले यांनी समाधानकारक रीतीनें लावला आहे. श्री. कानोले सगळें योगेश्वरीमाहात्म्य विश्वसनीय व अतिप्राचीन मानीत नाहींत. पण अंभोरच्या पुरस्कर्त्यांनीं लौकिक–संस्कृत व आर्ष–संस्कृत, नाथसंप्रदायांत छडी हातीं घेण्याचा प्रघात आहे, का दंडा हातीं घेण्याचा प्रघात आहे, इत्यादि शंका उपस्थित केल्यामुळें त्यांचाहि ऊहापोह श्री. कानोले यांना करावा लागला. स्वपक्षाभिमानानें प्रतिपक्षाला अडविण्यासाठीं नव्यानव्या विचित्र क्लृप्त्या काढणाऱ्या वृत्तीचा खेळ साहित्यांतील वादांची ओळख असणारांना मुद्दाम सांगायला नको. लंगड्या पक्षाला क्लृप्त्यांच्या कुबड्या शोधाव्या लागतात. अंबेजोगाई–या तीर्थाचें एक जुनें माहात्म्य प्रचलित आहे, अंभोरपक्षाजवळ तशी सामग्री नाहीं, म्हणून अंभोरचें माहात्म्य नव्यानें लोकांपुढें आलें आहे. आज कागदी पुरावे अंभोरच्या बतीनें बाहेर पडत आहेत; उद्यां शिलालेख सुद्धां सिद्ध होतील

अशी वादाच्या विद्यमान स्वरूपावरून अपेक्षा कोणी बाळगल्यास ती चुकीची समजतां येणार नाहीं. येथेंच महानुभावांच्या शके १६६१ तील मजकूर विल्हेस लावण्यास हरकत नाहीं. झाडीमंडळांत मराठवाड्याचा समावेश करणें ही त्यावर एक तोड आहे. "वैण्यगंगेतीरीं अंबावतीपुरी" हें वचन मुकुंदराज व अंबेजोगाई या वादांत निरुपयोगी आहे. शिवाय त्यांत व्यक्तींच्या नांवाचा गडबडगुंडा पुष्कळच आहे. तो उकलण्याचा गोंधळ व पाल्हाळ तूर्त नको. येथवर केलेल्या परामर्शांत वैण्यगंगा का वैनगंगा, हा प्रश्न आलेला नाहीं. वैण्य हा ज्याचा अपभ्रंश तो मूळचा शब्द 'वाणी' असल्याचें श्री. कानोले यांनीं दाखविलें. ब्रह्मदेव खोटें बोलल्यामुळें शंकरानें "तुझी वाणी जलरूप होईल" असा शाप दिला व 'वाणीगंगा' उद्भवली. ही गंगा योगेश्वरी-माहात्म्यांतच असती तर शंकेला जागा सांपडण्याचा संभव होता. ब्रह्मपुराणाच्या गोदावरीमाहात्म्यांतहि वाणी किंवा वाणनदी ही गोदावरीस मिळते-असा या नदीचा स्पष्ट निर्देश आहे. वाणीगंगाच वैण्यगंगा. अपभ्रंशाच्या स्वीकारानें मुकुंदराज आपल्या स्थळाला मुकत नाहींत.

वैण्यगंगेच्या निर्णयानंतरचा विषय म्हणजे अंभोरच्या आसपास असलेल्या मुकुंदराजांच्या मठपरंपरेचा आहे. नव्यानें प्रकाशांत आलेल्या "श्री आंभोर क्षेत्र महिमा" ज्यांचा टेकू घेतो, तो बकाजी रंगनाथ हा मुळांत नांदेडचा राहणारा, त्यानें आपला "विवेकभास्कर" हा ग्रंथसुद्धां नांदेडासच शके १७२८ मध्यें लिहिला. बकाजीचा गुरु नागेंद्र हा देखील नांदेडचा, असें निदर्शनास आणून श्री. कानोले यांनी सदर टेकूचा बुडबुडा फोडला आहे. बकाजीसारखेच आणखी जे कित्येक क्लिष्ट प्रश्न अंभोर पक्षानें प्रतिपक्षावर फेंकले आहेत, त्यांचा यथोचित सप्रमाण रीतीनें श्री. कानोले यांनी समाचार घेतला आहे. अंबेजोगाई विरुद्ध अंभोर या वादांत मन गुंतविणारांना त्याचें महत्त्व आहे व यासाठीं त्यांनी श्री. कानोले यांचें हें पुस्तक समग्र वाचलें पाहिजे. सामान्य जिज्ञासूंना अंभोर पक्षाचे अनेक प्रश्न व त्यांचें निराकरण हीं कंटाळवाणीं वाटतील.

श्री. कानोले यांच्या पुस्तकाचा अल्पांशानें परिचय करून देण्याचा मुख्य उद्देश अंबेजोगाई व मुकुंदराज यांच्याविषयीं चालणाऱ्या वादाची उपेक्षा होऊं नये एवढाच आहे. श्री. कानोल्यांच्या मागें तथोक्त उच्च शिक्षणाची उपाधि नाहीं किंवा मोठ्या हुद्देदारीची थोरवी नाहीं. महाराष्ट्राच्या इतर भागांत बऱ्याच लेखकांना जसे नियतकालिकांचें पाठबळ लाभतें तसें श्री. कानोल्यांना तें लाभण्याइतकी अद्यापि मराठवाड्याची प्रगति झालेली नाहीं. परंतु श्री. कानोले यांचें संशोधकत्व मात्र उपेक्षणीय नाहीं.

मुंबई
दि. १५ मार्च १९६१

– नरहर रघुनाथ फाटक

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ..... विः .....
क्रमांक ..... नोंः दिः .....

प्रास्ताविक

मराठीचे आद्यकवि श्री मुकुंदराज यांचा 'विवेकसिंधु' हा ग्रंथ एका अर्थीं मराठी भाषेंतील केवल अद्वैतवादाचें उपनिषदच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. उपनिषदांत ज्याप्रमाणें प्राचीन ऋषींनी आपले दिव्य अनुभव मांडून दाखविले आहेत; पण त्या अनुभवांचीं तार्किक स्पष्टीकरणें व उदाहरणांनी करण्यांत यावयाचा विस्तार आपल्यामागून येणाऱ्या विवेचकांच्यासाठीं राखून ठेवला तीच तऱ्हा मुकुंदराजांची आहे. पुढील नराठी कवींवर मुकुंदराजांचा फार मोठा पगडा दिसतो. महाराष्ट्रांतील सर्वच भागांत आणि सर्व पंथोपपंथांत असामान्य लोकप्रियता मिळविलेला असा हा ग्रंथ आहे. पण सुमारें ७५० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या आद्यकवीचे काळ व स्थळ अजून विवाद्य आहेत. शिवाय त्यांचीं चरित्रविषयक जीं कांहीं थोडी माहिती उपलब्ध आहे तीहि आजकाल विवाद्य होऊं पाहते. मराठींत शांकरमताचा पहिला झरा निर्माण करणाऱ्या मुकुंदराजविषयक सर्वच बाबी विवाद्य तर आहेतच; पण त्यांच्या स्थलाचा निर्णय हे मराठी साहित्यिकांचें महत्त्वाचें युद्धक्षेत्र बनलें आहे.

मुकुंदराजांच्या स्थलनिर्णयाच्या वादाची ओळख करून घेण्याआधीं कांहीं प्राथमिक माहिती लक्षांत घेतली पाहिजे. मुकुंदराजांनी विवेकसिंधूच्या शेवटच्या अध्यायांत ज्या एका वैण्य गंगेवरील मनोहर अंबानगरीचा उल्लेख केला आहे ती कोणती हा वादाचा प्रश्न आहे. खरें पाहिलें असतां मुकुंदराजांनी जी अंबानगरी विवेकसिंधूंत उल्लेखिली आहे तीच हरिनाथाची जन्मभूमि, कर्मभूमि अशी आहे. मुकुंदराजांचे आजे गुरू ज्या नगरींत जन्मले त्यांचे म्हणजे हरिनाथाचे ज्या नगरींत बालपण, मौंजीबंधन, वेदाध्ययन इ. झालें आणि ज्या नगरींत आजेगुरु हरिनाथांना शंकराचा साक्षात्कार झाला ती अंबानगरी कोणती हा वादाचा खरा मुद्दा आहे. हरिनाथाची अंबानगरी आणि मुकुंदराजाची अंबानगरी या दोन

नसून खरी म्हणजे हरिनाथाचीच अंबानगरी पण प्रसिद्ध कवि मुकुंदराज यांच्यामुळें मुकुंदराजांची म्हणून जी लोकविश्रुत आहे ती अंबानगरी कोणती? या प्रश्नाचा निर्णय लावणें हा या पुस्तिकेचा प्रतिपाद्य मुख्य विषय आहे. आधींच इतकें आवर्जून आणि पुनरुक्ति करून हा मुद्दा पुनःपुन्हा सांगण्याचें कारणहि आहे. महाराष्ट्र सारस्वताच्या पृष्ठ ८४९ वर डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात, "तेव्हां हरिनाथावरून मुकुंदराजांची स्थलनिश्चिति करण्यापेक्षां ती स्वतंत्ररीत्या करणें अधिक बरें." विवेकसिंधूच्या चिकित्सक संहितेचे संपादक कृ. पां. कुलकर्णी प्रस्तावना पृष्ठ ४७ वर म्हणतात, "हरिनाथांचा अवतार त्यांचा होम.....हे सर्व प्रसंग... सध्यांचें आंभोरें येथें घडलें याबद्दल विरोधी पक्षाचाहि वाद नाहीं." "मुकुंदराजांचे परात्पर गुरु हरिनाथ ह्यांचा संबंध कोणत्या अंबानगरीशीं आला हा वादाचा मुख्य विषय नाहीं." डॉ. तुळपुळे यांना हरिनाथ व मुकुंदराज वेगळे करावेसे वाटले. याचें कारण म्हणजे केवळ जादा सावधगिरी अगर विषयावरील अपुरी पकड हें होय. पण श्री. कृ. पां. कुलकर्णी यांचें मात्र तसें नाहीं. त्यांनी हरिनाथांची अंबानगरी व मुकुंदराजांची अंबानगरी अशी फोड हेतुपुरस्सर केली आहे. आणि ती दिशाभूल करणारी आहे. म्हणून वाद समजून घ्यावयाचा असेल तर हें प्रथम ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे कीं जी हरिनाथाची अंबानगरी तीच मुकुंदराजाची अंबानगरी अशी ही आजेगुरु आणि नातू–शिष्य उभयतांशीं संबंधित असणारी अंबानगरी मध्यप्रदेशांतील वैन गंगेकांठचें आंभोर आहे किंवा मराठवाड्यांतील जोगाईचें अंबे ऊर्फ मोमिनाबाद आहे हा वादाचा खरा प्रश्न आहे.

उभयपक्षांचा इतिहास

मुकुंदराज हे मराठीचे आदि कवि व विवेकसिंधु हा मराठींतील पहिला श्रेष्ठ ग्रंथ मानला गेल्यामुळें या प्रश्नास मराठी वाङमयाच्या इतिहासांत विशेष महत्त्वाचें स्थान प्राप्त होणें साहजिक आहे. मराठवाडा आणि विदर्भ हे एकाच मराठी भाषेचे दोन विभाग मुकुंदराजावर आपापल्या परीनें सध्यां हक्क सांगत आहेत. या स्थलनिर्णयाच्या वादांत अंबे-

जोगाई ऊर्फ मोमिनाबाद व आंभोर हीं दोन्हीं नांवें सारखींच प्रसिद्धीस आलीं आहेत. ५०-६० वर्षांपूर्वीं तरी मुकुंदराजांच्या अंबानगरीसंबंधीं दोन पक्ष निर्माण झाले नव्हते. हा प्रश्न एकट्या मुकुंदराजापुरता नसून नामदेव, वामन इ० अनेक संत कविसंबंधानें आहे. पण ते वाद फारसे गाजले नाहींत अीण महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणींत अगदीं अलीकडे अनेकांच्या बाबतींत फारसा वाद न करतां मराठवाड्याचा हक्क मान्य केला गेला आहे. मुकुंदराज मात्र वादाच्या फेऱ्यांत अजूनहि फिरत आहेत. श्री. नानासाहेब पावगी, श्री. मोडक, श्री. ओक, श्री. कै. महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. अजगांवकर यांनीं केलेल्या लिखाणापर्यंत कुणीहि मुकुंदराज आंभोरचे असें म्हटलें नव्हतें. परंपरेनें मुकुंदराज अंबेजोगाईचे मानण्यांत येत. आणि उपरोक्त विद्वानांनींहि त्यांचे वेळीं हा प्रश्न वादग्रस्त नसल्यामुळें फारशी चिकित्सा न करतां मुकुंदराजांना अंबेजोगाअीचें गृहीत धरलें आहे. कदाचित् पुढें वादग्रस्त झालेल्या ओबीकडे त्यांचें लक्ष वेधलें गेलें नसावें. आंभोरपक्षाच्या निर्मितीचे मूळ शके १८३५ मधील भा. इ. सं. मं. पुणें वार्षिक इतिवृत्त मधील इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मुकुंदराजाचा एक संस्कृत ग्रंथ या परिचयात्मक लेखांत प्रथम आढळते. इतिहासाचार्य राजवाडे हे महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ प्रतिभावान संशोधक होत, यांत मुळींच संशय नाहीं. त्यांच्या कल्पना नेहमींच त्या त्या क्षेत्रांतील विचारवंतांना धक्का देणाऱ्या पण विचारप्रेरक असत. राजवाडे यांनीं उपरोक्त लेखांत दोन मतें मांडलीं. एक तर वैनगंगा तीरि । मनोहर अंबानगरी । ही भंडाऱ्याजवळील वैनगंगेच्या कांठचें आंभोरें हें तीर्थ होय. तेथेंच हरिनाथाची समाधि आहे. मुकुंदराजांच्या समाधीचा संबंध जोगाईच्या अंब्याशीं बिलकुल नाहीं. आंबा या नांवावरून जोगेश्वरीचें आंबे ऊर्फ मोमिनाबाद जें एकदां प्रचलित केलें तें तसेंच प्रचलित झालें. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आंबे म्हणजे आंभोरें भंडाऱ्याजवळील नागपूर प्रांतांतील समजावयाचे. त्या प्रांतांत मुकुंदराजांची शिष्यपरंपरा अद्यापीहि आहे. त्यांनीं मांडलेलें दुसरें मत म्हणजे मुकुंदराज हे ज्ञानेश्वर समाधीच्या नंतरहि हयांत होते. राजवाडे यांचें दुसरें मत श्री. गोगटे आणि किबे यांनीं पुढें उचलून धरलें आहे. पण सार्वत्रिक मान्यता राजवाड्यांच्या पहिल्या मताला मिळाली. राजवाडे यांनीं असें मत कां

मांडलें याचीं कारणें त्या लेखांत नोंदलेलीं नाहींत. पण तीं तार्किकतां येतात. पहिलें कारण म्हणजे मुकुंदराजांनीं विवेकसिंधूंत प्रत्यक्ष म्हटल्याप्रमाणें अंबानगरी वैनगंगेच्या कांठीं असली पाहिजे. आणि अंबेजोगाईस वैनगंगा नाहीं. दुसरें कारण म्हणजे आंभोरला हरिनाथांची समाधि आहे व तिसरें कारण म्हणजे विदर्भांत असणारें मुकुंदराज परंपरेचे मठ. गेल्या ४० वर्षांत आंभोरपक्षाचे सर्व प्रतिपादक या तीन मुद्द्यांच्या भोंवतीं फिरतांना दिसतात. एका अर्थीं इतिहासाचार्यांनीं या वादांत पुढील ५० वर्षांतील मुद्दे आधींच मांडून टाकलेले आहेत. राजवाडे यांचें हें मत पुढें अनेकांना पटलें. प्रथम सारस्वतकार भावे यांनीं व नंतर पांगारकरांनीं हें मत उचलून धरलें. आणि अंबेजोगाई पक्ष अगदींच मागें पडला. यानंतर या वादांत नवीन भर घालण्याचें श्रेय विदर्भांतील विख्यात संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांना द्यावें लागेल. भा. इ. सं. मंडळाच्या १९४१ च्या एका अंकांत (वर्ष १२ अंक २). देशपांडे यांनीं मेघचंद्रकृत 'यक्षदेव अम्नाया' चा वृद्धाचार आणि 'वृद्धान्वय' या शके १६०० तील ग्रंथांतील प्रत्येकीं एक असे दोन उतारे उपरोक्त चर्चेंत दाखल केले. या उताऱ्यान्वयें जैत्रपाळ हा झाडीमंडळचा राजा आणि मुकुंदराजांचा पुतण्या किंवा चुलतभाऊ ठरूं घातला व मुकुंदराज आंभोरचे असावेत हें मत दृढ होऊं लागलें. १९४१ पर्यंत नवे कोणतेहि पुरावे पुढें आले नाहींत. १९४१ सालीं आम्ही 'मराठवाड्यांतील गद्यविहार' या प्रातिनिधिक लेखसंग्रहांतून एका लेखाद्वारें विवेकसिंधूतील अंतर्गत पुराव्याचा आधार देऊन अंबेजोगाई हीच मुकुंदराजांना अभिप्रेत असणारी अंबानगरी आहे हें मत प्रतिपादन केलें. या मुद्द्याकडे महाराष्ट्रांतील विद्वानांचें अधिक लक्ष वेधलें जावें म्हणून १९४३ सालीं भा. इ. सं. मंडळाच्या ३० व्या वार्षिक संमेलनांत याच विषयावर आम्ही एक निबंध वाचला. या निबंधाचा सारांश पुढें 'सह्याद्रि' मासिकांत १९४६ सालीं ऑक्टोबरमध्यें प्रसिद्ध केला. पण या संशोधनाकडे महाराष्ट्रीय विद्वानांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. अनुकूल प्रतिकूल अशी चर्चा एक अपवाद वगळतां मुळींच झाली नाहीं. हा अपवाद म्हणजे माझे मित्र प्रा. र. म. भुसारी यांचा; त्यांनी आपल्या 'साहित्य व संशोधन' यांतील एका लेखांत आमचा मुद्दा अमान्य करून पुन्हा आंभोर पक्षाचें

समर्थन केलें. यानंतर ४ वर्षांनी श्री. ये. मा. कुळकर्णी यांनी 'मराठवाडा' दिवाळी अंक १९५० व डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी साहित्य पत्रिकेच्या १६ व्या अंकांत त्याच सालीं या विषयावर लेख लिहिले. डॉ. तुळपुळे यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडणारा जो लेख लिहिला त्याला आधार बहुधा माझेंच संशोधन असावें. पण या लेखांत हें ऋण मान्य केलेलें आढळत नाहीं. १९५० सालींच श्री. ठोक यांनी 'आंभोरें क्षेत्रमहिमा' हें पुस्तक लिहून व १९५१ सालीं गोगटे यांच्या विवेकसिंधूला प्रस्तावना लिहितांना बापूजी अणे यांनी आंभोरची बाजू पुन्हां मांडली आहे. गोगटे यांनी कोणतीहि बाजू न घेतां 'अनिर्णित प्रश्न' म्हणून हा मुद्दा बाजूला सारला आहे. माझें अंबानगरीवद्दलचें संशोधन डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. कोलते, डॉ. पेंडसे, श्री. ओक प्रभृतींच्या अवलोकनांत येऊन चुकलें होतें व हें संशोधन अंभोर पक्षास अस्वस्थ करणारें असल्यामुळें विदर्भस्थ विद्वानांकडून त्यास उत्तर येणें अपेक्षित होतें. १९५४ मध्यें महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या १०५, १०६ व १०७ या तीन अंकांतून विदर्भांतील एक नवोदित प्राध्यापक श्री. सुरेश डोळके यांनी पुन्हां एकवार आंभोर पक्षाची मांडणी केली. ही मांडणी करतांना धर्मरहस्य, भक्तिरहस्य, मुरहरीबावांचे अभंग व कळमेश्वरमट येथील पत्रें ही नवीन सामुग्री पुरावा म्हणून दाखल करण्यांत आली. या लेखामुळें अनेक विद्वानांच्या मनांत जो थोडाबहुत किंतु शिल्लक होता तोहि दूर झाला. याचें प्रत्यंतर श्री. य. रा. आगाशे यांचा 'नवभारत' ऑक्टोबर १९५५ मधील लेख आणून देईल. म. भा. भु. अजगांवकर हे येवढे विद्वान व चिकित्सक लेखक पण त्यांनीहि आपलें जुनें मत बदलून आंभोर पक्षाला महाराष्ट्र कविचरित्राच्या नव्या आवृत्तींत पाठिंबा दिला. आमचें अंबानगरीविषयक संशोधन जर त्यांच्या नजरेस आलें असतें तर तें आपलें जुनें मत बदलूं शकलें नसतें असें आम्हांस वाटतें. पुढें १९५५ च्या 'मराठवाडा' दिवाळी अंकांत आम्ही सर्व मागच्या पुराव्यांचा यथास्थित परामर्श घेऊन व डोळके यांचे मुद्दे सप्रमाण खोडून काढून पुन्हा एकवार अंबेजोगाई पक्षाची मांडणी केली. अनेकांना या लेखांतील माहितीचें महत्व व प्रामाण्य पटलें असल्याचें दिसून आलें. पण आंभोरपक्षाची ही घसरती

बाजू १९५७ सालीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध विद्वान व भाषाशास्त्रज्ञ कृ. पां. कुलकर्णी यांनी सांवरून धरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी संपादित केलेली विवेकसिंधूची भाषाशास्त्रीय व पाठचिकित्सक आवृत्ति नुकतीच प्रकाशांत आली आहे. या ग्रंथाला लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनेंत श्री. कुलकर्णी यांनी आंमोर पक्ष उचलून धरला आहे. त्यांच्या समोर प्रा. डोळके यांचें व माझेंहि लिखाण उपलब्ध होतें. अंबेजोगाई व आंमोर हीं दोन्हींहि स्थानें त्यांनी प्रत्यक्ष पाहिलीं होतीं. त्यांच्याकडून सत्यसंशोधनाची आम्हांला निश्चित अपेक्षा होती. पण या वादांतील आजवरच्या लिखाणांत कुळकर्णी यांचें लिखाण आत्यंतिक दिशाभूल करणारें व हेतुपुरस्सर विपर्यास करणारें असें आढळून येतें. जणु आंमोर पक्षाचें समर्थन करणें व त्यासाठीं कुठल्याहि प्रश्नाची कुशलतेनें डावलाडावली करणें हें त्यांना आवश्यक वाटलें असावें. प्रस्तुत पुस्तिकेंत या वादाची सविस्तर चिकित्सा करून अंबेजोगाई पक्षच कसा पुरावेसिद्ध आहे हें दाखवून देण्याचें आम्ही ठरविलें आहे. या पुस्तिकेनें हा वाद निःसंदिग्धपणें मिटला जावा व खऱ्या अंबानगरीचें स्वरूप यथार्थतेनें प्रकट व्हावें असा आमचा हेतु आहे.

अध्याय १८ ओवी अडतीस व चव्वेचाळीस.

मुकुंदराजांच्या स्थलनिर्णयाच्या वादांत जास्तींत जास्त भर स्वतः मुकुंदराजांच्या शब्दावर देण्यांत यावा आणि मुकुंदराजांनी जाणता अगर अजाणता जे थोडेबहुत स्थलविषयक मार्गदर्शन केलें असेल त्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घ्यावा असें आमचें मत आहे. मुकुंदराजांचा काळ कोणताहि असो अंबानगरीविषयक अस्सलांतला अस्सल पुरावा स्वतः मुकुंदराजाचे शब्द असणार हें उघड आहे. सुदैवानें मुकुंदराजांनी अत्यंत स्पष्ट असें मार्गदर्शन विवेकसिंधूंतच केलेलें आहे. या दृष्टीनें अठराव्या अध्यायांतील ३८, ४४ आणि ४५ या ओव्यांचें या वादांत अतोनात महत्व आहे. विवेकसिंधुची भाषाशास्त्रीय चिकित्सक आणि सार्थ अशी कृ. पां. कुलकर्णी यांची आवृत्ति, अशा वेळीं कुणीहि उघडणार! संपादकाचें जाडेंजुडें नांव स्वाभाविकच ओव्यांच्या अर्थाचा बरोबर असण्याचा पुरावा

म्हणून पाहिलें जाईल. विवेकसिंधूच्या ओव्यांचा अर्थ देतांना आवश्यक तो काटेकोरपणा कुळकर्णी दाखवतील अशी आमची अपेक्षा होती. पण ही अपेक्षा फोल ठरली आहे हें नाइलाजानें नमूद करावें लागतें. योगिक प्रक्रिया उलगडून सांगणारा भाग कृ. पां. कुलकर्णी यांच्या हातून कसा विपर्यस्त झाला आहे याचीं अनेक उदाहरणें यापूर्वी चिकित्सक वाचकांच्या समोर परीक्षण रूपानें आलेलीं आहेत. संपादकांच्या अज्ञानांतून निर्माण होणाऱ्या चुकांचा वर्ग असें याबाबतींत म्हणतां येईल. क्वचित् प्रसंगीं निष्काळजीपणा हाहि ओवीचा अर्थ चूक देण्याला कारणीभूत होतो. सातव्या प्रकरणांतील ओवी ७१ आणि ७३ यांचा अर्थ या दृष्टीनें पाहण्याजोगा आहे. पण अध्याय १८ मधील ४४ व्या ओवीची ही अवस्था नाहीं. एखादा पुरावा डावलणें अगर त्याबाबत दिशाभूल करणें असा हेतुपुरस्सर प्रयत्न या ओवीच्या अर्थाबाबत कुळकर्णी यांनी केला आहे. मुकुंदराजांना त्यांच्या शैलीचा नीट अभ्यास केला तर पुनरुक्तीची एक विशिष्ट लकब असल्याचें आढळून येतें. तसा प्रकार ओवी ४४ च्या बाबत झाला आहे. आपण मागच्या पुढच्या संदर्भासहित या विवाद्य ओवीकडे पाहूं. आणि खरोखरच वाद होण्याइतकी ही क्लिष्ट ओवी आहे काय याचा मनाशींच विचार करूं.

वैण्यागंगेचिये तीरि । मनोहर अंबानगरी ॥
तेथ प्रकटले श्रीहरी । जगदीश्वरू ॥ १८.३८ ॥

या ओवींत "वैण्यगंगेच्या" तीरावरील अंबानगरींत मुकुंदराजांचें आजेगुरु हरिनाथ प्रकट झाले म्हणजे जन्मले असें वर्णन आहे. ३९ व्या ओवींत हरिनाथ माध्यंदिन शाखेचे व गोऱ्या रंगाचे होते असें म्हटलें आहे. ४० व्या ओवींत श्रीवत्सपद उजव्या मांडीवर दाखवून हरिनाथांनी ते विष्णूचा अवतार आहेत याची खात्री पटविली, असा या कथेचा संदर्भ आहे. ४१ व्या ओवींत त्यांना परमेश्वर म्हणून कोणी ओळखूं शकलें नाहीं असें म्हटलें आहे. ४२ व्या ओवींत मुंज आणि ४३ व्या ओवींत वेदाध्ययनाचें वर्णन आहे. ४४ व्या ओवींत पुन्हां एकवार हरिनाथांनी अवतार घेतल्याचें वर्णन आहे, ही ४४ वी ओवी अशी :—

श्रीहरि यण्हे नांवें विख्यातु । अवतरला श्रीअनंतु ।।
तेथिचि महिमा अद्‌भुतु । भविष्योत्तर पुराणी ।। ४४ ।।
माझी अति मंदवाणी । ते महिमा केवि वाखाणी ।।
जेयाचि वेद पुराणी । अगाध कथा ।। ४५ ।।

उघडच ४४ वी ओवी ३८ व्या ओवीचा अर्थ पुन्हा एकवार सांगणारी आहे. 'वैण गंगे'च्या तीरावर असणारी जी अंबानगरी जींत 'जगदीश्वर श्रीहरि' म्हणजे हरिनाथ प्रकट झाले त्या अंबानगरीचा अद्‌भुत महिमा 'भविष्योत्तर पुराणी' आहे असा ४४ व्या ओवीचा अर्थ आहे. ४५ व्या ओवीच्या पहिल्या २ चरणांत या अंबानगरीचा महिमा मुकुंदराजांची मंद वाणी वर्णन करूं शकणारी नाहीं असें म्हटलें असून ३८ व्या ओवीचे शेवटचे दोन चरण ४४ व्या ओवीचे पहिले दोन चरण यांत वर्णिलेल्या परमेश्वररूप हरिनाथाचा महिमा वेद व पुराणांत आहे असें सांगितले आहे. मुकुंदराजांच्या शैलीचा ही लकघ इतर अनेक ठिकाणीं पाहावयास सांपडते. उदा० ७।७१ ते ७३ ७।७८ ते ८२. १।६८ ते ७३ इ. इ. मुकुंदराजांनी आपल्या ग्रंथांत हा जो स्थलनिर्णयविषयक दुवा देऊन ठेवला आहे तो फारच महत्त्वाचा आहे. कृ. पां. कुलकर्णी यांनी तेथिचा महिमा याचा अर्थ त्या हरिनाथाचा महिमा असा केला आहे व हरिनाथाचा महिमा भविष्योत्तर पुराणी वर्णन केलेला आहे असा अर्थ लावला आहे. कृ. पां. कुळकर्णी हे भाषाशास्त्र आणि व्याकरण याचे तज्ज्ञ गृहस्थ तेथिचा हा शब्द नेहमी स्थलबोधक असतो, व्यक्तिबोधक नसतो हे आम्ही त्यांना सांगावें असें नाहीं. माणूस आग्रही असला म्हणजे पुराव्याचा विपर्यास कसा करता याचें हें उदाहरण आहे. मुकुंदराजांनी केलेले मार्गदर्शन आपण सर्वांत मोठा व अस्सल पुरावा म्हणून गृहीत धरले पाहिजे. मुकुंदराजांना अभिप्रेत असणारी अंबानगरी, भविष्योत्तर पुराणी जिचा महिमा वर्णन केला आहे अशी आहे हें उघड आहे. तर्काचा कुठलाहि दुवा आणि पुराव्याचा केवढाहि डोंगर स्वतः मुकुंदराजाच्या शब्दासमोर तुच्छ समजला पाहिजे. आणि ज्यांना सत्यसंशोधन करावयाचें आहे त्यांनी मुकुंदराजांना मान दिला पाहिजे.

आंभोर पक्षाचीं आग्रहस्थानें

मुकुंदराजांना अभिप्रेत असणारी अंबानगरी म्हणजे वैण्यगंगेच्या तीरावरील आंभोरें आहे, असें म्हणणाऱ्यांनी स्वमतपुष्ट्यर्थ जो पुरावा पुढें मांडला आहे, त्याची दखल योग्यस्थळीं आम्ही घेऊंच. पण या पुराव्यावरून जे निष्कर्ष निघतात आणि ज्या निष्कर्षांच्या आधारें आंभोर ही अंबानगरी ठरविण्याचा प्रयत्न होतो, ते निष्कर्ष डोळ्यांसमोर एकत्र असणें सोयीचें होईल. आंभोर पक्षाचा पहिला आग्रह हा कीं, अंबानगरी वैनगंगेच्या कांठीं शोधिली पाहिजे. दुसरा आग्रह हा कीं, त्या अंबानगरींत हरिनाथानें केलेला जो होम, ज्याचें वर्णन १८ व्या अध्यायांत मुकुंदराजांनी केलें आहे, त्याचें स्मृतिचिन्ह चैतन्येश्वर हें शंकराचें देऊळ पाहिजे. त्या अंबानगरींत हरिनाथाची समाधि पाहिजे आणि त्या अंबानगरीच्या आसपासच्या प्रदेशांत मुकुंदराज परंपरेचे मठ पाहिजेत. आंभोर पक्षाची उरलेलीं आग्रहस्थानें दुय्यम आहेत. एकदां हीं चार सिद्ध झालीं म्हणजे आंभोर पक्षाचा पुरावा वादातीत होतो, हें उघड आहे. या आग्रहस्थानांच्या विषयीं आम्ही इथेंच कांहीं मुद्दे उपस्थित करूं इच्छितों. पहिली गोष्ट ही कीं, मुकुंदराजांना अभिप्रेत असणारी नदी, जिच्या तीरावर अंबानगरी वसली आहे, ती वैनगंगा असेंच निश्चित नाहीं. बहुतेक पोथींत नदीच्या नांवांत मोठा 'ण' आढळतो. त्याचा उलगडा झाला पाहिजे. हा उलगडा अंबानगरीहून होणारा असल्यामुळें वैनगंगा, वैण्यगंगा, वेणुगंगा, वाणगंगा इ. भिन्न भिन्न पाठांनी प्रदर्शित होणारी नदी भंडाऱ्याजवळील वैनगंगा गृहीत धरतां येत नाहीं. खरोखरी नदीवाचक शब्दावर पाठभेदांची विलक्षण भिन्नता असल्यामुळें अंबानगरीवरून वैनगंगेची निश्चिति होणार आहे. वैनगंगेवरून अंबानगरी निश्चित होणार नाहीं. हरिनाथांनी पाशुपत व्रताच्या समाप्तिनंतर जो होम केला त्यांतून चैतन्येश्वर हें स्वयंभू शिवलिंग प्रकट झालें व या चैतन्येश्वराचें प्रतिष्ठापन झालें, असें मानण्यास विवेकसिंधूंत पुरावा नाहीं. विवेकसिंधूंत चैतन्येश्वर हा शब्द शंकर या अर्थीं अगर परब्रह्म या अर्थीं अनेकदां येतो, हें खरें आहे. पण तसाच सर्वेश्वर या शंकरवाचक शब्दाचाहि विपुल वापर आहे.

१८ व्या अध्यायांत तर एकलग ६।७ वेळेला योगेश्वराचा उल्लेख आहे. यावरून चैतन्येश्वर, सर्वेश्वर, योगेश्वर हीं नांवें सामान्यत्वें शंकरार्थी घेतलीं पाहिजेत. त्यावरून कुठलेंहि मंदिर तर्कितां येणार नाहीं हें उघड आहे. कुळकर्णी म्हणतात,निदान दोन ठिकाणीं चैतन्येश्वर हा शब्द प्रतीक देवता-वाचक आहे व चैतन्येश्वराचें मंदिर आंभोरला आहे. हीं दोन ठिकाणें म्हणजे ६।७८ आणि १८।७३. पैकीं ओवी ६.७८ हा पुरावा मुद्रणदोष असावा. कारण उपरोक्त ओवींत चैतन्येश्वर नाहीं. बहुधा कुळकर्णी यांना ३.७८ अभिप्रेत असावें. पण ज्यानें आपल्या राजस् अहंकारानें १५ तत्त्वें जन्माला आणलीं त्या परमात्मस्वरूप चैतन्यनाथाचें या ओवींत वर्णन आहे. याच ओवीच्या आगेमागें सर्वेश्वराचाहि विपुल उल्लेख आहे. शंकराच्या सात्त्विक, राजस्, तामस या शक्तित्रयाचेंहि वर्णन असून त्यांत कुठलेंहि जडशिवलिंग अभिप्रेत नाहीं. १८–७३ यांत यज्ञांतून प्रकट झालेल्या शंकराची स्तुति आहे. ही स्तुति करीत असतांना, तुम्ही चैतन्यरूप आहांत इतकेंच येथें म्हटलें आहे. तेव्हां विवेकसिंधूंत चैतन्येश्वराचा शिवलिंग या अर्थी उल्लेख नाहीं हें उघड आहे. उलट या यज्ञाचे प्रसंगीं शिवलिंग स्थापना झाली नसावी हें, स्पष्ट सूचित करणारा पुरावा मात्र भरपूर आहे. जेव्हां यज्ञामध्यें पूर्णाहुति टाकली आणि व्रतानें प्रसन्न झालेले श्रीशंकर प्रकट झाले त्या वेळीं सर्व ऋत्विजगण मूर्च्छित पडले असें १८.६२ मध्यें वर्णन आहे. त्यानंतर तेजोमय जगदीश्वर शंकर, हरिनाथाच्या मुखांत प्रवेशते झाले, याचें १८.८२ मध्यें वर्णन आहे. ऋत्विज सावध झाले त्या वेळीं हरिनाथांना ' सुलीन दसा ' प्राप्त झाली, याचें १८.९३ मध्यें वर्णन आहे. सर्व ब्राह्मणांना असें वाटलें कीं, ब्रह्मसमंध प्रकट झाला व हरिनाथाला त्यानें ग्रासलें, त्यामुळें ब्राह्मण पळून गेले असें ओवी १८.९२ म्हणते. पुढें २२ दिवस हरिनाथ ' सुलीन दसेंत ' होते. यावरून या यज्ञाच्या निमित्तानें अगर या यज्ञाची स्मृति म्हणून कुठलेंहि देऊळ, ज्योतिर्लिंग कायम झालें नाहीं हें उघड होईल. तेव्हां चैतन्येश्वर हा आंभोर पक्षाचा काल्पनिक मुद्दा आहे. कारण, कळमेश्वराच्या कागदपत्रापर्यंत चैतन्येश्वराचा कोठें उल्लेख नाहीं. हरिनाथांच्या समाधिविषयीं हें स्पष्ट लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, विवेकसिंधूंत अशा कुठल्याहि समाधीचें वर्णन नाहीं. कोणत्याहि समाधी-

समोर बसून विवेकसिंधु हा ग्रंथ लिहिलेला नाहीं. विवेकसिंधूचा आरंभ एरव्हीं निर्गुण निराकार असणाऱ्या पण भक्तासाठीं सगुणसाकार होणाऱ्या परमेश्वररूप श्रीशंकराच्या स्तुतीनें होतो. या प्रसंगीं मुकुंदराजांनी आपल्या गुरूची अगर आजेगुरूची आठवण सुद्धां केलेली नाहीं. आंभोर येथील हरिनाथांच्या समाधीविषयीं आम्हांस इतकेंच म्हणावयाचें आहे कीं, ती समाधि मुकुंदराजांचे आजेगुरु हरिनाथ यांची आहे हें, अंबानगरी निश्चित झाल्यानंतर ठरणार आहे. अंबानगरी निश्चित करण्यासाठीं तो पुरावा होऊं शकत नाहीं. कारण, हरिनाथांच्या समाधीचा उल्लेख शके १७०० पर्यंत मुकुंदराजांच्या संदर्भात सांपडत नाहीं. मुकुंदराज परंपरेंतील नागपूर-कडील मठाच्या बाबत आमचें म्हणणें असें आहे कीं, हे मठ अलीकडचे म्हणजे बकाजी रंगनाथ यांच्या नंतरचे आहेत. बकाजी रंगनाथ यांच्या आधीं मठपरंपरा अजून सिद्ध झालेली नाहीं. आणि बकाजी रंगनाथ तर नांदेडहून विदर्भात गेले. एवंच आंभोर पक्ष आणि आंभोर पक्षाकडून पुढें मांडण्यांत येणारे पुरावे, अथपासून इतिपर्यंत, अर्वाचीन, अस्पष्ट व वादग्रस्त आहेत. याला अपवाद एकच व तो म्हणजे कळमेश्वर मंदिरांतील कागद-पत्र व मुरहरबाबाचे अभंग. मुरहरबाबाचे अभंग आणि कळमेश्वर कागद-पत्र हा एकच सुस्पष्ट असा पुरावा, संपूर्ण आंभोर पक्षानें आजवरच्या चर्चेंत पुढें मांडला आहे. या पुराव्याविषयीं आमचें मत यथावकाश मांडण्यांत येईल.

विभाग 'ब'

मुकुंदराजांच्या स्थलनिर्णयाचा प्रश्न वाटतो तितका अवघड किंवा गुंतागुंतीचा असा मुळींच नाहीं. इतिहाससंशोधनाच्या क्षेत्रांतहि कित्येक वेळीं नामसादृश्य, स्थलसादृश्य, परंपरा, आख्यायिका इ. च्या मुळें किंवा प्रांतिक ईर्षेमुळें सत्यसंशोधन मागें पडून ईर्षा व अटीतटीचे असे प्रसंग निर्माण होतात कीं, त्यांचें निवारण करणें ही एक मोठी कठीण बाब होऊन बसते. अंबानगरीची स्थलनिश्चिति करण्यांत जो घोटाळा निर्माण झाला आहे, त्याचें एक कारण राजवाडे यांचें प्रचंड व्यक्तिमत्त्व व दुसरें कारण म्हणजे वैप्यगंगा हा दिशाभूल करणारा अशुद्ध पाठ, असें आम्हांला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक 3122 दि. 18/6/64

वाटतें. यामुळें आम्ही दर वेळीं मुकुंदराजांची अंबानगरी मुकुंदराजांना वाट पुसतच शोधण्याचा प्रयत्न करतों. आमचा सर्वांत मोठा भर त्यांच्या स्वतःच्या शब्दावर आहे. मुकुंदराजांनी केलेलें मार्गदर्शन खालील प्रकारें आहे :—

वैष्यगंगेच्या तीरि । मनोहर अंबानगरी ।।
तेथे प्रकटले श्रीहरि । जगदीश्वरू ।।१८.३८।।
हरियेणें नांवें विख्यातु । अवतरला श्रीअनंतु ।।
तेथिची महिमा अद्‌भुतु । भविष्योत्तर पुराणी ।।१८.४४।।

गुरुपरंपरेचें वर्णन करतांना मुकुंदराजांनी हरिनाथाच्या संदर्भांत या ओव्या वापरलेल्या आहेत. या ओव्यांवरून कांहीं गोष्टी स्पष्ट होतातः—

१) अभिप्रेत अंबानगरी वैष्यगंगेच्या तीरावर आहे.
२) ही अंबानगरी मनोहर अशी आहे.
३) हिचा महिमा भविष्योत्तर पुराणीं आहे.
४) या नगरीचें नांव अंबानगरी आहे.

क्र. १ च्या बाबत आम्ही हें पूर्वीच दाखविलें आहे कीं, वैष्यगंगेचा उलगडा अंबानगरीवरून होणार आहे. क्र. ४ हा मुद्दा नेहमीं दुर्लक्षित केला जातो. खरोखरी ज्या कोणत्या नगरीला आपण अंबानगरी म्हणणार त्या नगरीचें नांव कधींकाळीं अंबानगरी होतें हें सिद्ध करण्याची जबाबदारी कां टाळली जाते हें, आम्ही समजूं शकत नाहीं. म्हणून या मुद्द्याचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

येथेंच एक गोष्ट स्पष्टपणें सांगितली पाहिजे व ती म्हणजे भविष्योत्तर पुराणाच्या कुठल्याहि प्रतींत अंबानगरी माहात्म्य नाहीं. कु. पां. कुळकर्णी यांना या बाबीमुळें खूपच आनंद झाल्यासारखा वाटतो. त्यांनी अत्यंत आग्रहानें व डॉ. हाजारा यांच्यासारख्या पुराणक्षेत्रांतील महारथीची साक्ष उद्‌धृत करून भविष्योत्तर पुराणांत योगेश्वरी माहात्म्य नाहीं आणि म्हणून अंबानगरीहि नाहीं असें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. अंबेजोगाई पक्षाचे एक समर्थक, डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीहि योगेश्वरी माहात्म्य हा ग्रंथ विश्वसनीय कशावरून, अशी भीतभीत शंका प्रदर्शित

केली आहे. कारण हा ग्रंथ भविष्योत्तर पुराणांत आढळत नाहीं. खरोखरी हा मुद्दा इतक्या आग्रहानें सांगितला जातो हें वाचून आम्हांला निश्चित गंमत वाटली. भविष्यपुराण या ग्रंथाच्या उत्तरार्धाला भविष्योत्तर पुराण असें म्हणतात. हें पुराण युधिष्ठिराच्या प्रश्नाच्या अनुषंगानें श्रीकृष्णानें केलेल्या व्रतविवरणाचें आहे. व्रतें व त्यांचीं फलें यांखेरीज या ग्रंथांत दुसरें कांहींहि नाहीं. असणें शक्य नाहीं. कारण हा ग्रंथ व्रतमाहात्म्य ग्रंथ आहे, स्थलमाहात्म्य ग्रंथ नाहीं. तेव्हां भविष्योत्तर पुराणांत योगेश्वरी माहात्म्य हा क्षेत्रमहिम्याचा ग्रंथ नसावा हें ओघानें आलेंच. म्हणून हा मुद्दा भीतभीत किंवा आग्रहानें मांडण्यांत फारसें कांहीं चातुर्य नाहीं. आणि इतक्या उघड गोष्टीसाठीं डॉ. हाजारा यांची साक्ष काढण्याची गरजहि नाहीं. एकीकडे मुकुंदराज अंबानगरीचा महिमा भविष्योत्तर पुराणीं पाहा असें सांगतात. तो महिमा अद्‌भुत आहे, हेंहि त्यांना माहीत आहे. तर दुसरीकडे भविष्योत्तर पुराणांत हा महिमा आढळत नाहीं. याची संगति लावावयाची कशी? एक तर स्वतः मुकुंदराज पुराणांचे फारसे ज्ञाते नसावेत अगर अर्थ समजण्यांत आपली कांहीं चूक होत असावी. वरें, ही ओवी प्रक्षिप्त म्हणतां येत नाहीं, सर्वपूर्ण प्रतींत ती नेहमीं आढळते. मुकुंदराज पुराणांचे चांगलेच ज्ञाते होते, असें आमचें मत आहे. कृ. पां. कुळकर्णी यांचेंहि असेंच मत आहे. विवेकसिंधूच्या कांहीं जुन्या प्रतींत अधूनमधून समानार्थक अनेक संस्कृत उतारे आढळतात व हे उतारे कुठले हेंहि खालीं नोंदविलेलें असतें. हे उतारे सुमारें २५ ग्रंथांतले आहेत. कृ. पां. कुळकर्णी यांनी या उताऱ्यांवरून मुकुंदराजांचें वाचन किती विस्तृत असावें याचा अंदाज बांधला आहे. आमचेंहि असेंच मत आहे. या उताऱ्यांत भविष्योत्तर पुराणांतीलहि एक उतारा आहे. मुकुंदराजांनी भविष्योत्तर पुराण पाहिलें असावें व तो व्रतग्रंथ आहे हेंहि त्यांना निश्चित माहीत असावें. मग ओवी १८।४४ ची संगति कशी लावावी? याचें स्पष्टीकरण परंपरा करते. जेथें जेथें धार्मिक क्षेत्रें आहेत त्या त्या सर्व ठिकाणीं संस्कृत क्षेत्रमहिमे निश्चित आढळतात आणि हे सर्व क्षेत्रमहिमे स्वतःला विविध पुराणांचा भाग म्हणवून घेतात. कांहीं क्षेत्रमहिमे स्वतःला स्कंदपुराणांतर्गत म्हणवितात; कांहीं भविष्योत्तर पुराणांतर्गत म्हणवितात, असा हा प्रकार

आहे. हीं सर्व क्षेत्रमाहात्म्यें त्या त्या पुराणांत सांपडतातच असें नाहीं. तरीहि सर्व कर्मठ पंडित परंपरा, स्वतः पुराणांचे ज्ञाते असणारेहि, हीं क्षेत्र-माहात्म्यें, त्या त्या पुराणांत आहेत असें मानून पुढें चालतात. या परंपरेचा उल्लेख डॉ. केतकर यांनी 'शरीरखण्डांत' केला आहे. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी, पान ३७९ वर उल्लेख केला आहे (भारतीय विद्याभवन द्वारां प्रकाशित भारतेतिहास खण्ड ५ वा). अशी परंपरा संस्कृत पंडितांची आहे किंवा नाहीं हें कुठेंहि ताडून पाहतां येईल. या परंपरेचें समर्थन करणारी एक कहाणीहि सर्वत्र आढळते. ती म्हणजे अशा पुराणांच्या पूर्ण प्रती स्वर्गांत आहेत. मृत्युलोकावरील प्रती अपुऱ्या आहेत. स्वर्गलोकांतील प्रतींत हीं सर्व क्षेत्रमाहात्म्यें आहेत. ज्या वेळीं मुकुंदराज तेथिचा महिमा भविष्योत्तर पुराणीं असें म्हणतात, त्या वेळीं ते क्षेत्रमाहात्म्याचा उल्लेख करीत असतात. ओवी १८।४४ आपणाला असें सांगते कीं, अभिप्रेत अंबानगरीला एक क्षेत्रमाहात्म्य आहे. म्हणजे, मुकुंदराजांची अंबानगरी शोधण्यासाठीं आम्ही प्रथमच उल्लेखिलेली अट क्र. ३ चें परिपालन करण्यासाठीं दोन बाबी सिद्ध कराव्या लागतील :-

१) ही अंबानगरी मुकुंदराजांच्या वेळीं क्षेत्रस्थान होती.

२) या अंबानगरीला असणारें क्षेत्रमाहात्म्य असें पाहिजे कीं, त्यांत मुकुंदराज समकालीन कांहीं स्थळांचें वर्णन असावें व हीं स्थळें मुकुंदराजकालीन आहेत हें सिद्ध करतां यावें.

मुकुंदराजांनी सांगितलेल्या दिशेनें पुढें जाण्याआधीं दोन प्रश्नांचीं उत्तरें देऊं, म्हणजे चर्चेला सोयीचें जाईल. पहिला प्रश्न असा कीं, क्षेत्रमाहात्म्यें-विशेषतः जिल्हापातळीच्या तीर्थांचीं क्षेत्रमाहात्म्यें-मूळ स्वरूपांत केव्हां निर्माण झालीं असावींत ? डॉ. चटर्जी यांनी हा काळ सुमारें इ. स. १००० असा दिला आहे. विशेषतः देवीक्षेत्रांचीं स्थल-माहात्म्यें या काळांत निर्माण झालीं असावींत असें त्यांचें मत आहे. आम्हांला हें मत स्वीकारार्ह वाटतें. योगेश्वरीमाहात्म्यें इतकें जुनें आहे असा आमचा दावा नाहीं. आहे या स्वरूपांतील योगेश्वरीमाहात्म्यच मुकुंदराजांच्या काळीं होतें असें आम्हांला म्हणावयाचें नाहीं. स्वतःला

पुराणांचा भाग म्हणविणारीं, पण खरोखरीं पुराणांत नसणारीं स्थानिक क्षेत्रमाहात्म्यें इतक्या जुन्या काळपर्यंत असूं शकतात, असें आमचें मत आहे. त्यामुळें योगेश्वरीमाहात्म्य हा ग्रंथ मुकुंदराजांच्या पाहण्यांत जर आला असें म्हटलें तर तें सहज शक्य आहे, असें आम्हांला वाटतें. मात्र अंबानगरी इतक्या जुन्या काळीं तीर्थक्षेत्र होती, हें सिद्ध केलें पाहिजे.

दुसरा प्रश्न म्हणजे योगेश्वरी ही देवता मूळची देशावरील आहे काय आणि असल्यास ती किती प्राचीन आहे? देवीपूजेचा उल्लेख प्रथम यजुर्वेदाच्या वाजसनीय संहितेंत प्रथम आढळतो. शिवाची पत्नी म्हणून तैत्तरीय आरण्यकांत ती आली आहे. देवीचीं अनेक नांवें तिच्या सौम्य आणि उग्र नांवानिशीं महाभारतांत आलीं आहेत. 'मार्कंडेय' पुराणांत योगेश्वरी हें नांव प्रथम आढळतें. मार्कंडेय पुराणाचा काळ डॉ. हाजारा यांनी इ. स. ३०० ते ५०० असा दिला आहे व या आधारें योगेश्वरी ही देवता हर्षपूर्वकाळांत आढळते असें भट्टाचार्य यांनी मत दिलें आहे (भारतीय विद्याभवन भारतेतिहास खण्ड ३ रा पृष्ठ ४४२). श्री. स. आ. जोगळेकर यांच्या मतें (महाराष्ट्र परिचय) योगेश्वरी ही देवता मूळची कोंकणांतील असावी. श्री. कृ. पां. कुळकर्णी यांनीहि हें बिनबुडाचें मत खरें गृहीत धरून कोंकणस्थांचा देशांत वसाहत काळ ११।१२ वें शतक व त्या सुमारास या देवतेची इकडे प्रवृत्ति असा सूर काढला आहे. असें सर्व कोंकणस्थ, मग ते कोकणांत जरी असले तरी, ज्यांची कुलदेवता योगेश्वरी आहे ते कोंकणांतून अंबेजोगाईस येतात. यावरून ही देवता मूळची देशावरील आहे असें ठरतें. मात्र मुकुंदराजांच्या आधीं योगेश्वरीचें ठिकाण आजच्या अंबेजोगाईस होतें हें वेगळ्या पुराव्यानें सिद्ध केलें पाहिजे.

आम्ही आधींच सांगितल्याप्रमाणें, मुकुंदराजांना जी कोणती अंबानगरी अभिप्रेत आहे तिचें नांव मुकुंदराजांच्या काळीं अंबानगरी असें असलें पाहिजे. कुळकर्णी यांनी गोळा केलेल्या प्रतींतील एक अत्यंत प्राचीन प्रत 'ख' प्रत आहे. या प्रतींत मनोहर अंबानगरी असा सामान्यतः आढळून येणारा उल्लेख किंचित् फरकानें आढळतो व तो म्हणजे

'अंबा मनोहर नगरी' हा उल्लेख बराच सूचक आहे. मुकुंदराजांना थोडेबहुत उत्तरकालीन असणाऱ्या चक्रधरांनी 'खोले याचें अंबें' किंवा 'खोलनायकाचें अंबें' असा उल्लेख अंबाजोगाईविषयीं केला आहे. मुकुंदराजांच्या किंचित् पूर्वकालीन असणाऱ्या महामंडलेश्वर उदयादित्याचा शिलालेख अंबाजोगाई येथें आहे. हा शिलालेख शके १०६६ मधील आहे. या शिलालेखांत उदयादित्यानें स्वतःचा उल्लेख 'अंबासभाधिष्ठित' असा केला आहे. अंबासभाधिष्ठित याचा अर्थ सरळच 'परगणें अंबा' 'प्रांत अंबा' असा करावा लागेल. मुकुंदराजांच्या नंतर ताबडतोब येणाऱ्या खोलेश्वरानें शके ११५० च्या शिलालेखांत 'आम्रपूर' असा ग्रामनांवाचा उल्लेख केला आहे. अजून एका शिलालेखांत 'आम्रदेश लघुबाउधि' असा उल्लेख आहे. शकाच्या ११।१२ व्या शतकापासून ज्या अर्थी अंबेजोगाईचा उल्लेख 'अंबा' असा आढळतो त्या अर्थी निदान शकाच्या १० व्या शतकाच्या शेवटापासून आजतागायत हें गांव अंबें म्हणून ओळखलें जात आहे हें उघड आहे. आंबे–आम्रपूर–अंबापूर–अंबानगरी हीं नांवें सर्व अंबेशीं निगडित आहेत. यावरून अंबेजोगाईचें–देवीचें स्थान म्हणून प्राचीनत्व लक्षांत येईल. मुकुंदराजांच्या काळीं ज्याप्रमाणें अंबेजोगाईचें नांव अंबानगरी होतें हें सिद्ध करण्याजोगा पुरावा आहे त्याप्रमाणें आंभोरचें नांव कधींकाळीं अंबानगरी होतें हें सांगणारा पुरावा नाहीं. कधीं कधीं व्युत्पत्तिशास्त्राचा आधार घेऊन आंभोर हीच अंबानगरी हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. पण तो विद्वन्मान्य होणें अशक्य आहे, हें कळून चुकल्यामुळें आजकाल आंभोरचें जुनें नांव अंबानगरी होतें हें सिद्ध करण्याचा प्रयत्न चालूं आहे. खरोखरीं कळमेश्वर मंदिरांतील कागदपत्र वजा जातां इतर कुठलाहि पुरावा आंभोरचें नांव अंबानगरी होतें असें सांगणारा नाहीं. कळमेश्वर कागदपत्र असें म्हणतात कीं, शके १७३१ च्या सुमारास भोंसले सरकार यांनी अंबानगरीचें नांव बदलून आंभोर असें ठेविलें. या कागदपत्रासंबंधी आम्ही इतरत्र चर्चा करूंच; पण या ठिकाणीं इतकें सुचवतां येईल कीं, त्या आधीं आंभोरचें नांव अंबानगरी होतें असें सिद्ध करणारा कांहीं पुरावा आहे काय? किंवा भोंसले यांनी ग्रामनाम बदलण्याचा जो अव्यापारेषुव्यापार केला, त्याचा

तरी हें कागदपत्र वजा जातां कांहीं पुरावा आहे काय ? ज्या गांवाचें नांव अंबानगरी होतें हें सिद्धच करतां येत नाहीं त्या गांवाकडे संशोधकांनी एवढा ओढा कां दाखवावा, हें कळत नाहीं.

कृ. पां. कुळकर्णी म्हणतात, योगेश्वरीमाहात्म्य हा ग्रंथ योगेश्वरीच्या स्थापनेनंतरचा आहे. आणि अंबेजोगाईस योगेश्वरीची स्थापना चक्रधर उत्तरकालीन आहे. आम्ही योगेश्वरी ही देवता मूळची देशावरील हें, याआधीं दाखवलें आहेच. यापुढें जाऊन आम्ही असें म्हणतों कीं, योगेश्वरीची स्थापना अंबेजोगाईस मुकुंदराज यांच्या आधीं निदान शंभर वर्षें झाली असली पाहिजे. आम्ही वापरलेला **निदान** शब्द महत्त्वाचा आहे. चक्रधरांनी अंबानगरीचा उल्लेख खोलेश्वराच्या नांवांनी केला यावरून कृ. पां. कुळकर्णी असा अंदाज काढतात कीं, त्या वेळीं अंबेजोगाईस योगेश्वरी नसली पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे यावरून खोलेश्वर अंबानगरीचा असला पाहिजे इतकेंच सिद्ध होतें. महानुभावांच्या वाङ्मयांत आढळणाऱ्या उल्लेखांवरून अगर अनुल्लेखांवरून जर हिंदुधर्मीय देवतांचा काळ ठरविण्याचा प्रयत्न झाला तर फार गोंधळ उडेल हें, कुळकर्णी यांना माहीत तरी नसावें अगर या स्थळीं ते नेमकें विसरून गेले असावेत. योगेश्वरीचें देवालय अंबेजोगाईस होतें हें सिद्ध करणारा पुरावा सुदैवानें उपलब्ध आहे. आणि कुळकर्णी यांनी तो पुरावा बहुधा पाहिलेलाहि असावा. उदयादित्याच्या शिलालेखांत शेवटची भाक अगर शपथ योगिनीच्या नांवानें आहे. "लोपीतेआ योगिनींचा वज्रदंडु पडे"॥ असा तो उल्लेख आहे. यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात: १) उदयादित्याच्या आधीं पांचपन्नास वर्षें अंबेजोगाईस योगेश्वरीचें स्थान होतें. २) अंबेजोगाई हें परगणा असण्याइतकें मोठें गांव होतें. खोलेश्वरानें आपल्या शिलालेखांत अनेक देवालयांचा उल्लेख केला आहे. केदारेश्वर, अमरेश्वर, माणकेश्वर, सकलेश्वर इ. अनेक देवळांनी ही नगरी युक्त असल्याचा हा उल्लेख आहे. यावरून मुकुंदराजांच्या आधींच अंबानगरी तीर्थक्षेत्र झाली होती हें कळून येईल. एकाएकीं शके ११५० मध्यें देवळें उगवत नसतात. तात्पर्य योगिनी देवता प्राचीन आहे, देशावरील आहे, मुकुंदराजांच्या पूर्वीपासून अंबेजोगाई हें तिचें क्षेत्र आहे, मुकुंदराजांच्या पूर्वीपासून अंबेजोगाई हें

तीर्थक्षेत्र आहे. क्षेत्रमहिमेसुद्धां मुकुंदराजपूर्वकालीन असूं शकतात. मुकुंदराजांनी केलेला 'तेथिचा महिमा भविष्योत्तर पुराणी' हा उल्लेख या संदर्भात पाहिला पाहिजे.

विवेकसिंधूंत अंबानगरीचें वर्णन करतांना मुकुंदराजांनीच दोन वाटा दाखविल्या आहेत : १) ही नगरी मनोहर आहे आणि २) हिचा महिमा इतका अद्‌भुत आहे कीं, तो मुकुंदराजाच्यांनी वर्णिला जाणें अशक्य आहे. मुकुंदराजांनी सांगितलेली ही जी दुसरी खूण ती अभिप्रेत अंबानगरी तीर्थक्षेत्र होती हें सांगणारी आहे. मुकुंदराजांच्या काळीं अंबेजोगाई हें तीर्थक्षेत्र होतें हें सांगणारा शिलालेखांतील पुरावा आम्ही जसा पुढें मांडला आहे त्याप्रमाणें आंभोरची बाजू घेणारे संशोधक आंभोर तीर्थक्षेत्र होतें याचा पुरावा कधीं पुढें मांडीत नाहींत. मुकुंदराजांना तीर्थक्षेत्र अभिप्रेत आहे हें मागें आम्ही दाखवलें आहेच. आंभोरला क्षेत्रमहिमा असणें शक्य नाहीं. कारण आंभोर हें जुनें क्षेत्र नाहीं. आणि आजहि आंभोरला जुनें कोणतें क्षेत्र दिसत नाहीं. जर असें कोणतें क्षेत्र आंभोर असतें तर श्री. ढोकांना मराठी क्षेत्र (अंभोरें क्षेत्रमहिमा) लिहिण्याची गरज पडली नसती. १९५० मध्यें श्री. ढोक सांगतात, (पृ. ४७) "येथील त्रिवेणीचें जल अत्यंत निर्मल, थंड व पवित्र असून जो गुण भागीरथीचें जलांत आहे तोच गुण या त्रिवेणीचेहि जलांत आहे. त्याचा आम्ही प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहिला आहे." असें पुण्यप्रद पाणी भागीरथीचेंहि आहे किंवा नाहीं याबद्दल आम्हांला वाद करण्याचें कारण नाहीं. ढोकांना त्रिवेणीजल पवित्र असल्याचा जुना आधार सापडूं शकला नाहीं हेंच खरें! सर्वच क्षेत्रमहिमे अत्यंत अद्‌भुत भाषेत सांगितलेले असतात. योगेश्वरीमाहात्म्यहि असेंच अद्‌भुत आहे. येथील अनेक तीर्थांत स्नान केल्याचें काय पुण्य मिळतें यांचीं अत्यंत भडक वर्णनें या क्षेत्रमाहात्म्यांत आहेत. मुकुंदराज आणि त्यांचा काळ धार्मिक होता. मुकुंदराजांना आपली वाणी मतिमंद आहे असें म्हणावें लागलें; कारण ते स्वतः धार्मिक होते. या शब्दांनी त्यांनी क्षेत्रमहिम्याला आपली मान्यता दिली आहे. ही अंबानगरी मनोहर आहे असेंहि त्यांचेंच म्हणणें आहे. मुकुंदराजांच्या काळीं अंबानगरी कशी होती हें सांगण्यास आजचा

कोणी प्राध्यापक नको. मुकुंदराजांच्या नंतर सुमारें ४० वर्षांनी खोलेश्वरानेंच हें वर्णन खालीलप्रमाणें केलें आहे :-

॥ यस्य चां (चा) ब्र (म्र) पुरंध्रोतं भ (न) गरं भूषणं भुवः
नानाजनपदाकीर्ण नानारामोप शोभितं ॥ ५ ॥
यदन्त-र्भमस्तोकं विशालं शालशोभितं ।
उच्चं (च्य) प्राकार परिखाभूरि भैरवभासुरं ॥ ६ ॥
विचित्रेस्त्रकंशौभि.....मंडितैः ।
हृये (र्म्यै) रम्यतरैः शुभ्रैः समंतादुप शोभितं ॥ ७ ॥
स्फुरं (र) न्मणिरणक्षुद्र घंटिका तोरण ध्वजैः ।
स्मैध मस्तक विन्यस्त पताकां दौलनै रपिः ॥ ८ ॥
अनंताराधकव्रात तपोधनशता वृतैः ।
केदारांबर माणिक्य सकलेश सुरालयैः ॥ ९ ॥
यत्रभातिनभोबिंबचुंबि लंबोदरालयं ।
चतुः पथेपथश्रांत (तैः) सार्थै रनिशमाश्रितं ॥ १० ॥
यमकुंकुमनिष्यंदसंचसं.....क्र चत्वराः ।
गृहामौक्तिक भाणिक्य श्रेणिमद्रंगे मालिकाः ॥११॥
यमवातिमरूत्फुल्ल पंकजामोदसेदुरः ।
नित्यंशुद्ध वधुधैर्य हरस्यर विवर्धनः ॥ १२ ॥

या खोलेश्वर प्रशस्तींत अंबानगरीचें वैभवचित्र काव्यमय भाषेंत वर्णन केलेलें आहे. नाना जनपदानें, नाना प्रकारच्या उपवनानें, भूषित ही नगरी शालवृक्षानें सुशोभित आहे. उंचउंच असे प्राकार आणि परकोट आहेत. या नगरींत अनेक भैरव आहेत. केदारेश्वर, अमरेश्वर, माणकेश्वर, सकलेश्वर इ. गगनचुंबित मंदिरावर स्फुरण पावणाऱ्या मणिघंटिका व ध्वजतोरणें डोलत आहेत. या नगरीच्या मध्यचौकांत पथिकांना विश्रांतिस्थान असें गगनचुंबी लंबोदराचें देवालय आहे. या देवालयांत कुंकुम-केशर संमार्जनाचा, उत्फुल्ल कमळांचा व सौरभवायूचा परिमळ दरवळला आहे. असें हें अंबानगर जगाला भूषण आहे. अंबानगरी मनोहर होती किंवा नाहीं याचा हा पुरावा आहे. आंभोरचें असें मनोहरत्व मुकुंदराजांच्या काळीं पुराव्यानें सिद्ध करतां येईल काय? आंभोर पक्षाच्या समर्थकांनी

असा प्रयत्न कां करूं नये? आतांपर्यंतच्या विवेचनांत आम्ही नगरीचें नांव, तिचें मनोहरत्व, पूज्य क्षेत्रत्व, मुकुंदराजांच्या काळीं सिद्ध केलें आहे. खोलेश्वरानें व्रत-आराधना करणाऱ्या अनंत तपोधनांचा जो उल्लेख केला आहे तोहि विचारांत घेण्याजोगा आहे. दासोपंतांना जवळजवळ समकालीन असलेल्या शिवकल्याणांनी आपल्या 'अमृतानुभव टीकें' त अंबानगरीचा महिमा वर्णन करतांना असेंच म्हटलें आहे. "जे अंबानाम नगर। तेथिल हें अधिष्ठान। योगिजना विश्रामस्थान....." यावरून त्यांनाहि अंबेजोगाई हें योगिजनांचें सिद्ध व नाथांचें विश्रामस्थान आहे, हें माहीत होतें. असा एखादा उल्लेख आंभोरच्या बाजूनें दाखवतां येईल काय?

योगेश्वरी माहात्म्याचा काळ

भविष्यपुराण आणि भविष्योत्तर पुराण या ग्रंथांचा काळ साधारणपणें इ. स. १० वें शतक असा मानण्यांत येतो. कृ. पां. कुळकर्णी यांना या वाक्याचा अर्थ समजला नसावा कीं काय अशी शंका येते. कदाचित् त्यांना असें वाटत असावें कीं, हा ग्रंथ दहाव्या शतकांत लिहिला गेला. खरोखरी असें नाहीं. भविष्यपुराणाचे उल्लेख इ. स. च्या पूर्वीपासून क्रमवार दाखवतां येतील, पण सर्व पुराणांप्रमाणें याहि पुराणांत भर पडत गेली आहे व असलेल्या अवस्थेंत या पुराणाचा काळ म्हणजे परिपूर्णतेचा काळ, दहाव्या शतकाच्या सुमारास मानण्यांत येतो. सर्व पुराणग्रंथांचें असेंच आहे. मूळ स्वरूपांत हे ग्रंथ प्राचीन असतात, उत्तरकालीन भरणा होत होत त्यांची फुगवट होते व त्यांना निश्चित आकार प्राप्त होतो. स्थलमाहात्म्याचेंहि असेंच असतें. मूळच्या स्वरूपांत हे स्थलमाहात्म्य ग्रंथ फार जुने असतात. कांहीं स्थलमाहात्म्यें तर पुराणांचा भाग होऊन बसलीं हें आपण पाहतों. योगेश्वरी माहात्म्याचेंहि असेंच आहे; एखाद्या उल्लेखावरून संपूर्ण ग्रंथाचा काळ ठरविणें अशा प्रसंगीं हास्यास्पद होतें. कृ. पां. कुळकर्णी यांनी योगेश्वरी माहात्म्याचा काळ ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतें, " .....सिद्ध किंवा नाथ संप्रदायांत वेताची छडी वगैरे संप्रदाय चिन्हें धारण करण्याची प्रथा धर्मनाथापासून सुरूं झाली.....

भुताची बाधा काढून टाकण्याकरितां त्या छडीचा उपयोग करण्याची प्रथा गुरुचरित्रानंतरच्या काळांत सुरूं झाली. ज्या अर्थीं मुकुंदराजाजवळच्या वेताच्या छडीचा व बावन्न छड्या मारल्याचा उल्लेख योगेश्वरी माहात्म्यांत स्पष्ट आहे; त्या अर्थीं तो ग्रंथ १४ व्या शतकाच्या नंतरचा असावा. शिवाय योगेश्वरी माहात्म्याची रचना लौकिक आहे, आर्ष नाहीं यावरून तो ग्रंथ उत्तरकालीनच असावा." कुळकर्णी यांचें प्रत्येक विधान आम्हांला चमत्कारिक वाटतें. क्षेत्रमाहात्म्य इ. स. एक हजाराच्या सुमारार्चीं आहेत असें आम्ही म्हटलें. या काळांतील ग्रंथ आर्ष संस्कृतांत असतो काय? तो लौकिक संस्कृतांत असणार हें उघड आहे. आणि पुराणें प्रामुख्यानें लौकिक संस्कृतांत असतात. जुन्या पुराणांत कांहीं प्रयोग आर्ष येतात. त्यावरून त्यांचीं मूळ स्वरूपें पाणिनीपूर्व ठरतात. योगेश्वरी माहात्म्य लौकिक संस्कृतांत आहे यावरून फार तर तो लौकिक संस्कृतच्या उदयानंतरचा आहे हें ठरेल, जें कुणीहि नाकारणार नाहीं. योगेश्वरी माहात्म्य या ग्रंथाची प्राचीनता मूळ स्वरूपांत सुद्धां जर कुणी इ. स. १,००० च्या मागें नेत नसेल तर एका भाषाशास्त्रज्ञानें आर्ष संस्कृत कीं, लौकिक संस्कृत याचा वाद कां घालावा? धर्मनाथाच्या पासून नाथसंप्रदायांत संप्रदायचिन्हें आलीं कीं, 'कानफाटे' हा नवा संप्रदाय उदयाला आला, हें निश्चित नाहीं. कानफाटे संप्रदाय आणि नाथ संप्रदाय हे भिन्न संप्रदाय आहेत, हें सरदार मिरीकर यांचें मत आहे (ज्ञानेश्वर दर्शन भाग १). पण वेताची छडी हें संप्रदाय चिन्ह आहे काय? कानफाटे यांचें तरी तें संप्रदायचिन्ह होतें काय? श्री. मिरीकरांनी संप्रदाय चिन्हांत वेताच्या छडीचा उल्लेख केला नाहीं. खरोखरीं योगेश्वरी माहात्म्यांत मुकुंदराजांच्या हातीं 'यष्टिका' म्हणजे 'दंडा' होता असें म्हटलें आहे. योगेश्वरी माहात्म्यांत बावन्न छड्यांचा उल्लेख नाहीं. संन्याशांनी दंडा हातीं घेण्याची चाल धर्मनाथानंतरची आहे, असें म्हणणें हास्यास्पद होईल. पाशुपतशैवांनी, ते स्वतः सोटे वापरीत असल्यामुळें, शंकराच्या हातांतील 'त्रिशूळ' काढून त्याच्या हातीं 'लगुड' दिलें आहे. यावरून योगी, नाथ, सिद्ध, पाशुपत, कापालिक इ. संप्रदायाचे लोक सामान्यतः हातीं सोटा वापरीत, असा अंदाज करतां येईल. हातीं सोटा वापरणें यावरून

कालनिश्चिति करणें विचित्र होईल. योगेश्वरी माहात्म्यांत वेताची छडी नाहीं, ५२ छड्या मारल्याचा उल्लेख नाहीं, हें त्या माहात्म्यांतील जो भाग तुळपुळे यांनी, हा आक्षेप घेण्याच्या सहा वर्षे आधीं छापला आहे (म.सा. पत्रिका अंक ९६). त्यावरून उघड होईल असें वाटतें. योगेश्वरी माहात्म्याचा काळ ठरविणें हें कार्य कुळकर्णी यांना पार पाडतां आलें नाहीं, असें आमचें स्पष्ट मत आहे. नित्याप्रमाणें याहि ठिकाणीं त्यांनी दिशाभूल केली आहे.

डॉ. तुळपुळे यांनी ज्या अर्थी या ग्रंथांत मुसलमानांचा उल्लेख नाहीं त्या अर्थी हा ग्रंथ मुसलमानपूर्व कालीन असावा असें मत दिलें आहे. त्यांच्या मतें हा ग्रंथ इ. स. १२९४ च्या आधीं जातो. आम्हांला काळ ठरविण्याची हीहि पद्धति मान्य नाहीं. योगेश्वरी माहात्म्य ३० अध्यायांचें आहे. यांपैकीं अध्याय २१, २२, २३ आणि २४ हे रेणुकनाथाला सांगितलेले आहेत. २१ ते २४ अध्यायांत असणाऱ्या कथा उल्लेख्या पुराणापेक्षां उत्तरकालीन आहेत. या आमच्या मतें योगेश्वरी माहात्म्यांतील दोन पायऱ्या स्पष्ट आहेत. २१ ते २४ हे अध्याय नसणारें जुनें योगेश्वरी माहात्म्य व हे अध्याय असणारें योगेश्वरी माहात्म्य. पैकीं जुनें योगेश्वरी माहात्म्य मुकुंदराजांच्या वेळीं अस्तित्वांत असावें. कारण त्यांनी क्षेत्रमाहात्म्य पाहिलें होतें, त्यांतील अद्भुत कथा त्यांना श्रुत होत्या व हें माहात्म्य स्वतःला भविष्योत्तर पुराणांतर्गत म्हणवून घेतें. या बाबी मुकुंदराजांना ज्ञात असाव्या, हें १८।४४–४५ वरून ध्यानांत येतें. २१ ते २४ हे अध्याय रेणुकनाथाला सांगितले आहेत. याच अध्यायांत मुकुंदराज यांची कथा आहे. हे अध्याय रेणुकनाथानंतर लवकरच पूर्ण झाले असावेत. यावरून आमचा तर्क असा आहे कीं, हा ग्रंथ आहे या स्वरूपांत साधारणतः १३ व्या १४ व्या शतकांत लिहिला गेला असावा. या ग्रंथाची यापेक्षां निश्चित अशी कालनिश्चिति करणें योग्य होणार नाहीं. जुन्या आणि नव्या अशा दोन्ही योगेश्वरी माहात्म्यांत म्हणजे योगेश्वरी माहात्म्य या ग्रंथांत २१ ते २४ हे अध्याय सामील होण्याच्या आधीहि ज्या स्थानांचीं वर्णनें आढळतात तीं स्थानें निदान कांहीं अंशीं मुकुंदराजांच्या काळीं अस्तित्वांत होतीं, हें उदयादित्य व खोलेश्वर यांच्या शिलालेखावरून आढळून

येईल. यावरून मुकुंदराजांना अभिप्रेत अंबानगरी कोणती, हें स्पष्ट होईल अशी आशा आहे.

योगेश्वरी माहात्म्यांतील मुकुंदराजकथा

योगेश्वरी माहात्म्य हा ग्रंथ सुमारें २७०० श्लोकांचा आणि ३० अध्यायांचा आहे. हा ग्रंथ योगिनी देवी आणि तिच्या निमित्तानें 'योगेश्वरीचें अंबे' ऊर्फ अंबेजोगाई येथील तीर्थांचें महत्त्व सांगणारा आहे. हा सर्व ग्रंथ संपूर्णतया पुराणांच्या शैलींत लिहिला गेला आहे. एकदां दीर्घसत्राच्या निमित्तानें 'नैमिष' अरण्यांत पुष्कळसे ऋषि जमले असतांना त्यांनी सूतास 'जयंतिपुरी' ऊर्फ 'जोगाई अंबा' या नगरीची हकीकत विचारली. सूत म्हणाले, हा "प्रश्न या आधीं सनत्कुमारांनी ब्रह्मदेवास विचारला होता. त्या वेळीं ब्रह्मदेव जें म्हणाले तोच वृत्तान्त मी तुम्हांला सांगतों." अशा रीतीनें योगेश्वरी माहात्म्य, अंबेजोगाई येथील तीर्थक्षेत्रें अति प्राचीन असल्याचा दावा करीत आहे. यानंतर पहिल्या अध्यायांत योगेश्वरीच्या अवताराची कथा आहे. दुसऱ्या अध्यायापासून विविध कथा व तीर्थें आणि त्यांची पुण्य-शक्ति यांचें वर्णन आहे. प्रत्येक तीर्थ जणूं कांहीं पृथ्वीतलावरचें सर्वश्रेष्ठ तीर्थ आहे, असा या क्षेत्रमहिम्याचा दावा आहे. निरनिराळ्या पौराणिक कथा या अध्यायांतून येत असतात. अशा रीतीनें विविध कथांनी भरलेले वीस अध्याय आहेत. २१ व्या अध्यायांत रेणुकनाथाची कथा आलेली आहे. योगेश्वरी माहात्म्य हा ग्रंथ स्वतःच, २१ ते २४ या अध्यायांतील कथा कलियुगांतील संतकथा, सिद्धकथा सांगणारा म्हणजे उत्तरकालीन कथा सांगणारा, असा दावा करतो. उरलेल्या अध्यायांतील कथा कलियुगां-तील नाहींत. त्या फार प्राचीन देवकथा आहेत. २१ व्या अध्यायांत रेणुकनाथाची हकीकत आली आहे. २२ व्या अध्यायांत मुकुंदराजांची कथा आली आहे. रेणुकनाथ प्रसन्न झालेल्या श्रीशंकरांना विचारतो, "हे प्रभो! या क्षेत्रांत सिद्ध किती आहेत?" शंकर म्हणाले, "सिद्ध पुष्कळ आहेत; पण त्यांत ८-६ मुख्य असून त्यांतहि ६ सर्वश्रेष्ठ आहेत. ते म्हणजे, आनंदभैरव बुटीनाथ, मुकुंदराज, नागनाथ, सिद्धानंद ऊर्फ

परमानंद, विमलनाथ व हे रेणुका, सहाया तूं स्वतः" पुढें मुकुंदराज यांची कथा सुरू होते. मुनि मुकुंदराज अश्वदरीजवळच्या गुहेंत नेहमीं निवास करतात. त्यांनी अनेक ग्रंथ भक्तांच्यावर अनुग्रह करण्यासाठीं लिहिले. 'विवेकसिंधु' आणि 'परमामृत' या ग्रंथांचे कर्ते तेच. ते योगधारणा करीत. एकदां योगानें ते आपल्या गुहेंतून गुप्त झाले व काशीक्षेत्रीं जाऊन तिथें नेहमीं राहूं लागले. या काळीं 'जिनपाल' ऊर्फ 'जैतपाल' ऊर्फ 'जैत्रपाळ' या नांवाचा एक जैनराजा अंबाक्षेत्रीं आला. तो दुराचारी, द्रव्यलोभी व भ्रष्ट होता. अनेक प्रदेश जिंकीत तो जयंति ऊर्फ अंबेजोगाई येथें आला. त्याला सिद्धि हवी होती. त्यासाठीं त्यानें अंबानगरीस एक होम करविला. यज्ञाचे अंतीं होमकुंडांतून एक तेजस्वी बालक प्रकट झालें आणि त्या बालकानें सिद्धि मिळविण्याचा मार्ग यज्ञ नसून साधुसेवा हा आहे हें सांगितलें. या यज्ञाच्या प्रसंगीं जेथें यज्ञ झाला, त्यासभोंवती जैतपाळानें घोडे उभे केले होते. म्हणून ती जागा 'अश्वदरी' या नांवानें ओळखली जाते. यानंतर राजानें अनेक सिद्धांना बोलाविलें व अन्नसत्राला आरंभ केला. त्यामुळें या सत्रास्तव अनेक साधु जमा झाले. जैतपाळानें अनेक दिवस या सर्वांची सोय केली. एक दिवस सर्वांना तो म्हणाला, "मला, सिद्धि असेल तर ती शिकवा." साधूंनी आपणांजवळ सिद्धि नसल्याचें सांगितलें. त्यामुळें हे सर्व लबाड लोक आहेत असें ठरवून जैत्रपाळानें त्या सर्वांना चणे भरडण्याचें काम दिलें. यामुळें सर्व साधुलोक त्रस्त झाले. साधूंचा छळ होऊं लागला. ते सर्व योगेश्वरीस शरण गेले. देवीनें मुकुंदराजाची आठवण केली. मुकुंदराज पुनः साधूंचा छळ निवारण करण्यासाठीं अंबक्षेत्रीं आले. त्यांनी जैत्रपाळाला निरोप केला. जैत्रपाळाकडे जाऊन ते म्हणाले, 'अरे! तूं साधूंचा छळ करणें सोडून दे. तुला जें हवें असेल तें मी देईन. मी तुला सिद्धि देतों.' जैत्रपाळाला खात्री वाटली नाहीं. त्यानें मुकुंदराजांच्या पुढें एक जातें, त्याच्या तोंडांत हरभरे भरून ठेवलें. मुकुंदराजांनी त्यांच्या हातांतील काठी जात्यावर मारली व जात्याला आज्ञा केली. यामुळें तें जातें आपोआप फिरूं लागलें. तें पाहून जैत्रपाळाला आश्चर्य वाटलें आणि तो मुकुंदराजाला शरण आला. त्यानें सर्व साधूंना मुक्त केलें. या जैत्रपाळाला मुकुंदराजांनी जो उपदेश

केला आहे त्यांतून एक ग्रंथ निर्माण झाला तो म्हणजे 'विवेकसिंधु.' असे हे मुकुंदराज आपल्या गुहेंत राहात असतात व लोकांना क्वचित् दर्शनहि देतात. योगेश्वरीमाहात्म्यांतील मुकुंदराजकथा ही अशी आहे. या कथेंत मलयगंधर्वाचा उल्लेख नाहीं. आपोआपच दिलेल्या छडीच्या माराचाहि उल्लेख नाहीं. अश्वावरील जैत्रपाळाच्या स्तंभनाचाहि उल्लेख नाहीं. चमत्काराचा भाग जर वरील कथेंतून वजा केला तर उरणारी कथा अत्यंत साधी, सरळ व विश्वसनीय अशी कुणालाहि वाटेल, अशा स्वरूपाची आहे. आम्ही योगेश्वरीमाहात्म्यांतील हा भाग तेराव्या–चौदाव्या शतकाच्या सुमाराचा असावा असें मत या आधीं दिलेंच आहे यांचें एक कारण असें कीं, मलयगंधर्वाची कथा ही पौराणिकांना अत्यंत आकर्षक वाटणारी आहे. तिचा थोडा धागा जरी सांपडला असता तरी पौराणिकांनी त्याचा विस्तार केलाच असता. योगेश्वरीमाहात्म्यांतील २२ वा अध्याय, 'मलयगंधर्व प्रकरण' लोकप्रिय होण्याच्या आधींचा असावा असें आमचें मत आहे. याच ठिकाणीं अजून एका प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. अधूनमधून भविष्यपुराण आणि भविष्योत्तर पुराण हे ग्रंथ विश्वसनीय नाहींत, अशी भाषा संशोधकाच्या तोंडीं ऐकूं येते. याचा खरा अर्थ असा आहे कीं, पुराणें ज्या वंशावळी देतात, विशेषतः उदयनाच्या काळापासून गुप्तांच्या समाप्तीपर्यंत ते ज्या वंशावळी देतात, त्या भविष्यपुराणांत जास्तींतजास्त विकृत झालेल्या आढळतात. विक्रमादित्याच्या माहितीबद्दल भविष्यपुराण विश्वसनीय मानतां येत नाहीं. पण दहाव्या-अकराव्या शतकांतील व्रतें, आख्यायिका, समजुती या प्रश्नावरहि भविष्यपुराण अविश्वसनीय मानावें काय? इ. स. १०।११ व्या शतकापासून 'पाशुपतव्रत' प्रचलित होतें याचा आधार भविष्य अगर भविष्योत्तर पुराणांतून देणें चूक होईल काय? आम्हांला असें वाटत नाहीं. सर्वच पुराणांच्या बाबतींत हें खरें आहे. त्यांची विश्वसनीयता कांहीं क्षेत्रांत असते आणि कांहीं क्षेत्रांत सर्व पुराणें अविश्वसनीय असतात. योगेश्वरीमाहात्म्याचेंहि असेंच आहे. जेव्हां योगेश्वरीमाहात्म्य सर्वच क्षेत्रमाहात्म्याप्रमाणें 'दक्षयज्ञविध्वंस' व सतीचा देहत्याग ही कथा अंबेजोगाईच्या आसपास घडली म्हणून सांगतें, त्या वेळीं तेंहि अविश्वसनीय असतें.

'नैमिष' अरण्यांतल्या ऋषींना हें माहात्म्य निश्चितच सांगितलें गेलेलें नाहीं. पण योगेश्वरीमाहात्म्य ज्या वेळीं कोलभैरवाची कथा सांगतें त्या वेळीं अंबेजोगाईस कोलभैरवाचें देवालय होतें, योगेश्वरीमाहात्म्याच्या आधीं होतें इतक्यापुरता तो पुरावा विश्वसनीय असतो. जैत्रपाळानें केलेल्या यज्ञांतून बालक निघाल्याची कथा, मुकुंदराजांनी आपल्या आज्ञेनें जातें फिरवल्याची कथा विश्वसनीय नसते. मुकुंदराज यांचें स्थान, त्यांची जैत्रपाळाशीं भेट, या बाबी योगेश्वरीमाहात्म्याच्या काळीं अंबेजोगाईस घडल्या असें या ग्रंथावरून ठरतें व तितक्यापुरता तो विश्वसनीय असतो. पुराणग्रंथांचा इतिहाससंशोधनांत इतक्या मर्यादेंत निश्चित उपयोग असतो. आणि हा उपयोग करण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत आहे. भारतीय विद्याभवनानें प्रकाशित केलेल्या भारतेतिहासाच्या प्रथम खण्डांत पौराणिक हकीकतींवरून निश्चित केलेल्या इतिहासानें दोन प्रकरणें व्यापिलीं आहेत. पौराणिक ग्रंथ दिसला कीं, तो टाळण्याची प्रवृत्ति आतां जुनी झाली आहे.

योगेश्वरीमाहात्म्यावरून अनुमानें

योगेश्वरीमाहात्म्य हें अंबेजोगाईचें क्षेत्रमाहात्म्य आहे. एका अशा क्षेत्राचें माहात्म्य कीं, ज्या क्षेत्राला मुकुंदराजपूर्वकालीन क्षेत्रत्व होतें. या माहात्म्यांत अंबेजोगाईचा महिमा सांगणारीं अनेक अद्भुत वर्णनें आहेत. या क्षेत्रांपैकीं कांहीं क्षेत्रें मुकुंदराजपूर्वकालीन आहेत. हिंदूंच्या धार्मिक इतिहासांत तीर्थक्षेत्र आहे पण त्या क्षेत्राला स्थानमाहात्म्य नाहीं, असा काळ बहुधा नसतो. त्यामुळें मुकुंदराजांच्या काळीं योगेश्वरी माहात्म्याची कोणती तरी आवृत्ति अस्तित्वांत होती. ओवी १८।४४-४५ मध्यें मुकुंदराजांनी जो उल्लेख केला आहे. त्याची या पुराव्याशीं सांगड घालतांना मुकुंदराजांची अंबानगरी आजची अंबेजोगाईच ठरते. योगेश्वरीमाहात्म्यांतील मुकुंदराजकथा, मलयगंधर्वाच्या कथेचें मुकुंदराजांशीं सान्निध्य येण्याआधीं निर्माण झाली आहे व रेणुकनाथाच्या नंतर निर्माण झाली आहे. त्यामुळें साधारणतः या माहात्म्यांतील अध्याय २१ ते २४ रामदासपूर्वकालीन आहेत हें निश्चित. आमच्या मतें ते १४ व्या

शतकांतील आहेत. त्यामुळें १४ व्या शतकांत मुकुंदराज अंबेजोगाईचे होते हें मानलें गेलें होतें हें निश्चित. आम्ही या ठिकाणीं जी मांडणी करीत आहों त्यांतल्या एका मुद्द्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. तो म्हणजे अंबानगरीचें म्हणजेच अंबेजोगाईचें क्षेत्र म्हणून मुकुंदराजपूर्व अस्तित्व हा मुकुंदराजांच्या वेळीं योगेश्वरीमाहात्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा आहे व तोच मुकुंदराज अंबेजोगाईचे असें सांगणारा स्वतः मुकुंदराजांचा पुरावा आहे. शिवाय अध्याय २१ ते २४ हा भाग मुकुंदराज अंबेजोगाईचे हें सांगणारा १४ व्या शतकांतील दुसरा पुरावा आहे आणि हे दोन पुरावे भिन्न आहेत.

वैष्यगंगेचिया तीरीं

मुकुंदराजांनी आपली अंबानगरी वैष्यगंगेच्या तीरावर आहे असा उल्लेख केला आहे. अंबानगरीची निश्चिति केल्यानंतर वैष्यगंगेची निश्चिति करणें हा महत्त्वाचा मुद्दा राहतो. योगेश्वरीमाहात्म्यांतच ५ व्या अध्यायांत 'वाणी' गंगेचा उल्लेख आला आहे. महेश्वराच्या, लिंगाच्या अस्तित्वाचा शोध चालूं असतांना कामधेनूस साक्ष ठेवून ब्रह्मदेव खोटें बोलले त्यामुळें महादेवांनें त्यांना तुझी वाणी जलरूप होईल असा शाप दिला. ही जलरूप वाणी किंवा 'वाणनदी' गंगेस येऊन मिळाल्यामुळें तिचें नांव 'वाणी गंगा' किंवा 'वाणगंगा' असें पडलें. याच नदीचें 'ब्रह्मवाणी' हेंहि दुसरें नांव आहे. ही 'वाणगंगा' केज-धारूरच्या डोंगरांतून निघते व जोगाईआंब्यास बुटीनाथाच्या जवळून वाहात जात बीड जिल्ह्यांत तालुका 'माजलगांव' सोनपेठ मुक्कामीं गोदावरीस येऊन मिळते. हा वाणगंगा संगम प्रसिद्ध असून या संगमाच्या कांठीं 'वाणीसंगम' या नांवाचें गांवहि वसलें आहे. प्रणितापाईननदी गंगेस मिळाल्यामुळें जसें तिचें पेणगंगा हें नांव प्रचारांत आलें तसेंच वाणीनदी गोदावरीस मिळाल्यामुळें तिचें नांव वाणगंगा प्रचारांत आलेलें दिसतें. या वाणगंगेचा उल्लेख योगेश्वरीमाहात्म्यांतच आहे असें नसून ब्रह्मपुराणांतर्गत गोदावरीमाहात्म्यासारख्या प्रसिद्ध धार्मिक ग्रंथांतहि या नदीचा उल्लेख आढळतो. "सरस्वती संगमश्च वाणी संगम एवच। गौतम्या संगतादेवी वाण्येवच

सरस्वती ॥२२॥ ब्रह्मविधुय वाग्दोष्टय स्वंच धामागमत्पुनः । तस्मात तम शुचिर्भुत्वा स्नात्वातमत्र संगमं ॥२३॥. गौतमीमाहात्म्य अध्याय ६६.

उमरीकर संत सदानंद ऊर्फ बाबामहाराज यांच्या पूर्वजाकडे अंबेजोगाई येथील मुकुंदराजांच्या समाधीची पूजा अर्चा करण्याचें काम होतें. त्यांनी 'देशिक लीलामृत' या ग्रंथांत मुकुंदराजांचा व वाणगंगेचा उल्लेख पुढीलप्रमाणें केला आहे :–

जाउनि मुकुंदराज विवरी । वंदन केले पादुकेला ॥
चरणीं वाहती जयंति । वाणगंगेशी मिळती ।
बुटीनाथा खालती । संगमाशी स्नान केले ॥
शंकराचार्य अवतार । ज्याने ख्याति केली अपार ।....
विवेकसिंधु नामाभिधान । ग्रंथरचना केली असे ॥
अठरा दिवस पर्यंत । जैतपाळाशी बोधसमस्त ।
करूनि रचिला साग्र ग्रंथ । अष्टादशाध्यायी ॥

यावरून मुकुंदराजांनी उल्लेखिलेल्या नदीचें मूळ नांव 'वाणगंगा' असल्याचें कळतें. पाठभेदांत 'वैण्यगंगा–वेणगंगा–बाणगंगा' इ. 'ण' कार युक्त पाठ कां यावे हें कळतें. मुकुंदराजांनी जो वैण्यगंगेचा उल्लेख केला आहे त्या नदीवरून नगरीची निश्चिति किती घातक ठरेल हेंहि कळतें. श्री. डोळके यांनी पदपाठांत येणाऱ्या 'ण' काराचें न बोलतां मोठें मजेदार समर्थन केलें आहे. त्यांनी सर्वत्र वैणगंगेचिया तीरि । मणोहर आंबाणगरी असा पाठ वापरून 'मनोहर' मध्यें 'न' चा 'ण' तसाच अंबानगरीत 'न' चा 'ण' घालून वैण्यगंगेचें मूळ रूप मजेदार रीतीनें वैनगंगा असावें हें सुचविलें आहे. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कळमेश्वर कागदपत्रांनी नदीचें नांव वैण्यगंगा देऊन 'ण' चें स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे पण बाणगंगा या पदपाठाचें काय? एकंदरींत पदपाठांचा विचार करतां मूळचा मुकुंदराजकृत पाठ 'वाणगंगा' असा असावा यांत आम्हांला मुळींसुद्धां संशय नाहीं.

हरिनाथ कथा

मुकुंदराजांचे आजेगुरु हरिनाथ यांचा उल्लेख योगेश्वरीमाहात्म्यांत आढळत नाहीं, हें न नाकारतां येण्याजोगें सत्य आहे. आम्हीं हरिनाथांचा यज्ञ जेव्हां झाला त्या वेळीं कुठलेंहि मंदिर स्थापन झालें नाहीं याची चर्चा मागें केलीच आहे. तेव्हां चैतन्येश्वराच्या देवळावरून हरिनाथाला आंभोरला खेचण्याचा प्रयत्न अशास्त्र आहे हें उघड होईल. तरी सुद्धां हरिनाथांचा योगेश्वरीमाहात्म्यांतील अनुल्लेख खटकतो यांत शंका नाहीं. ज्यांनी मूळच्या योगेश्वरीमाहात्म्यांत अध्याय २१ ते २४ यांची भर घातली त्यांना फारसें ऐतिहासिक ज्ञान नव्हतें हें उघड आहे. पण असें जरी असलें तरी हरिनाथ यांच्याशीं निगडित असणारे कांहीं संकेत योगेश्वरीमाहात्म्यांत उल्लेखिले आहेत हें महत्त्वाचें आहे. हरिनाथ हें विष्णूचे अवतार आणि त्यांच्या मुखांत शंकरानें प्रवेश केला हें ओवी १८।४० आणि ८२ यांवरून स्पष्ट होईल. अध्याय २३ वा यांत रेणुकनाथाच्या तोंडीं एक प्रश्न आहे. रेणुकनाथ विचारतो, प्रभो ! या ब्रह्मवाणीच्या कांठीं देव हरिहरात्मक आहेत असें एकतों आणि महादेवांनी तें मान्य केलें आहे. दुसरें म्हणजे हरिनाथांनी केलेल्या होमांतून श्रीशंकर प्रकट झाले ही कथा ५ व्या अध्यायांत विष्णुमित्र नांवाच्या एका ब्राह्मणानें घनघोर तप करून त्यानंतर जो यज्ञ केला आहे त्यांतून ज्योतिर्मय नीलकंठ प्रकट झाल्याचें वर्णन आहे. तिसरें म्हणजे शंकराची भेट झाल्यावर हरिनाथांना 'सुलीन दसा' प्राप्त झाली. २३ व्या अध्यायांत रेणुकानें महादेवाशीं आलिंगन घेतल्यानंतर त्याचीहि अशीच अवस्था झाली आहे. आमचें असें मत आहे कीं, योगेश्वरीमाहात्म्यांत जयंतिवाणीसंगमावर देव हरिहरात्मक रूपानें राहतात अशी जी कथा आली आहे व जीमुळें आजहि अंबेजोगाईस हरिहरतीर्थ दाखवलें जातें ती जागा म्हणजे ज्या ठिकाणीं हरिनाथांनी पाशुपतव्रतसमाप्तीनंतर यज्ञ केला व ज्यांतून श्रीआदिनाथाची स्वयंज्योति प्रकटली तें स्थान होय. हरिनाथ आणि शंकर यांच्या भेटीची जी कथा विवेकसिंधूंत आहे तिचें हें पौराणिक परिवर्तन झालेलें असावें. अर्थातच आम्ही याबाबत निश्चित कांहीं विधान करूं इच्छीत नाहीं. एक कल्पना किंवा अनुमान आम्ही येथें सूचित केलें आहे इतकेंच.

योगेश्वरीमाहात्म्य व अंबेजोगाई यांची एकवाक्यता

योगेश्वरीमाहात्म्यांत ठिकठिकाणीं वाणीनदीचा, जयंतिनदीचा, अंबेचा आणि योगेश्वरी अंबानगरीला असल्याचा उल्लेख आहे. हें मुद्दाम सांगण्याचें कारण म्हणजे मुकुंदराज ज्या ठिकाणीं जैत्रपाळाला भेट देण्यासाठीं आले तें त्यांचें स्वक्षेत्र अंबें होतें हें लक्षांत घेतलें पाहिजे.

निष्कर्ष

आम्ही सुरुवातीलाच ज्या ४ अटी सांगितल्या आहेत त्यांची परिपूर्ति फक्त अंबेजोगाई हेंच ठिकाण करूं शकतें हें आम्ही येथवर दाखवलें आहे. क्रमानें त्या अटी आम्ही एकत्र मांडतों :–

१) मुकुंदराजांना १८।४४–४५ प्रमाणें तीर्थक्षेत्र अभिप्रेत आहे. अंबेजोगाई मुकुंदराजांच्या वेळीं तीर्थक्षेत्र असल्याचा पुरावा आहे. आंभोरच्या बाबत असा पुरावा नाहीं. आंभोर हें पौराणिक अर्थानें तीर्थक्षेत्र नाहीं. मुकुंदराजांना भविष्योत्तर पुराणीं या शब्दानें संस्कृतक्षेत्रमाहात्म्य अभिप्रेत आहे व तें फक्त अंबेजोगाईसच आहे. आंभोरला नाहीं.

२) शकाच्या ११ व्या शतकापासून अंबेजोगाईस योगेश्वरीचें देवालय आहे व त्या नगरीचें नांव अंबानगरी असल्याचें सिद्ध आहे. आंभोरचें नांव अंबानगरी असल्याचें सिद्ध नाहीं. मुकुंदराजांच्या वेळीं आंभोरचें नांव अंबानगरी होतें याला पुरावा नाहीं.

३) ही अंबेजोगाई मुकुंदराजांच्या काळीं मनोहर व वैभवसंपन्न होती हें सिद्ध आहे. आंभोर कधीं काळीं मनोहर म्हणण्यासारखें होतें हें सिद्ध नाहीं.

४) अंबेजोगाईस अभिप्रेत वैण्यगंगा आहे. तिचें मूळ नांव वाणगंगा. अंबेजोगाईस हरिनाथकथेच्या स्मृति आहेत.

५) चैतन्येश्वर सिद्ध नाहीं.

म्हणून या जास्तींत जास्त प्राचीन पुराव्यांचा विचार करतां मुकुंदराजांची अंबानगरी अंबेजोगाई ठरते, आंभोर ठरत नाहीं.

विभाग 'क'

विवेकसिंधुकार मुकुंदराज हे अंबेजोगाईचे होते यासंबंधी अगर अंबेजोगाई येथील त्यांच्या समाधीसंबंधीं ज्या अनेक ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे त्यांचा एकत्र असा आढावा या विभागांत घ्यावयाचा आहे. त्या आधीं एका मुद्द्याकडे लक्ष वेधलें जाणें आवश्यक आहे. आपल्या विवेकसिंधूच्या चिकित्सक आवृत्तींत श्री. कृ. पां. कुळकर्णी यांनी ६३ पानावर असें एक मत मांडलें आहे कीं, मुकुंदराज हे अंबेजोगाईचे नसतांना ते अंबेजोगाईचे असावेत अशी भूमिका कां घेतली जावी? त्यांच्या मतें कुणी तरी उत्तरकालीनानें मुकुंदराजांची समाधि अंबेजोगाई येथें स्थापन केली असावी व त्यामुळें हा पक्ष उद्भवला. ही क्रिया कृष्णदयार्णवाच्या किती तरी वर्षें आधीं घडून गेली असावी किंवहुना रामदासांच्याहि आधीं मुकुंदराज अंबेजोगाईचे (पृष्ठ ६४) अशी समजूत दृढ झाली असावी. आम्हांला या भूमिकेचा अर्थच कळूं शकत नाहीं. रामदासांच्या वेळीं मुकुंदराज अंबेजोगाईचे होते असा समज सर्वत्र होता, हें श्री. कुळकर्णी मान्यच करतात. मग रामदासांच्या वेळीं अस्तित्वांत असणारा हा समज खरोखरीं उत्तरकालीन समज आहे, हें दाखवण्याचा जो शास्त्रीय मार्ग तो म्हणजे केव्हां तरी रामदासांआधीं मुकुंदराजांचा आंभोरशीं संबंध जोडणारा पुरावा दाखल करणें हा होय. हा पुरावा मात्र ते देत नाहींत. असा पुरावा कीं, ज्यामुळें कृष्णदयार्णवपूर्वकालीन कोण्या तरी काळीं मुकुंदराज आंभोरचे असल्याचें अगर जैत्रपाळ भोपाळचा असल्याचें प्रतिपादन करील असा उपलब्ध नाहीं, हें स्पष्ट आहे. त्यामुळें हा समज अमुक काळापासून असावा या पद्धतीच्या मांडणीला कांहींहि महत्त्व आहे असें वाटत नाहीं.

चक्रधरस्वामीच्या एका लीलेंत खोलनायकाचें अंबें असा उल्लेख आहे. त्या अर्थीं चक्रधरांच्या वेळीं मुकुंदराजांचें अंबें असावें, असा अर्थ काढणें फारसें बरोबर होणार नाहीं. चक्रधरस्वामी अंबानगरीचें वर्णन करीत नव्हते. अंबानगरीस काय काय आहे यांचेंहि वर्णन करीत नव्हते. तो फक्त एक तुटक उल्लेख वेगळ्या संदर्भात आहे. त्यावरून कांहींहि

ठरणार नाहीं. कारण असा सर्व साधुसंतांचा ग्रामनामांशीं संबंध जोडला जात नसतो. ज्या गांवीं एखाद दुसरा संत असेल त्या गांवचें ठीक आहे. पण ज्या गांवीं मुकुंदराजांच्या पूर्वकालीं, समकालीं, उत्तरकालीं अनेक देवदेवळें, अनेक सिद्ध साधुसंत आहेत त्या गांवाचे बाबतींत एकाचा उल्लेख इतरांचा अनुल्लेख ठरत नाहीं.

दासोपंतांच्या वाङ्मयांत मुकुंदराजांचा उल्लेख नाहीं असा एक मुद्दा मांडला जातो. जणूं दासोपंतांचें प्रचंड वाङ्मय सगळेंच्या सगळें कोणी चाळलें आहेच ! गेल्या अनेक वर्षांत सगळा दासोपंत कुणीच वाचलेला नाहीं. त्यामुळें दासोपंत यांच्या वाङ्मयाच्या बाबत भलतेंच विधान करण्याच्या आधीं दासोपंत यांनी कुणाकुणाचा उल्लेख केला आहे, उल्लेख करण्याची दासोपंतांची रीत कोणती, मुकुंदराजांचा त्यांनी उल्लेख केला आहे काय याबाबत कांहींहि विधान करणें बरोबर नाहीं. दासोपंतांना समकालीन नित्यानंदसुत शिवकल्याणानें आपल्या अमृतानुभव टीकेंत अंबेजोगाईचा योगिजनाश्रमस्थान असा उल्लेख केला आहे. त्यांतील स्वारस्य काय ? कृष्णदयार्णवांच्या काळीं मुकुंदराज अंबेजोगाईचें होते हें सिद्ध आहे. मग दासोपंतांनंतर मुकुंदराजांची समाधि अंबेजोगाईस आली काय ? तेव्हां दासोपंतांचा आधार घेऊन कांहीं अर्थ नाहीं. एवंच अंबानगरी म्हणजे अंबेजोगाई या विधानाच्या विरोधी जाणारा पुरावाच फारसा अस्तित्वांत नाहीं.

१) आमच्या मतें मुकुंदराज अंबेजोगाईचे असें दाखवणारा पहिला, सर्वांत जुना व सर्वांत विश्वसनीय पुरावा म्हणजे खुद्द मुकुंदराज. त्यांची ओवी १८।३८, ४४,४५ इतका मोठा दुसरा पुरावा आमच्या जवळ नाहीं.

२) योगेश्वरीमाहात्म्याच्या अंतिम संकलनाचा काळ उघडच मुकुंदराजोत्तरकालीन आहे. आमच्या मतें हें संकलन १४ व्या शतकांत येतें. कुळकर्णी यांच्या मतें १५ व्या शतकांत येतें. तरीसुद्धां योगेश्वरीमाहात्म्यांतील २२ वा अध्याय व त्यांतील मुकुंदराजकथा हा प्राचीनत्वाच्या दृष्टीनें इतर कुठल्याहि पुराव्यापेक्षां जुना पुरावा, छडी मारण्याचे व अश्वस्तंभनाचे जे पुरावे आहेत त्या सर्वांपेक्षां हा जुना पुरावा आहे.

क्रमांक ...1334... नोंद दि. ...
25-9-...

३) शिवकल्याणांनी आपल्या अमृतानुभवावरील 'नित्यानंद-दीपिका' या टीकेंत आपल्या पूर्वजांची माहिती देतांना आपले पूर्वज योगेश्वरीच्या नगरांत अर्थात् 'अंबानाम नगर' या गांवीं राहात होते व हें आपल्या पूर्वजांचें गांव योगिजनाविश्रामस्थान होतें असें म्हटलें आहे. हा उल्लेख स्पष्ट नाहीं, हें उघड आहे. पण तो सूचक आहे. शिवाय नित्यानंदाच्या काळापूर्वी अनेक वर्षें योगीजनांचें अंबानगरी स्थान होतें, हें यावरून ठरतें. योगेश्वरीमाहात्म्यांतील अध्याय २१ ते २४ नित्यानंद-पूर्वकालीन आहेत याचीहि सूचना आहे. या ग्रंथाचा काळ शके १५५७ आहे.

४) 'हरिवरदा' या ग्रंथाचे कर्ते प्रसिद्ध कृष्णदयार्णव यांचा बराचसा काळ अंबेजोगाई येथें व्यतीत झाला. कृष्णदयार्णवाचे गुरु श्रीगोविंद, अंबेजोगाईस शके १६१७ मध्यें गोविंदस्वामीकडून कृष्णोपासनेचा दीक्षामंत्र त्यांना मिळाला. कृष्णदयार्णवांनी मुकुंदराजांना नमन करणारी आरती लिहिली आहे. अर्थात्च कृष्णदयार्णवांना मुकुंदराज अंबेजोगाईचे हें अभिप्रेत आहे, हें सर्वमान्य आहे. हा पुरावा शके १६६० च्या सुमाराचा आहे. कृष्णदयार्णवांनी आपल्या आरतींत जैत्रपाळाचाहि उल्लेख केला आहे. निदान कृष्णदयार्णवांना मुकुंदराजांचें स्थान आंभोर असल्याचें ज्ञात नव्हतें हें उघड आहे. त्यांच्या वेळीं आंभोर पक्ष नव्हता.

५) अंबेजोगाईस राहणाऱ्या गणेशनंदनाचा परिचय 'प्रतिष्ठान' मासिकांत बी. लक्ष्मीकान्त यांनी करून दिला आहे. (फेब्रुवारी १९५४). या गणेशनंदनानें योगेश्वरीची एक आरती रचली आहे ती अशीः—

सुक्षेत्र अंबापुरी । माय योगेश्वरी ॥
धन्य ते नांदत आहे । जगन्माता सुंदरी ॥
अवतार पार्वतीचा । वदे वेदवैखरी ।
केदार नृसिंह तीर्थ । मूळपीठ रेणुका ॥
सकलेश्वर अश्वदरा । मुकुंदराजाची गुंफा ॥
बुटेदरडी शुभ्र खडा । काळभैरव निका ॥
आत्मतीर्थ रेणुवती । सिद्धस्थळीं अंबिका ॥

गणेशनंदाचा काळ शके १६७६ च्या सुमाराचा आहे.

प्रा. डोळके म्हणतात, शके १७३१ च्या आधींचा अस्सल व स्पष्ट पुरावा मिळाल्यास आपण तो मानण्यास तयार आहों. पुराव्याच्या बाबतींत ते फार अल्पसंतुष्ट दिसतात. कुळकर्णी यांच्याप्रमाणें १६७६ च्या सुमाराचा पुरावा दाखवतांच मुकुंदराज अंबेजोगाईचे, ही उत्तरकालीनांची समजूत, असा तेढा मार्ग अवलंबिण्याइतकी चतुराई ते दाखवूं इच्छीत नाहींत.

६) उद्धवसुतकृत 'रामदासचरित्रां'त रामदासी परंपरेंतील या कवीनें मुकुंदराजांचा उल्लेख केला आहे. ३९ व्या अध्यायांत जैत-पाळाची कथा आली आहे. उन्मत्त व विषयी मलयगंधर्वाला मिळालेला शाप व पूर्णोद्धार होण्याआधीं त्याचे झालेले तीन जन्म यांचा पहिला आढळ उद्धवसुतांत होतो. उद्धवसुतानें सर्वप्रथम घोड्यावर बसलेल्या जैत्रपाळाला स्तंभित केल्याचा मुद्दा मांडला आहे. मुकुंदराजांच्या हातीं असणारा वेत व त्यांनी जैत्रपाळाच्या घोड्याला मारलेल्या ५२ छड्या याचा उल्लेख प्रथम उद्धवसुतांत येतो. उद्धवसुताच्या या चरित्राचा काळ शके १६९६ असा आहे. उद्धवसुतानें ३९।३५ मध्यें जोगाईअंब्याचा. स्पष्ट उल्लेख केला आहे. हा कवि वऱ्हाडांतील सुरजीअंजनगांवचा यावरून उद्धवसुताच्या काळीं वऱ्हाडांत मुकुंदराज व मलयगंधर्व यांच्या कथांचें एकीकरण झालें व त्या वेळीं वऱ्हाडांत मुकुंदराज जोगाई अंब्याचे होते हेंच मानलें जात होतें हें स्पष्ट आहे.

७) महिपतीच्या संतविजयाचा काळ शके १७१० असा समजला जातो. त्यानें आपल्या संतविजयाच्या अध्याय १९ ते २१ मध्यें मलय-गंधर्वाची कथा सांगितली आहे. मुकुंदराजांच्या हातांतील वेत, मलयगंधर्व व त्याला शाप आणि घोड्यासहित ५२ छड्या मारतांच 'स्तंभन' या बाबी महीपतींत आहेत. त्या उघडच उद्धवसुतांतून घेतल्या आहेत. महीपती राहणारा नगर जिल्ह्यांतील ताहाराबादचा. यावरून १७१० मध्यें पश्चिम महाराष्ट्रांत वऱ्हाडांतील कथा पोंचली होती व मुकुंदराज अंबेजोगाईचे असें मानलें जात होतें हें उघड होईल.

८) आत्मारामाच्या 'दासविश्रामधामा'चा काळ शके १७२५ हा मानला जातो. या ग्रंथांत रामदासी परंपरेची इतकी विविध हकीकत

आहे कीं, हा ग्रंथ रामदासीपंथाचा विश्वकोश मानला जातो. याहि ग्रंथांत मुकुंदराजांचा अंबेजोगाईशीं संबंध २६ व्या अध्यायांत अनेक ठिकाणीं आहे. मलयगंधर्वकथा, वेत, ५२ छड्या व घोड्यासहित स्तंभन हेंहि आहे. समर्थ रामदासस्वामी मुकुंदराजांना भेटण्यासाठीं अंबेजोगाई येथें आल्याचें वर्णन आहे.

९) राजाराम प्रासादिकृत 'भक्तिमंजरि' या ग्रंथाचा काळ शके १७५६ असा आहे. या ग्रंथाच्या ६९ व्या अध्यायांत पुन्हां उद्धवसुत परंपरेची सर्व हकीकत आली आहे. अंबेजोगाईचा स्पष्ट उल्लेख आहे.

१०) डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूटमधील क्र. ६८-६८ पोथींतील १४ व्या प्रकरणाच्या शेवटीं माधवदत्ताची आरती आली आहे. या आरतींत माधवदत्तानें मुकुंदराज व रामदास यांचा संबंध जोडला आहे. अर्थातच हा उल्लेख माधवदत्तानें दासविश्रामधामावरून घेतलेला असावा असें म्हणतां येईल. माधवदत्ताचा काळ सांगतां येत नाहीं. पण तो दासविश्रामधामाच्या नंतरचा असावा. आमच्या मतें मलयगंधर्वाची व ५२ छड्यांची सर्व हकीकत विदर्भांत जन्माला आली आहे व ही कथा मुकुंदराज अंबेजोगाईचे असें गृहीत धरणारी आहे. ज्या ज्या ग्रंथांत वैष्यगंगेतीरि । मनोहर अंबानगरी, असा मोघम उल्लेख करून पुढें मलयगंधर्वकथा येते, त्या सर्वांनी आपल्या हकीकती उद्धवसुत, आत्माराम अगर महीपती यांवरून घेतलेल्या आहेत. त्यामुळें अशा सर्व ठिकाणीं त्या त्या ग्रंथकारांना अंबानगरी म्हणजे अंबेजोगाई अभिप्रेत आहे हें गृहीत धरावें लागतें. ज्या ग्रंथकारांनी रामदासांचा मुकुंदराजांशीं संबंध जोडलेला आहे ते सर्व मुद्धां आत्मारामानुसारी आहेत असें मानावें लागतें. म्हणजे तेहि अंबेजोगाईवादी आहेत. जोंपर्यंत अशा ग्रंथांत स्पष्ट विदर्भाचा, आंभोरचा, खेडल्याचा, भोपाळचा उल्लेख नसतो तोंपर्यंत या ग्रंथकारांनी आपलीं मतें पूर्वानुसारी ठेविलीं आहेत असें गृहीत धरणें भाग पडतें.

११) मुकुंदराजांच्या अंबेजोगाई येथील समाधीच्या पूजानैवेद्याकरितां वेदमूर्ति विश्वनाथभट, सायगांवकर यांना हिजरी सन ११६६ मध्यें दिल्या गेलेल्या सनदेची नक्कल उपलब्ध झाली आहे. त्यांत

मुकुंदराजस्वामी यांच्या समाधीच्या पूजानैवेद्याकरितां आठ आणे योमिया करून दिल्याचा उल्लेख आहे. विश्वनाथ ऊर्फ विसाजी सायगांवकर हे धारूरच्या उद्धव चिद्घन यांचे वंशज. बहुधा मुलीचे वंशज असावेत. हे अंबेजोगाईस येऊन स्थायिक झाल्यावर त्यांना ही सनद मिळाल्याचें दिसतें:-

श्री.

श्रीमुकुंदराजस्वामी

फारसी दस्तखत	मोहर सवाई	अस्सल व मोजिब नक्कल

रावसाहेब. मेहरबान दोस्तान रघुपतराव सरनायब त॥ सदोपण तर्फ कोकन बंदर सिमहु आज तर्फ राय लक्ष्मीनारायेन रामराम. उपरी माहराज समर्थ वैकुंठवासी यांचे समाधि जेग प्रसिद्ध आंबाजोगाई येथे आहे. त्याचे पूजानैवद्येकरतां दररोज ·॥· आणे इ॥ गुरसेवाल सन १२६६ हिजरीपासून नेमनूक मुकरर करून दिल्ही आहे. वेदमूर्ति विश्वनाथ भटजी सायगांवकर यासी तेथील पूजा नैवेद्यावद्दल नेम केला आहे. तर वेदमूर्ति मजकूर आपणाकडे येतील. त्यासी रोज सदरीप्रमाणें देऊन रसीद घेत जाणें. धर्मकार्य आहे कळावें.

फार्सी ता २५ माहे रमजान सन १२६६ हि.

१२) याच वंशांत सदानंद ऊर्फ बावामहाराज उमरीकर हे प्रसिद्ध संत व सत्पुरुष अलीकडे होऊन गेले. यांचें कवित्व व विविध ग्रंथरचना विपुल आहे. त्यांच्या 'देशिक लीलामृत' या एका ओवीबद्ध ग्रंथांत अंबेजोगाईच्या वर्णनांत मुकुंदराजांचा उल्लेख आला आहे. वाणगंगेच्या संदर्भात आम्ही मागें तो उतारा दिला आहेच. 'देशिक लीलामृता' च्या ५ व्या अध्यायांतील तो उतारा आहे.

१३) आमचे मित्र व संशोधक श्री. न. शे. पोहनेरकर यांचे संग्रहीं शिला प्रेसवर छापलेला प्राचीन भारतकोश आहे. ही प्रत त्रुटित आहे. पण तींत 'जोगाईचे अंबें' हें क्षेत्र वैणगंगेच्या कांठीं आहे यास कोणी नुसतें अंबेंहि म्हणतात, येथें डोंगरांत एका दुर्गम कडयावर मुकुंदराजांची समाधि आहे, ती समाधीची जागा इतकी संकुचित आहे कीं,

तेथें पराकाष्ठेंच तीन माणसें वसतील, असा पृष्ठ १८ वर उल्लेख आहे. हा ग्रंथ फारसा जुना नसावा हें उघड आहे. मराठींत छापल्या गेलेल्या पहिल्या वहिल्या ग्रंथांपैकीं तो एक असावा. भारतकोश लिहिणाऱ्याला सुद्धां ज्यानें सर्वत्र फिरवून माहिती गोळा केली असेल त्याला सुद्धां आंभोर पक्षाचा आढळ त्याच्या काळीं झाला नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, राजवाडे यांच्या आधीं मुकुंदराज आंभोरचे असावेत, असें कुणी म्हटलेंच नाहीं. त्याचा हा पुरावा आहे.

१४) १९१८ सालीं प्रसिद्ध झालेल्या औरंगाबाद गॅझिटियर-मध्यें अंबेजोगाईच्या वर्णनांत मुकुंदराजांसंबंधीं थोडी माहिती दिलेली आढळते. विवेकसिंधूच्या १८ व्या अध्यायांतील माहितीच मुकुंदराजांच्या नांवें या लेखकानें घातली आहे. ही माहिती देतांना अर्धवट ज्ञान असणाऱ्या या लेखकानें (आणि तो बहुधा युरोपियन असणार.) पुष्कळच विपर्यस्त विधानें केलीं आहेत; पण हा उतारा उद्धृत करण्याचा हेतु हा कीं, १९१८ सालीं गॅझिटियर लिहिणाऱ्यांच्या पर्यंत आंभोर पक्ष येऊन पोंचला नव्हता. राजवाडे यांचें लिखाण अजून त्याच्यासमोर आलें नव्हतें. तो उतारा असाः-

Mukund Raj

"This author was born at Ambe jogai on the Banganga and flourished towards the end of the 12th century. He was a Smarth Brahmin of the Madhyandin Shakha, who propiciated Shiv at twelve years of age and then propiciated Dattatraya Muniswar and guru Shanker on the banks of the Gautami (Godavery). Later in life he practised Raj-Yog and became a great Sadhu. His tomb or Samadhi is near the town of Ambejogai. Mukund Raj wrote several works, but few of them are to be met with at

present day. The Vivek Sindhu and Paramamrit are Metaphysical Patheistic works and Mul-Stambha in Praise of Shiv. Mukund Raj has given the following Succesion of his Gurus — Adinath—Harinath and Raghunath and he himself is said to have been the Guru of Jaitrapal Raja. He also mentions Narsinhum, Ballal (Bhillam), Jaitpal of the Yadav dynasty.

(Aurangabad Gazeater)

बैतुल गॅझिटियर १९०७ मध्यें छापलेलें आहे असें दिसतें. बैतुल गॅझिटियर कुळकर्णींनी संदर्भग्रंथांत दाखल करून घेतलें आहे. आंभोर पक्ष हा राजवाडे यांच्या शके १८३५ मधील लेखांतून निर्माण झाला असें आम्ही म्हणतों. पण बैतुल गॅझिटियर आम्ही पाहिलेलें नाहीं. बैतुल गॅझिटियरच्या १९०७ च्या या आवृत्तींत मुकुंदराज आंभोरचे आहेत अगर मुकुंदराजांनी उपदेश केलेला जैत्रपाळ भोपाळचा आहे असा एखादा उल्लेख जर असतां तर आंभोर पक्ष खरोखरीं विदर्भांतील जनसामान्यांच्या समजुतींतून उगम पावला आहे कीं, विद्वानांच्या पुस्तकांतून उगम पावला आहे हें निश्चित करतां आलें असतें. मुकुंदराजांची अंबानगरी म्हणजे आजची अंबेजोगाई असा स्पष्ट उल्लेख प्रथम गणेशनंदन आणि नंतर उद्धवसुत यांच्या ग्रंथांत आढळतो. आंभोरचें जुनें नांव अंबानगरी होतें हें जोंपर्यंत सिद्ध करतां येणार नाहीं अगर आंभोर म्हणजे अंबानगरी असें सांगणारा जुना पुरावा जोंपर्यंत पुढें येणार नाहीं तोंपर्यंत आंभोर पक्षाचा विचार विद्वानांनी जन्माला घातलेला वाद म्हणून करणें भाग आहे. मुकुंदराज अंबेजोगाईचे आहेत अशी जी परंपरागत माहिती हिचा आरंभ थेट मुकुंदराजापासून दाखवतां येतो, हें सिद्ध करणें हा या विभागाचा हेतु आहे. कुळकर्णी यांच्या मतें योगेश्वरीमाहात्म्य शकाच्या १५ व्या शतकांतला ग्रंथ आहे. ठीक आहे. शकाच्या १५ व्या शतकांत मुकुंदराज

अंबेजोगाईचे असें मानलें जात होतें इतकें तरी त्यांना मान्य करावें लागेल. योगेश्वरीमाहात्म्यांतील मुकुंदराजविषयक उल्लेख गैरसमजाचे आहेत असा मानणाऱ्यानें १४ व्या शतकांतील सत्य ज्ञान असणाऱ्यांचे उल्लेख दाखवले पाहिजेत.

विभाग 'ड'

मुकुंदराजांना अभिप्रेत असणारी अंबानगरी कोणती याची चर्चा केल्यानंतर हरिनाथ यांची शिष्यपरंपरा कुठली असावी या प्रश्नाकडे आपण वळूं. मुकुंदराज अंबेजोगाईचे होते असें आमचें मत आहे. त्या दृष्टीनें त्यांना अभिप्रेत असणारी अंबानगरी कोणती याचा येथवर विचार करून ती अंबानगरी 'जोगाई अंबें'च होती याचें प्रतिपादन आम्ही केलें आहे. येथून आपण परंपरेच्या विचाराला आरंभ करूं.

हरिनाथ

हरिनाथांची माहिती मुकुंदराजांनी विवेकसिंधूच्या १८ व्या प्रकरणामध्यें गुरुपरंपरा वर्णन करतांना जी दिली आहे त्याखेरीज त्यांची इतर कोणतीहि विश्वसनीय माहिती आढळत नाहीं. या माहितींत जर भर घातली असेल तर ती फक्त कळमेश्वराच्या कागदपत्रांनी. कळमेश्वराचें कागदपत्र हरिनाथाचे वडील व आई यांचा उल्लेख करतात. या कागद-पत्रांमध्यें त्यांचा जन्म संमत् १२१५ ला झाला. त्यांच्या वाडिलांचें नांव सत्यदेव व आईचें नांव सरस्वती असल्याचें कळतें, पण ही माहिती उत्तरकालीन संशयास्पद कागदपत्रांतील व अभंग यांतील आहे. यथाकाळ या प्रश्नाचा परामर्श घेण्यांत येईलच. मुकुंदराज स्वतः जी माहिती देतात त्याविरुद्ध जाणारी कोणतीहि माहिती स्वीकारतां येत नाहीं. त्यांचा जन्म वैण्यगंगेवरील मनोहर अंबानगरींत झाला म्हणजे वाणगंगेच्या कांठावरील अंबेजोगाई येथें झाला. त्यांची कांति चाफ्याप्रमाणें गौर व शाखा माध्यं-दिन होती. मुकुंदराजांच्या मतें ते विष्णूचे अवतार होते. त्यांनी आपल्या उजव्या मांडीवर 'श्रीवत्सपद' दाखवलें होतें; हरिनाथाचें मौंजीबंधन

त्यांच्या वडिलांनी केलें. वेदशास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं त्यांना फारसे कष्ट पडले नाहींत. त्यांनी अंबानगरींत 'पाशुपतव्रत' आचरून १२ वर्षें तपश्चर्या केली. तपश्चर्येच्या शेवटीं यज्ञ केला. पूर्णाहुतीच्या प्रसंगीं श्रीशंकर त्या यज्ञांतून प्रकट झाले. ज्या वेळीं शंकर प्रकट झाले त्या वेळीं ऋत्विज मूर्च्छित पडले. त्यांना हरिहरांचा संवाद काय झाला तें कळालें नाहीं. शंकरांनी हरिनाथाला गाढ आलिंगन दिलें. मग श्रीशंकर म्हणाले, 'तूं वर माग'. हरिनाथांनी फक्त त्यांच्याविषयीं प्रेम मागितलें. हरिनाथांनीं त्यांची स्तुति केली. श्रीशंकर म्हणाले कीं, यापुढें जे तुझ्या संप्रदायांत येतील त्यांना पुन्हां जन्म मिळणार नाहीं. कारण तुझ्या संप्रदायाचा मला महेशाला अभिमान आहे. त्यानंतर तेजोमय श्रीशंकर हरिनाथांच्या मुखांत प्रवेशते झाले. हरिनाथांना निर्विकल्प समाधि लागली आणि मग ऋत्विज-गण शुद्धीवर आले. त्यांना वाटलें, यज्ञांतून ब्रह्मराक्षस प्रकट झाला आणि त्यानें हरिनाथाला झपाटलें. यानंतर २२ दिवस हरिनाथ 'सुलीन दसेंत' होते. त्यांना सर्व सिद्धि प्राप्त झाल्या. ते ज्यांच्याकडे पाहात त्याला आत्मा-नुभव येई. मुकुंदराजांनी हरिनाथांची एवढीच माहिती दिली आहे. हे हरिनाथ कोणत्या अंबानगरीचे, हा वादाचा खरा प्रश्न आहे. एकदां विवेकसिंधूत उल्लेखिलेली अंबानगरी अंबेजोगाई आहे, हें निश्चित झालें म्हणजे आंभोर पक्ष अंगुलीदर्शित करीत असणाऱ्या चैतन्यनाथाचा आणि आंभोर येथील हरिनाथ यांच्या समाधीचा फारसा बाऊ उरत नाहीं. या यज्ञप्रकरणीं कोणत्याहि शिवलिंगाची स्थापना झाल्याचा पुरावा नाहीं. चैतन्यनाथ हा आंभोर पक्षाचा पुरावा लंगडा पडतो. परंपरेंतहि अशा कुठल्या शिवलिंगस्थापनेचा उल्लेख आढळत नाहीं. तो फक्त कळमेश्वरांचें कागदपत्र व मुरहरमहाराजांचे अभंग यांतच आहे. हरिनाथांची समाधि आंभोर येथें आहे ही गोष्ट खरी पण आंभोर येथील समाधी मुकुंदराज यांचे आजेगुरु यांचीच कशावरून? नाथसंप्रदायांत असे अनेक हरिनाथ होऊन गेले असतील. कोणता हरिनाथ कुठें आहे, हें ओळखण्याचा जिथें मार्गच नाहीं तिथें आंभोर येथील हरिनाथांची समाधि मुकुंदराजांचे आजेगुरु यांची असेल या म्हणण्याला कांहीं आधार नाहीं. त्यामुळें आहे या परिस्थितींत हरिनाथावरून मुकुंदराजांचा व अंबानगरीचा शोध घेण्यांत

अर्थ नाहीं. अंबानगरी स्वतंत्ररीत्या सिद्ध करून हरिनाथ तेथले हें गृहीत धरण्याखेरीज आज दुसरा मार्ग नाहीं. विदर्भांतील प्रसिद्ध संशोधक यादव माधव काळे यांनी (नागपूर प्रांताचा इतिहास) या प्रकरणीं असें म्हटलें आहे कीं, मुकुंदराजांच्या आंभोरजवळील अगर विदर्भांतील वास्तव्याबद्दलच्या विधानाला खात्रीलायक पुरावा देतां येत नाहीं, यांतील स्वारस्य हेंच. हरिनाथांच्या स्मृतीचें एखादें प्रतीक आज अंबेजोगाईस दाखवतां येण्याजोगें उपलब्ध नाहीं. योगेश्वरीमाहात्म्याची चर्चा करतांना हरिहरात्मक तीर्थ ही ती स्मृति असावी असें अनुमान केलें आहे. पण तें अनुमान आहे. पुरावा नाहीं. यावरून हरिनाथ अंबेजोगाईचे हें गृहीत धरणें कसें भाग आहे हें उघड होईल. मुकुंदराजांचा वास अनेक वर्षें काशीक्षेत्रांत होता. कदाचित् तिकडे हरिनाथांचा शोध लागूं शकेल. जवळजवळ ८०० वर्षें त्यांच्या काळाला झालीं. दरम्यान अंबेजोगाई मुसलमानी आक्रमणामुळें खूपच उध्वस्त झाली आहे. आणि या स्थळाचें चिकित्सकतेनें परिपूर्ण संशोधन झालेलें नाहीं. पुढें मागें हरिनाथांचाहि दुवा सांपडूं शकेल पण ही आशा आहे. पुरावा नाहीं.

रघुनाथ

हरिनाथांचे अनेक शिष्य असल्याचें मुकुंदराजच सांगतात. पण त्यांतल्या त्यांत रघुनाथांच्या ठिकाणीं त्यांची कृपा असंख्य फळली असें म्हटलें आहे. हरिनाथांच्या कृपादृष्टीमुळें रामचंद्राला उन्मनी अवस्था प्राप्त झाली. १८ दिवसपर्यंत तो त्या समाधीच्या अवस्थेंत होता. या रामचंद्राचें गुणगाण करतां येणें केवळ अशक्य आहे. या रामचंद्रानें अनेक शिष्य प्रबोधिले. तो राजयोगी होता. त्याच्या शिष्यांपैकीं मुकुंदराज हे एक. हा रामचंद्र चांद्याचा राहणारा होता, बोबडे वंशांतील होता व हरिनाथांनी त्याला आपल्या पायाशीं समाधि दिली, ही या विवेकसिंधूच्या माहितींत पडणारी नवी भर, पुन्हां कळमेश्वर कागदपत्र आणि मुरहरमहाराजांचे अभंग यांतील आहे. इतर कुणीहि बोबडे वंशाचा उल्लेख केलेला नाहीं. कुळकर्णी यांनी संपादिलेल्या विवेकसिंधूच्या एका 'छ' प्रतींत नवी माहिती दिली गेली आहे. ही प्रत शके १६७८ धातानामसंवत्सरे चैत्र

शु॥ १५ सौम्यवासरे या दिवशीं पूर्ण झाली असून, शहानूर बंकापूर किल्ल्यांत पूर्णानंद चरण किंकरगोविंद यानें स्वतः लिहिली आहे. मुकुंदराजांच्या शिष्यपरंपरेंतील नऊ सांप्रदायिक व्यक्तींची माहिती अगर नांवें या पोथींत आहेत. ही पोथी मराठवाड्याबाहेरील सांप्रदायिक पोथी आहे. त्या दृष्टीनें या प्रतीचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. या पोथींत १८ व्या अध्यायांत गुरुमाहात्म्यवर्णनाच्या प्रकरणांत ११३ व्या ओवीपर्यंत जिथें रघुनाथांची माहिती आहे, तेथें टीप देऊन सहा संस्कृत श्लोक घातले आहेत व त्यांत रघुनाथांच्या विषयीं माहिती दिली आहे. तें श्लोक असेः–

॥ तस्यपूर्णावतारात्मा श्रीमत्केशव नंदनः ।
लंबोपनाम्ना विख्यातो रघुनाथोऽभवन्मुनिः ॥११४॥
रम्ये गोदावरीतीरे रामपुर्यां विराजते ।
शंकराराधनं नित्यं सद्गुरोश्च प्रसादतः ॥११५॥
प्रारब्धकर्मणः शेषात्संसार निरतोपि सन् ।
अखंड ब्रह्मणिरतः संप्रज्ञात समाधिगः ॥११६॥
समभूतस्य महिमा मयावक्तुं न शक्यते ।
यस्य शिष्योपशिष्येषु साक्षाद् ब्रह्म प्रकाशते ॥११७॥
तदाज्ञयासमभव द्रुचिर्ग्रंथ विनिर्मितो ।
ययाग्रंथो विरचितो विवेकामृत संज्ञकः ॥११८॥
तदुक्त गुरुसंतान श्रवणात्पाप निष्कृतिः ।
अतः श्रद्धापूर्वकं तत्स्मर्तव्यं विबुधैः सदा ॥११९॥

वरील सर्व वर्णन रघुनाथांच्या संबंधानें आहे. या वर्णनांत रघुनाथांचें उपनांव लंब, वडिलांचें नांव केशव व तो राहणारा गोदावरी कांठच्या रामपुरीचा असें म्हटलें आहे. रामपुरी, गोदाकांठ व अंबेजोगाई या परिसरांत कसून संशोधन केल्यास यासंबंधांत महत्त्वपूर्ण माहिती प्रकाशांत येण्याचा संभव आहे. गोदावरी कांठी व अंबेजोगाईजवळ ३०।३५ मैलांच्या परिसरांत ३ रामपुऱ्या आहेत : १) रत्नेश्वराची रामपुरी, २) पापदंडी रामपुरी, ३) लिंगोजीबुवाची रामपुरी. यांपैकीं पहिल्या दोन विशेष प्रसिद्ध आहेत. पाथ्रीजवळील रत्नेश्वराची रामपुरी हें रघुनाथांचें जन्मस्थान असावें. तेथें रत्नेश्वर नांवाचें महादेवाचें एक मोठें

प्राचीन मंदिर आहे व वैदिक ब्राह्मणांची मोठी वस्ती आहे. आम्ही रत्नेश्वर रामपुरीस जाऊन आलों; पण तेथें अजून तरी कांहीं माहिती उपलब्ध होऊं शकत नाहीं. वेदमूर्ति नारायणशास्त्री रामपुरीकर यांचेकडून पापदंडी रामपुरींतहि कांहीं माहिती उपलब्ध होऊं शकत नाहीं, असें कळतें. तेव्हां रत्नेश्वर रामपुरी हेंच रघुनाथांचें वास्तव्यस्थान असावें. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी या नवीन माहितीचें महत्त्व, ओळखून न ओळखल्यासारखें केलें आहे. भक्तिरहस्य, धर्मरहस्य इ. ग्रंथांत काय लिहिलें आहे हें त्या ग्रंथांतील उताऱ्यावरून नीटसें कळत नाहीं. नेमकें स्वसमर्थक उतारे तेवढे कां देण्यांत येतात हें कळत नाहीं. कांहींहि असो, रघुनाथ गोदावरी कांठचे हें निश्चित.

मुकुंदराज

मुकुंदराज हे अंबेजोगाईचे राहणारे असावेत असा ग्रह विवेकसिंधु वाचून होतो. त्यांनी अ. २।५७ यांत आपल्या जन्मस्थानीं राहावयास मिळणें हें फार भाग्याचें असतें असें सुचविलें आहे. अर्थात् तिथें विषय तत्त्वचर्चेचा आहे. पण स्थूल मानानें हरिनाथांची जी कोणती अंबानगरी ठरेल तेथले मुकुंदराज हें सर्वांना मान्यच आहे. मुकुंदराजांची समाधि अंबेजोगाईस आहे, परंपरा त्यांना अंबेजोगाईची म्हणते व हरिनाथांची अंबानगरी अंबेजोगाई आहे हें उघड आहे. तेव्हां स्थूलमानानें व सामान्य अर्थानें मुकुंदराज अंबेजोगाईचे. पण त्यांच्या आयुष्याचा कांहीं काळ काशीक्षेत्रीं व्यतीत झाला. योगेश्वरीमाहात्म्यासारख्या उपलब्ध पुराव्यांतील सर्वांत जुन्या पुराव्यांत या काशीक्षेत्राचा उल्लेख तर आहेच; पण १४।२७ या ओवींतहि मुकुंदराजांनी स्वतः आपण काशीक्षेत्रीं वास केल्याचें सुचविलें आहे. पुनरपि वृद्धापकाळांत त्यांनी अंबानगरीस येऊन समाधि घेतली. एक जुनी आख्यायिका अशी आहे कीं, मुकुंदराज हे मूळचे गोदाकांठ नांदेडचे राहणारे असावेत व येथील वृत्ति व इनाम जमिनी त्यांच्या घराण्यांत वंशपरंपरागत चालूं होत्या. अजगांवकरांच्या म. क. च. मध्यें ही आख्यायिका उल्लेखिलेली आहे. विदर्भातील एक संशोधक विठ्ठल रामचंद्र बोबडे यांनी आमच्याकडे जी विचारणा केली

आहे त्यावरून विदर्भातहि ही आख्यायिका प्रचलित असल्याचें कळतें. या आख्यायिकेंत कांहीं तथ्यांश असावा असें अलीकडे वाटूं लागलें आहे, पण ही माहिती खरी असल्याचा निर्णय घेतां येत नाहीं. मुकुंदराज स्वतःस मुनि, मुनीश्वर असें म्हणवतात. जर मुनि किंवा मुनीश्वर हें त्यांचें उपनांव असेल तर नांदेड येथें मुनीश्वर या नांवाचें एक घराणें फार जुन्या काळापासून राहात आहे. त्या घराण्यांतील ते असावेत असें अनुमान करतां येईल. हल्लीं या घराण्यास 'मुनि' असें म्हणतात. पण या घराण्याचीं दोन जुनीं मलिकंबरी फर्मानें आम्हांला उपलब्ध झालीं आहेत. त्या फर्मानांत या घराण्याचें नांव 'मुनीश्वर' उल्लेखिलेलें आहे. केशवभट्ट, विन त्रिमलभट्ट, सुनेस्वर इनामदार साकिन कस्बे नांदेड. या नांवाची सन तीसा असर अलफ (१५४० शके) ची सनद उपलब्ध आहे. या फर्मानावरून मुनीश्वर घराण्यांतील विद्वान पंडितांना नांदेडच्या आसपासच्या कर्यातीमधील इनाम जमिनी व जकातीमुइनपट्ट्या वगैरे मिळाल्याचें कळतें. "नांदेडबाहेर कर्याति दहा सर, जमीन गजसरायानी पोलिज अव्वल धाराटीका कोरडी संगम न॥ मंजरथतीर्थ, तसेच देहायेवपाय पोसी देस वराड व मोइनपटी व थळमन व नितणटका व पटीकानुदार व जकाति व बाजे पटीया हाली व पेस्तर" या फर्मानानें उपरोक्त जमिनी मुनीस्वर घराण्यांत अवलाद व अफलाद चालत जाव्या असें म्हटलें आहे. या फर्मानांत उल्लेखिलेल्या कोरडीसंगम झालेलें मंजरथतीर्थ जर गोदावरी कांठचे रत्नेश्वर रामपुरीच्या जवळचे असेल तर नांदेडच्या मुनीश्वर घराण्याला मंजरथकडे मुकुंदराजांच्या नांवावर तर जमिनी मिळाल्या नसतील, अशी एक कल्पना मनांत येऊन जाते. मुकुंदराजांच्या नांदेडसंबंधी आख्यायिकेचे धागे जर मुनीश्वर घराण्याशीं संबंधित असतील तर हा एक लक्षांत घेण्याजोगा पुरावा आहे.

मुकुंदराजांचा नांदेडशीं संबंध सूचित करणारा आणखी एक पुरावा तसाच विचार करण्यासारखा व चिंत्य आहे. त्यावरून मुकुंदराजांच्या शिष्यपरंपरेचा कांहीं धागा नांदेड येथें सांपडतो काय, या मुद्द्यास चालना मिळणारी आहे. मुकुंदराजांची परंपरा दर्शविणारा व विवेकसिंधूच्या धर्तीवर लिहिलेला एक ग्रंथ बकाजी रंगनाथ याच्या नांवावर

'विवेकभास्कर' या नांवाचा आहे. या ग्रंथाचे ९० अध्याय असल्याचें समजतें. या ग्रंथाची व बकाजी रंगनाथ याची माहिती आम्हांस श्री. वि. रा. ढोक यांच्या 'श्रीआंभोरे क्षेत्रमहिमा' या पुस्तकावरून कळाली. विशेष आश्चर्याची व नवलाईची गोष्ट अशी कीं, ज्या विवेकभास्कर ग्रंथावरून ढोकांनी आंभोरच्या हरिनाथाची शिष्यपरंपरा रेखाटली आहे, तो ग्रंथ व त्याचा लेखकहि नांदेडचाच आहे. हरिनाथ किंवा मुकुंदराजांच्या साक्षात् शिष्यपरंपरेचें ज्ञान श्री. ढोक यांना किंवा मुकुंदराजांच्या तत्रस्थ माहितीचा पाठपुरावा करणाऱ्या विदर्भस्थ संशोधकांना कितपत असावें याची आतां जबर शंका वाटते. हरिनाथांची परंपरा नागपूरकडची असावी यावद्दल आधार काय याचा विचारच कोणी अद्यापपर्यंत केल्याचें दिसून येत नाहीं. तुसते परंपरेचे मठ दाखविल्यानें परंपरा सिद्ध होत नाहीं कारण मठ अलीकडचे असूं शकतात. विवेकभास्कर हा ग्रंथ बकाजीनें शके १७२८ मध्यें नांदेड येथें लिहिला आहे, हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल:—

जो कां देश पवित्र गौतमऋषि प्रार्थीत गंगाधरे
जीचे दर्शन पान करितां त्रैलोक्य हें उद्धरें
तारा उर्वशी संगमी उभयतां मध्यस्थ नंदीतटी
आतां लेखन काळ वेळ सहजे ग्रंथाचिया शेवटीं
अद्राष्ट्रासे सतेताळ विक्रमदुजे सतरासतेष्टादशे
शालिवाहन शके सुसंमत् घडे हे लेख्य कीं होतसे.

'नंदीतट' हें नांदेडचें पौराणिक व प्राचीन नांव ग्रंथांतरीं सुप्रसिद्ध आहे. उर्वशी आणि तारा हीं प्रसिद्ध तीर्थांचीं नांवें नांदेडच्या क्षेत्रमाहिम्यांत नमूद आहेत. विवेकभास्कर ग्रंथांतील माहितीवरून तो नांदेडचा दिसतो. या ग्रंथांत आदिनाथ—हरिनाथ—रघुनाथ—मुकुंदराजापासून केशवस्वामीपर्यंत व पुढें भीमराजाचा शिष्य नागेंद्र ऊर्फ नागनाथ व त्याचा शिष्य बकाजी रंगनाथ येथपर्यंत परंपरा आली आहे. बकाजी रंगनाथानें शेवटीं नागेंद्राचा शिष्य असा आपला उल्लेख केला आहे. बकाजीचा गुरु नागेंद्र किंवा नागनाथ हा नांदेडचाच राहणारा दिसतो. याचें आडनांव याज्ञवल्कि! याज्ञवल्कि घराणें परवां परवांपर्यंत नांदेडला होतें.

हा विवेकभास्कर ग्रंथ बकाजी रंगनाथाचा नसून त्याचा गुरु नागेंद्र याज्ञवल्कीचा असल्याचें त्याच्या 'भगवद्गीता समश्लोकी' या ग्रंथावरून कळतें. हरिनाथ अंबेजोगाईचे, रघुनाथ गोदातटाकी रामपुरीचे, मुकुंदराज संप्रदायी केशवस्वामी मराठवाड्यांतील कल्याणीचे व व्यास आंभोरक्षेत्र-महिमावर्णन हा ग्रंथ नागपूरकडील मुकुंदराज संप्रदायी मठाचा प्रवर्तक मानतो, तो बकाजी रंगनाथ व त्याचा गुरु नागेंद्र याज्ञवल्कि नांदेडचा. तेव्हां हरिनाथ ते बकाजीपर्यंत सर्व व्यक्ति मराठवाड्याच्या आणि बकाजी-पुढील मठ नागपुरास असल्यामुळें मुकुंदराज मात्र आंभोरचें हें कोडें कसें उलगडायचें? याबाबतींत एकच अनुमान संभवतें. तें म्हणजे बकाजी रंगनाथ भोसल्याच्या कारकीर्दींत नागपूरकडे राहावयास गेला असावा व तिकडे त्याची कांहीं शिष्यमंडळी झाली असावी. बकाजीच्या शिष्यांनी नागपूरच्या आसपास जे मठ कायम केले ते आज अस्तित्वांत आहेत. राजवाडे यांच्यापासून डोळके-कुळकर्णी यांच्यापर्यंत मुकुंदराजांच्या नाग-पूरकडील परंपरेचा जो डिंडिम सतत वाजविला त्याचा पोकळपणा हा यावरून उघडकीला येईल.

आंभोर हीच अंबानगरी या आधारावर विदर्भस्थ संशोधकांनी मांडलेले आराखडे हळूंहळूं असे निराधार सिद्ध होत आहेत. त्याचप्रमाणें राजा जैत्रपाळ व मुकुंदराज यांच्या बैतुल जिल्ह्यांतील खेडला येथील समाधीचाहि प्रकार असाच असावा कीं काय अशी शंका वाटूं लागली आहे. कै. या. मा. काळे यांनी नागपूर प्रांताचा इतिहास या पुस्तकांत मुकुंदराज व जैत्रपाळ यांच्याबाबत ते खेडल्याकडील होते याबद्दल खात्री देतां येत नाहीं असें मत दिलें आहे. बैतुल गॅझिटियरचें याबाबतींत काय मत आहे तें मात्र कळूं शकलें नाहीं. मुकुंदराज हे स्थूल मानानें पाहिले तर अंबेजोगाईचे, पण आख्यायिका त्यांना नांदेडचे ठरविते. त्याबाबत थोडेसें विवेचन वर केलें आहे.

समर्थांची अंबेजोगाईस भेट व भारती मठ

आत्मारामाच्या 'दासविश्रामधाम' या प्रचंड ग्रंथांतील माहिती-चाहि उपयोग मुकुंदराजांच्या चारित्रासंबंधांत बराच होण्याजोगा आहे.

या ग्रंथांतील उल्लेखित मुकुंदराजांची परंपरा व सांप्रदायिक व्यक्ति आणि स्थळें अनेक दृष्टींनी सूचक व महत्त्वाचीं आहेत. समर्थ रामदासस्वामी दोन वेळां अंबेजोगाईस आल्याचा या ग्रंथांत उल्लेख आहे. इंदूर–बोधनहून सारंगपूरच्या मारुतीची स्थापना करून परत जात असतांना जोगाई अंब्यास ते मुकुंदराजांच्या समाधीदर्शनासाठीं थांबले होते. याच वेळीं त्यांना दासबोध रचण्याचा दृष्टान्त झाला. ' फिरत फिरत इकडे सद्गुरु भूप । जोगाई अंब्याहून समीप । बुटेटेकडी वरी सुखरूप । कांहीं दिवस लोटले ॥ गुरुशास्त्र वाचुनी कांहीं । सत्शिष्यवर्गा सौख्यता नाहीं । संपादूनी देऊं ठेविले पाही । विवेकसिंधु सन्निधि ॥ सांत अवलोकन केला ग्रंथ । तव अंतरिं उपजला निःसंग हेत । कोणी न भेटती साधुसंत । बहुत काळ लोटला ॥ धन्य दैवागळे चिंतनासरिसे । मुकुंदराज पातले भेटीस । तत्समयीं जो जाहला हरुष । अनुभवी पुरुषा ठाऊक ॥ तर्कोनी वदले जी रामदासा । अखुड ग्रंथ हा सिंधु सहसा । विस्तार सर्वत्रा कळेल तैसा । ग्रंथ स्वमतीनें रचावा ॥

श्रीसमर्थ यांनी अंबेजोगाईस पहिली भेट दिली तेव्हां ते दासोपंतांच्या घरींहि आले होते असा उल्लेख आहे.

दासविश्रामधामकारानें उल्लेखिलेली एक महत्त्वाची बाब म्हणजे समर्थ यांनी अंबेजोगाईच्या मुक्कामांत ' भारती आश्रमाला ' दिलेली भेट. अंबेजोगाई येथील हरिनाथ मुकुंदराजांच्या परंपरेवर प्रकाश पाडणारा हा फार महत्त्वाचा पुरावा आहे. समर्थांच्या काळापर्यंत अंबेजोगाईस हरिनाथाची भारतीशिष्यपरंपरा अस्तित्वांत होती हें यावरून कळतें. श्रीसमर्थ अंबेजोगाईचा मुक्काम संपवून कृष्णातटाकीं जाण्यास निघाले. निघण्यापूर्वी त्यांनी अंबेजोगाई येथील भारती आश्रमास भेट दिली. तेथें समर्थांचा सत्कार झाला अशी ही हकीकत आहे. यावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतातः–

१) समर्थांच्या वेळीं अंबेजोगाईस भारती उपनामधारी सत्पुरुषांचा एक आश्रम होता. २) भारती आश्रमाची परंपरा मुकुंदराजांपासून रामदासांपर्यंत अंबेजोगाईस होती. ३) हरिनाथांचे एक प्रमुख शिष्य सुरेंद्र भारती नांवाचे होते असें विवेकसिंधूंत म्हटलें आहे १८।१०२. हरि-

नाथाच्या पश्चात सुरेंद्रभारती प्रभृति शिष्य अंबेजोगाईस वास्तव्य करून असावेत. हरिनाथ मुकुंदराज परंपरेंत जी नरसिंहभारती, जगन्नाथभारती इ. नांवें प्रचलित्वानें येतात त्याचा यावरून उलगडा होईल.

आमच्याजवळील एका हस्तलिखित 'वक्षमान' प्रकरणांत खालील उल्लेख आहे :-

आदिनाथ, हरिनाथ, रामचंद्रप्रभु। विज्ञानाब्ध मुकुंदराज नरसिंहोत्भारती शंततः जगन्नाथं सुभारती सहजबोध रंगबोध सदा। श्रीमत्केशवं शंकर.....

मुकुंदराजांच्या पश्चात भारती परंपरेचा आश्रम समर्थांच्या काळपर्यंत अंबेजोगाई येथें विद्यमान होता व त्या परंपरेचें सातत्य तोंपर्यंत होतें ही बाब स्थलनिर्णयाच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. समर्थ जसे अंबेजोगाईस आले तसे आंभोरला कां गेले नाहींत? कारण आंभोर पक्ष मुळीं त्यांच्या वेळीं अस्तित्वांत नव्हताच.

गोदाकांठच्या नाथ व सिद्ध परंपरा

मुकुंदराज व ज्ञानेश्वर ज्या आदिनाथ परंपरेंत मोडतात त्या नाथपरंपरेंत होऊन गेलेल्या अनेक सत्पुरुषांचीं व सिद्धांचीं स्थळें आणि परंपराविशेष यांचा मुख्य गाभा मराठवाड्यांतील गोदापरिसर दिसून येतो. आदिनाथ, हरिनाथ, रघुनाथ, मुकुंदराज या परंपरेप्रमाणेंच आदिनाथ, मार्च्छेंद्र, गोरक्ष-गहनी-निवृत्ति-ज्ञानेश्वर हींहि एक महत्त्वाची परंपरा आहे. आज या दोन शाखा सकृद्दर्शनीं जरी भिन्न वाटत असल्या तरी पूर्वीचे नाथसंप्रदायी सत्पुरुष व अभिमानी लोक या दोन्ही परंपरा एक मानीत आले आहेत. विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी हे दोन्ही ग्रंथ त्यांनी पूजनीय मानले आहेत. जुन्या संतकवींचे ग्रंथ आणि परंपरा चाळतांच ही गोष्ट लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. गोदापरिसरांत अशा अनेक ज्ञात व अज्ञात नाथसिद्धांच्या परंपरा आहेत. सदानंदकृत शंकराचार्यांच्या 'अपरोक्षानुभूती' टीकेंत ग्रंथकारानें आपल्या संप्रदायाचें वर्णन केलें आहे, तें पाहण्याजोगें आहे.

आजागुरूचा पणजागुरु । प्रख्यात श्रीज्ञानेश्वरु । अथर्वणवेदी उच्चारू । महिशामुखे जो करी ।। संस्कृताचा प्राकृत । जेणे प्रकटिला गीतार्थ । तया माझे दंडवत । वंश समर्थ ज्याचेनि ।। आतां सुवर्णाचिया विनायका । शोभति सुवर्णाचिया पादुका । तैसे गुरुशिष्यत्व आवाका । धरूनिया बोलतो ।। श्रीगुरुनाथाचेनि हाते । मज ते गंगामृत झाले प्राप्त । जे कां मच्छेंद्र गौतमाते । आदिनाथे दिधला ।। ते गोरक्ष ब्रह्मगीरी । घरी प्रकटली पियुषलहरी । मग श्रीगैणी अंबरी । समावली सगळेच । गैणीनाथाहुन पुढार । भरले निवृत्ति गंगाद्वार । तेथुनि मग ज्ञानेश्वर । कुंशावर्त पैं जाला ।। तेथुनि चालतां पंथी । उठली सदाशिव चक्रतीर्थि । पुढा पंचवटिकेप्रति । रामतीर्थ गणेश ।। उद्धव प्रवरासंगमी । प्रतिष्ठान केशवस्वामी । यावरी बाळनाथ आम्ही । मंजरथी पूजिला ।। सुद्गलेश्वरी श्रीनाथ.....शके सोळासे नव्यांशी । ज्येष्ठ शुक्ल द्विया दिवशीं । ग्रंथ लिहून श्रीनाथाशी । समर्पिन ममत्वे ।।

या परंपरेंत आलेली अनेक नाथ सिद्धस्थानें गोदाकांठचीं आहेत. गंगानाथकृत "गोरक्षगीता निरूपण" (रचना शक १७२१) यांत दिलेली नाथपरंपरेची शाखा अशीच अज्ञात आहे. नाथपरंपरा सांगतांना अनेक ठिकाणीं हरिनाथ, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, क्वचित् एकनाथ सुद्धां एकत्र गुंफलेले आढळून येतात. मुकुंदराजांच्या संप्रदायांत मोडणाऱ्या कांहीं जुन्या शाखा व सांप्रदायिक परंपरा निश्चितच मराठवाड्यांत असल्या पाहिजेत असें यावरून कळेतें. चौदाव्या शतकांत होऊन गेलेल्या वडवाळ सिद्ध नागेशाच्या परंपरेंतील दगडो शिवदासानें आपल्या 'निर्वाणसार' ग्रंथांत मुकुंदराजांना गुरुपरंपरेंत नमन केलें आहे. उमा प्रबोधिली शंकरे । श्रीरामे प्रबोधिला.....। मुकुंदराज योगेश्वरे । प्रबोधिला जैतपाळ ।। ही ओवी मुकुंदराजांच्या कालनिर्णयालाहि उपकारक ठरेल. १५ व्या शतकांतील मृत्युंजय स्वामी या जुन्या संतकवीचा तर मुकुंदराज परंपरेशीं साक्षात् संबंध असावा असें वाटतें. मृत्युंजयाच्या काळीं तर पंढरपूरसारख्या क्षेत्रीं विवेकसिंधूचें जाहीर पठण होत असे, असें महीपती म्हणतो. मृत्युंजयाच्या अनंत नामक शिष्यानें 'गद्यपंचीकरण' लिहिलें आहे. त्याच्या शेवटीं गुरुमृत्युंजयांना नमन करून तो आपली

परंपरा सांगतो. "श्रीआदिनाथु ईश्वर श्रीहरिनाथे होम केला त्यापासाव प्रकटला। त्याचा उपदेश श्रीहरिस्वामीस। त्याचा उपदेश श्रीरामचंद्र स्वामीस। त्याचा उपदेश श्रीमुकुंदराज स्वामीस। त्याचा उपदेश श्रीगुरु-मृत्युंजय रामस्वामीस। पंढरपुरी सगुण दर्शन भीतातीरि देऊन विवेक-सिंधूचें पुस्तक आत्मउपासना ब्रह्मबोध ज्ञानोदयवरद प्रसन्न कर मस्तकीं। इति श्रीपंचकरण महावाक्य समाप्तः

शके १७६९ मधील 'परमामृत' ग्रंथाची जी प्रत आहे त्यांत नरहरी नगरांत राहणाऱ्या कोण्या सिद्धेश्वर मुनीचा उल्लेख आहे.

नांदेड येथें प्राचीन नरसिंहमूर्ति आहे. कोण्या नरहरीभक्तानें भक्तिभावानें या नगरास नरहरीनगर म्हटलें असण्याची शक्यता आहे. नांदेड क्षेत्रमाहात्म्यांत एका सिद्धेश्वर मुनीचा उल्लेख आहे. सिद्धनाथपुरी या नांवाचा आजच्या नांदेडचा प्राचीन वस्तीचा भागहि आहे. भारती परंपरेचा मुकुंदराजाशीं संबंध आहेच. नांदेड येथून दोन कोसांवर सिद्ध-नाथ या गोदावरीकांठच्या ठिकाणीं ३०० वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या एका शिवानंद भारतीचें स्थान आहे. बीड, उस्मानाबाद, कल्याणी, एक्केहाळी, नागेशवडवाळ, महागांव, अपचंद, माळगीराय इ. ठिकाणीं मुकुंदराजांच्या परंपरेचा संबंध असावा असें मानण्यास जागा आहे. नाथपंथ, सिद्ध यांचें अतिप्राचीन काळापासून मराठवाड्यांतून जसें प्राचुर्य आढळतें तसें नाग-पूरच्या बाजूला आढळतें काय, याचा विचार केला पाहिजे. शें-दीडशें वर्षांतील मठपरंपरा ७०० वर्षांपूर्वीच्या मुकुंदराजांच्या बाबतींत विचारांत घेण्यापेक्षां हा मार्ग सरळ आहे.

केशवस्वामी

विवेकसिंधूच्या 'छ' प्रतींत मुकुंदराजांची पूर्णानंदापर्यंत येणारी ९ व्यक्तींची परंपरा दिली आहे. आदिनाथ-हरिनाथ-रघुनाथ-मुकुंदराज-नरसिंहभारती-जगन्नाथ-सहजबोध-श्रीरंग-केशवस्वामी-संतसखा-पूर्णबोध. परंपरांसाठीं सांप्रदायिक 'छ' प्रत फारच महत्त्वाची आहे. मजजवळील एका जुन्या कागदावर 'श्रीवक्षमान प्रकरण' लिहिलें आहे. त्यांत हीच परंपरा थोड्या वेगळ्या नांवानें आहे.

दा. क्र. 9986

वंदेहं गुरुमादिनाथ हरिनाथं रामचंद्रं प्रभु ।
विज्ञानाब्ध्य मुकुंदराज नरसिंहोत्भारतीं शंकरं ।
जगन्नाथं सुभारती सहजबोध रंगबोध सदा ।
श्रीमत्केशव शंकर वैद्यनाथ श्रीएकनाथं गुरु ॥१॥

या परंपरेंत वैद्यनाथ आणि एकनाथ हे महत्त्वाचे उल्लेख आहेत. विवेकसिंधूची एक जुनी प्रत माझ्या अवलोकनांत आली. तिच्या पहिल्या पृष्ठावर पुढीलप्रमाणें परंपरा आढळली. पान फाटलेलें असल्यामुळें वाचतां आला तेवढाच मजकूर उतरून घेतला आहे:-

सजयति सिंधुर्वदने.....
वंदेहल्यादिनाथं हरम परमं गुरु...
श्रीमुकुंदतदनुरचर नरसिंहाभिधं....
यतीद्रं विमल सहजबोध, रंगबोध....(केशवा)
वाख्यं परमगुरुवरं शंकरं वैद्यनाथ...
नंदस्वयं प्रकाशाख्य वेद्यम अखंड...
परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति...सद्गुरु तन्मामि

या परंपरेंत यतींद्र विमल व स्वयंप्रकाश हीं नांवें नवीन आढळतात. सारांश आदिनाथ...मुकुंदराज...केशवस्वामीपर्यंत परंपरा स्थूल मानानें एकत्र दिसतात. मुकुंदसांप्रदायी केशवस्वामी हे या परंपरेंत मध्यवर्ती दिसतात. त्यांचा शिष्यपरिवार मोठा होता. केशवस्वामीच्या शिष्यांच्या निरनिराळ्या शाखा पुढें निरनिराळ्या ठिकाणीं कायम झाल्या. आंभोरें येथें हरिनाथाची परंपरा म्हणून जी देवस्थानांत म्हटली जाते ती अशी :- हरिनाथ—रघुनाथ—मुकुंदराज—नरसिंहभारती—जगन्नाथ—सहजबोध—श्रीरंग—केशव—शंकर—वैद्यनाथ—भीमराज—नागनाथ—बकाजी रंगनाथ—गोपीनाथ—गणेशनाथ. ही परंपरा श्री. ढोकांच्या पुस्तकांतून घेतली आहे. नागपूरकडील सर्व मठांतील परंपरा जवळ जवळ सारख्याच आहेत. त्यांतहि केशवस्वामी हेंच मध्यवर्ती केंद्र आहे. तिकडील लोकांना या परंपरांची फारशी माहिती दिसत नाहीं. श्री. वि. रा. ढोक म्हणतात; "मुकुंदराजांच्या नंतर केशवस्वामीपावेतों जे सत्पुरुष

होऊन गेले त्यांच्या कार्याबद्दल अजून कांहीं माहिती मिळाली नाहीं." "त्याचप्रमाणें केशवस्वामीपासून भीमराजपावेतों कांहीं माहिती मिळत नाहीं." भीमराजाचा शिष्य नागनाथ ऊर्फ नागेंद्र व त्याचा शिष्य बकाजी रंगनाथ यांचीहि माहिती त्यांना दिसत नाहीं. बकाजी रंगनाथ हाच विदर्भस्थ परंपरांना ज्ञात असणारा पहिला पुरुष तो नांदेडचा होता. त्याचा गुरु नागेंद्रहि नांदेडचा. सर्व परंपरेंत मध्यवर्ती असणारे केशवस्वामी अंबेजोगाईच्या बीड–बीदर सीमेवरील इतिहासप्रसिद्ध कल्याणी गांवचे. हेच पुढें केशवस्वामी भागानगरकर म्हणून प्रसिद्धीस आले. केशवस्वामी-पर्यंत सर्व परंपरा अंबेजोगाईच्या आसपास बकाजीपर्यंतच्या परंपरा मराठ-वाड्यांत आणि आजचे उपलब्ध मठ जे बकाजी रंगनाथाच्या नंतर आहेत ते तेवढे आंभोरच्या बाजूचे. यावरून मुकुंदराज कुठले याचा सहज अंदाज करतां येणें शक्य आहे. केशवस्वामीच्या शिष्यपरंपरेंतील शंकर, वैद्यनाथ, भीमराज हे सुद्धां मराठवाड्यांतीलच. ज्या परंपरांनी मुकुंदराजांना आंभो-रास खेंचून नेले त्यांची हकीकत ही अशी आहे. ज्या हरिनाथाची समाधि आंभोरास आहे ते हरिनाथ कोणते याचा तर पत्ताच नाहीं. मुकुंदराजावर लिहिणाऱ्या महाराष्ट्रीय विद्वानांनी परंपरांचा, खोलांत जाऊन फारसा विचारच केलेला नाहीं. अंबेजोगाईचे मुकुंदराज व हरिनाथ त्यांच्या परंपरा पूर्वकालीं आंभोरला जातील कशा ?

भारती

हरिनाथाच्या शिष्यमंडळींत सुरेंद्र भारती हें नांव प्रामुख्यानें येतें. सुरेंद्र भारती, नरसिंह भारती, जगन्नाथ भारती हीं नांवें शृंगेरी व हंपिवरूपाक्ष मठांच्या पीठपरंपरेंत वारंवार येतात. या परंपरेचा फारसा विचार कुणी केलाच नाहीं. मुकुंदराज शांकरमतानुयायी होते हें प्रसिद्ध आहे. आचार्य परंपरेशीं त्यांचा संबंध तर नसावा, किंवा त्यांच्या परंपरेंत आरूढ झालेल्या व्यक्ति पुढें पीठावर तर आल्या नसाव्या अशी शंका चाटून जाते. या भारती परंपरेचा एक मठ समर्थापर्यंत अंबेजोगाईस होता. या परंपरेचें स्पष्टीकरण स्थलनिर्णयावर कांहीं प्रकाश टाकूं शकेल.

कांहीं खुलासा

वर आम्ही केशवस्वामी भागानगरकर आणि मुकुंदसांप्रदायी केशवस्वामी एकच असल्याचा उल्लेख केला आहे. 'दासविश्रामधामां' त हे दोन केशवस्वामी एकच असल्याचा पुरावा आहे. स्वतः केशवस्वामी भागानगरकरांच्या काव्यांत आपण मुकुंदराज सांप्रदायी असल्याचा उल्लेख आहे. बकाजीचा गुरु नागेंद्र याची 'गीताटीका' उपलब्ध आहे. त्यावरून भीमराज केशवसांप्रदायी असल्याचें कळतें. केशवस्वामी भागानगरकरांचे सर्व शिष्य स्वतःला केशवसांप्रदायी म्हणवून घेतात. शुकानंद महाराजांच्या गुरुपरंपरेंत नागेंद्र नांदेडला असल्याचा उल्लेख आहे. (सोमयाजी गुरु-परंपरा अ. ५०) 'विवेकभास्कर' हा ग्रंथ नागेंद्राचा असावा असें अनुमान आमच्याजवळील नागेंद्राच्या गीतेवरील टीकेवरून होतें. नागेंद्रानें भीमराज व कल्याण यांचा एकत्र उल्लेख केला आहे. विवेक भास्कर या ग्रंथाचा विस्तृत अभ्यास झाल्यास अजून कांहीं माहिती उजेडांत येऊं शकेल. हा ग्रंथ आम्हांला अद्याप उपलब्ध झाला नाहीं.

विभाग 'इ'

या विभागांत आम्ही आंभोर पक्षाचा परामर्श घेण्याचें ठरविलें आहे. हा परामर्श घेतांना आम्ही प्रामुख्यानें प्रा. डोळके आणि प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी मांडलेल्या पुराव्याचा विचार करणार आहोंत आणि अनुषंगानें यक्षदेव अम्नाय या ग्रंथाचाहि परामर्श घेणार आहोंत.

आंभोर ही मुकुंदराजांची अंबानगरी असल्याचा भयंकर गाजा-वाजा झाला आहे. त्याबद्दल पुरावे तरी किती व कोणते हें क्रमानें पाहूं जातां सर्वप्रथम जर कांहीं ध्यानांत येत असेल तर तें हें कीं, आंभोरचें नांव कधीं काळीं अंबानगरी असल्याचा पुरावाच नाहीं. फक्त आंभोरला हरिनाथाची समाधि आहे. पण हें हरिनाथ कोणते याचा उल्लेख तेथील जुन्या वाङ्मयांत सांपडत नाहीं. आंभोर हें गांव इतकें सामान्य कीं मुकुंदराज त्याचा मनोहर म्हणून उल्लेख करणें केवळ अशक्य. म्हणून प्रा. डोळके यांनी कंबर कसून एखादा पहाड, डोंगरी किल्ला, किल्लेवजा

गढी, त्यावर दोनचार बुरूज, उजाड वावरें याचा मसाला तयार करून जुन्या वैभवसंपन्न आंभोरचें दिलखुलास वर्णन केलें आहे. तें वर्णन अत्यंत आकर्षक आहे हें खरें, पण तें प्रा. डोळके यांचें वर्णन आहे. इतिहासांत कोणी त्या नगरीला मनोहर म्हटल्याचें श्रुत नाहीं. या ऐतिहासिक वर्णनांत डोळके यांनी आंभोरला गौंडांचें राज्य असावें, त्या अर्थी जैत्रपाल गौंड असावा. शारंगधराचें राज्य असावें, अशा अनेक परस्पर विरुद्ध कल्पना लढविल्या आहेत पण त्यांपैकीं कशालाहि पुरावा दिसत नाहीं. चैतन्येश्वराच्या मागेंहि त्यांनी असाच कल्पनारम्य इतिहास जोडला आहे. आम्ही यापूर्वीच चैतन्येश्वराची चर्चा केली आहे. मुसलमानी अमदानींत अनेक ज्योतिर्लिंगें भंगलीं. पण चैतन्येश्वर अविकृत राहिलें हा या लिंगाच्या अनन्यसाधारणत्वाचा मोठा मौजेचा पुरावा त्यांनी दिला आहे. अभंगत्वावरून फार तर हें लिंग फारसें प्रसिद्ध नसावें हें ठरेल, पण हें स्थान जुनें असल्याचा काय पुरावा ?

कृ. पां. कुळकर्णी यांनी कल्पनेच्या वावड्या मात्र उडवलेल्या नाहींत. त्यांनी फक्त समोरच्या पुराव्याचा विपर्यास केला आहे आणि हा विपर्यास दरस्थळीं हेतुपुरस्सर केला आहे. ते म्हणतात, हरिनाथाची अंबानगरी कोणती ? यावर वाद नाहीं. ती आंभोर आहे हें तर सिद्धच आहे. या मताला काय म्हणणार ? सगळा वादच त्यावर आहे. पुढें चालून ते म्हणतात, सूक्ष्म दृष्टीनें पाहतां मुकुंदराज व जैत्रपाळ यांची भेट कोठें झाली ? हा जैत्रपाळ कुठला ? हा खरा वाद आहे. आम्ही खरा वाद हा नाहीं हें येथवर मांडलें. कारण जैत्रपाळ कुठचा हें अंबानगरीवरून ठरणार. जैत्रपाळ कोण हें मुकुंदराजांच्या स्थलकालनिश्चितीवरून ठरणार. पुढें तें म्हणतात, योगेश्वरीमाहात्म्यांत वेताची छडी मुकुंदराजांच्या हातीं असल्याचा व त्यांनी जैत्रपाळाला ५२ छड्या मारल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. खरोखरीं योगेश्वरीमाहात्म्यांत तसा उल्लेखच नाहीं. पुराणांचे काळ वेगवेगळ्या जागांचे वेगवेगळे असतात. मूळ पुराणाचा काळ आणि त्याच्या परिपूर्णतेचा काळ हे वेगळे असतात, ही प्रसिद्ध गोष्ट कुळकर्णी नेहमीं विसरतात. प्रस्तावनेंत आधार घेतांना त्यांनी डॉ. तुळपुळे यांची नवी महाराष्ट्रसारस्वताची आवृत्ति पाहिल्याचें दिसतें. पण योगेश्वरी

अनुक्रम -५५-३१६६ वि: ... नि: ...
१३५६ नाः द्वि:

अंबेजोगाईस मुकुंदराजपूर्वी अस्तित्वांत असल्याचें ते सोयीस्कर विसरतात. योगेश्वरीमाहात्म्यांत मलयगंधर्वकथा नाहीं. तरीहि उद्धवसुतानें मलय-गंधर्वकथा तिथूनच घेतली, असा त्यांचा समज आहे. हरिनाथाचा शिष्य रामचंद्र हा बोबडे घराण्यांतील होता ही माहिती भाक्तिरहस्यग्रंथांत अस-ल्याचा आव ते आणतात. पुरावा मात्र देत नाहींत. भाक्तिरहस्य, धर्मरहस्य हे ग्रंथ आंभोर पक्षाचे समर्थक आहेत असें ते गृहीत धरतात, कारण मात्र सांगत नाहींत. ही यादी किती लांबवावी? विपर्यास आणि दिशाभूल या दोन बाबींवर कुळकर्णी यांची एवढी भिस्त असेल असें यापूर्वी आम्हांला कधींहि वाटलें नव्हतें. शके १८३५ पासून आजतागायतच्या चर्चेंत आंभोर पक्षानें दाखल केलेला पुरावा ४ भागांत विभागतां येईल: १) राजवाडेकृत वैनगंगेचा पाटपुरावा, २) य. खु. देशपांडे यांनी लक्ष वेधलेला यक्षदेव अम्नायाचा वृद्धाचार, ३) भक्तिरहस्य, संतचरित्र इ. डोळके यांनी उद्धृत केलेले ग्रंथ, ४) कळमेश्वर कागदपत्र व मुरहरमहाराज यांचे अभंग. यांपैकीं खरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे क्र. ४ चा. हा पुरावा एकदां तपासला म्हणजे क्र. २ व ३ यांचा उलगडा होऊं शकेल. क्र. १ बाबत आमचें म्हणणें पहिल्या विभागांत आम्ही मांडलेंच आहे. इतिहासाचार्यांनी वैनगंगा या अपपाठावर भिस्त ठेवून जीं मतें मांडलीं आहेत त्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं.

कळमेश्वर कागदपत्र व मुरहरमहाराजांचे अभंग

आमच्या सर्व पुस्तिकेभर सदरहू कागदपत्र व अभंग यांच्याकडे पुनः पुन्हा बोट दाखवलें आहे. आंभोर अंबेजोगाई वादांत प्रा. डोळके यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या १०६ व्या अंकांत वरील पुरावा दाखल केला आहे. आंभोर पक्षाचा खरा स्वतंत्र निःसंदिग्ध पुरावा म्हणजे हें कागदपत्र. अजगांवकरांचें मतपरिवर्तन ज्यांच्यामुळें घडून आलें, कृ. पां. कुळकर्णी यांनी पदोपदीं ज्यांचा आधार घेतला अशीं हीं कागदपत्रें आहेत. वऱ्हाडांतील संतकाव्याचे जुने संशोधक श्री. रामचंद्र विठ्ठल ऊर्फ बाबाजी बोबडे यांना कळमेश्वर येथील हस्तलिखितें चाळतांना हीं कागद-पत्रें सांपडलीं असें डोळके यांनी सांगितलें आहे. एक संपूर्ण पत्र शके

१७३१ चें. दुसरें वरेंच जुनें म्हटलें जाणारें एक अर्धवट, निनांवी, शक नसणारें असें आणि दोन अभंग. बहुधा शके १७३१ च्या आसपासचें असा हा पुरावा आहे. आंभोरचें नांव अंबानगरी होतें याचा पुरावा हें कागदपत्र. आंभोर नांव कां पडलें याचा पुरावा हेंच कागदपत्र, इतर कुण्याहि ठिकाणीं उपलब्ध नसणारा हरिनाथाचा जन्म इथें उपलब्ध आहे. त्यांच्या मातापित्याचें नांवहि याच कागदपत्रांत आहे. रामचंद्र चांद्याचा राहणारा, बोबडे वंशांतील याला पुरावा हेंच कागदपत्र. हरिनाथाचें यज्ञाचे वेळीं आंभोर येथील चैतन्येश्वर हें ज्योतिर्लिंग प्रकट झालें याचा पुरावा हेंच कागदपत्र. रामचंद्राची समाधि आंभोरला आहे, विवेकसिंधूंतील जैत्रपाळ भोपाळचा याचा पुरावा हेंच कागदपत्र. एवंच या वादाच्या दृष्टीनें आंभोरच्या बाजूला इतरत्र कुठेंहि सांपडत नव्हता तो पुराव्याचा खजिना या कागदपत्रांनी उपलब्ध झाला आहे. तेव्हां हा सर्व पुरावा डोळ्यांसमोर ठेवणें,या वादांत लंगडी बाजू कोणाची आहे हें समजण्यासाठीं फार आवश्यक आहे. तो खालीं दिला आहे :-

१) श्रीमाधवस्वामी.

॥ ह. भ. परायेण मुरहर महाराज पाठक वस्ती कळंबेश्वर चरन सवेशी गोविंद रघुनाथ हळदे मु ॥ फर्गीद्रपुर सां. न. आपण माझेकडे श्रीक्षेत्र अंबानगरी हली नाम आंभोर येथील श्रीहरीनाथाचे चरित्र लिहितो म्हणुन तेथील माहिती विचारीली त्याबद्दल सविस्तर माहिती तेथील विद्वान लोकाकडून व तेथील कागद व पोथ्या पाहून खालि लिहीली ती येणे प्रमाणें. वैण्यगंगा तीरावर अंबावति नगरी तीला हल्ली राजे भोसले सरकारनी बरेच गांवचे नांव बदलले त्याच प्रमाणें येथील नांव आंभोर ठेविलें. तेथें हरिनाथाचा जन्म सम्मत १२१५ झाला. माहिती विवेकसिंधूंत पहावी. हरीनाथाची तपश्चर्या वाराणशीत झाली. तपश्चर्येचे वेळीं चंद्रनगर येथून बोबडे वंशांतील रघुनाथ ऊर्फ रामचंद्र हरीनाथास शेरण आला. पुढें त्याला वाराणशीत नेवून मधुकरीस पाठविले ते वेळी मुकुंद ज्योतिषानें त्याचें मरण सांगितलें व त्याचे मरण हरिनाथांनी चुकविले. नंतर दुसरें दिवशीं त्या मुकुंदभट्टाचें येथें मधुकरीस पाठविले तेव्हां त्यानें गणीत करून पाहतां याला मरनच नाहीं हा अमर आहे म्हणून तो रघुनाथास शेरन

येवून त्या दोघांचे मागोमाग अंबनगरी येथें आला व चरणावर लीन होवून कृतार्त केला व मुकुंदराज नाम दीले. तो तेथेच राहत होता त्याचेवर रघुनाथाचे समोर यज्ञ होवून काशी विश्वेश्वर प्रगट झाले. तेच हल्ली चैतन्येश्वर आहेत. पुढें हरिनाथांनी समाधी घेते वेळीं रघुनाथाचे विनंती वरून त्यालाही आपले समोर समाधि दिली. ते दोघेंहि एका ठिकाणीं आहेत. समाधी घेते वेळीं मुकुंदराजास विवेकसिंधु करणेस सांगुन एक वेताची काठी देवून भोपाळ नगरीस जयंत्पाळास समाधी घोड्यासहीत लावून गंधर्व घोड्याचा उधार करावा व विवेकसिंधूचा बोध करावयास प्रेमानें मुकुंदराज शके १११३ ला भोपाळास गेला ही माहीती पाठावित आहो. कळावे ती. स्व. रा. बापुजी बाचा सुंदर यांस सां. न. कळविनें मीतीचंद्र माघ शु॥ ५ शके १७३१

आज्ञाधारक
गोविंद रघुनाथ ऊर्फ बापूजी हळदे
मु॥ फगीपुर.

२) ॥ श्री ॥

॥ श्री मल्लपशालीवान शके १०८१ प्रभवनाम संवत्सरी श्री हरीनाथ महाराज अंबानगरी येथें जन्मास आले. नंतर शके १०९० धाता-नाम संवत्सरी रघुनाथ ऊर्फ रामचंद्र बोबडे शशीग्रामवासी अंबानगरीस हरिनाथास शरण आला पुढें त्याचा मृत्यु काशीक्षेत्री चुकविला व मुकुंद-भट्ट काशीवरून येथें आले त्याला रघुनाथकडून उपदेश देऊन श्रीहरिनाथ यांनी मुकुंदराज केला....."

३) वैण्यगंगातीरी अंबावतीपुरी । जन्मले मुरारी हरीनाथ ॥१॥
सरस्वती माता सत्यदेव पीता । तयापोटी स्वता देव आला ॥२॥
वय पांच वरूष्य झाले देवरूषी । व्रतबंद त्यासी करी पीता ॥३॥
वेदविद्याज्ञान जाहले ते पूर्ण । करी आराधन विश्वेशाचे ॥४॥
नित्यनिरंतर काशी विस्वेश्वर । स्मरितसे फार हृदयांतरी ॥५॥
प्रतिदिनी जाय वाराणसी पाहे । शंकर तो ध्याय पुरश्चरणी ॥६॥
कीर्ती ऐकूनिया रघुनाथ पाया । दुसरे नाम तया रामचंद्र ॥७॥
चंद्रनगर स्थान जन्मभूमीजाण । आला तो शरण हरिपाई ॥८॥

मुरहर म्हणे संतसंग करणे । तेणे पार होणे भवसिंधु ॥९॥

४) हरिनें तयाला वाराणसी नेला । जीवन्मुक्त केला मृत्युलोकीं ॥१॥
दिव्य झाली काया तया रघुराया । उपनाम तया बोवडीया ॥२॥
मुकुंदभट्ट येता शरण हरिनाथा । पदी ठेवी माथा दोघाचीया ॥३॥
उपदेश देई रघुनाथ पाही । हरी सांगे त्याही आज्ञा ऐसी ॥४॥
स्वये हरीनाथे हस्त ठेवी त्याते । मस्तकावरून ते मुकुंदाचे ॥५॥
मुकुंदभट्ट जया नाम होते तया । करोनिया दया पूर्ण केला ॥६॥
मुकुंदराज योगी नाम तया लागी । जीवन्मुक्त जगी केला त्याते ॥७॥
वर देवोनिया ग्रंथ करोनिया । सांगे तया जाया भोपाळासी ॥८॥
मुरहर म्हणे ऐसा संत होणे । तरीच पावणे मोक्षपदी ॥९॥

वरीलपैकीं पहिलें पत्र बापुजी हळदे यांनी पाठविलेलें आहे. मुरहर-महाराजांच्या अभंगांत या पत्रांतील माहितीच पद्यरूपानें पुनः आली आहे. हीं पत्रें आणि हे अभंग यांची किंमत संशोधकांनी केली पाहिजे. या पत्राच्या सुरुवातीसच अंबावती नगरीचें नांव भोसले सरकारनी बदलून आंभोर ठेवले असल्याचा उल्लेख आहे. असें जर असेल तर या गांवाचें नांव पूर्वी कधीं तरी अंबानगरी असल्याचा पुरावा सांपडायला हवा. निःसंदिग्धपणें आंभोरचा उल्लेख अंबानगरी या नांवानें कधींच सांपडणार नाहीं. बरें भोसले सरकारनी गांवांचीं नांवें बदलण्याची टुम तरी काय म्हणून सुरूं करावी? १७३१ च्या आसपास अशा अजून किती गांवांचीं नांवें बदललीं गेलीं? याचा कांहीं पुरावा तत्रस्थ दप्तरांत आहे काय? निदान परगणा आंभोरपूर्वी नांव अंबानगरी असा उल्लेख कुठें दप्तरांत आहे काय? गांवांचीं नांवें बदलण्याच्या पाठीमागें कांहीं हेतु असतो. एक तर भिन्नधर्मीय राजे लोक आपल्या धर्मांशीं मिळतीं जुळतीं नांवें देतात. उदा० अंबेजोगाईचें 'मोमिनाबाद'. अगर नांव बदलतांना आपलें, आपल्या नातेवाइकांचें, गुरूचें, प्रियेचें असें कोणतें तरी व्यक्ति अगर देववाचक नांव ठेवलें जातें. उदा० 'हैदराबाद.' किंवा कटु नांव बदललें जातें. उदा० रांडलीचें बदललेलें नांव 'सुहागन'. अंबानगरीचें आंभोर करण्यांत भोसले सरकारनें काय साधलें? भोसले यांची अंबाबाई ही कुलदेवता. नसल्या गांवांना ते अंबेचें नांव देतील कीं, असलेल्या

अंबेचें नांव बदलतील ? कसाहि विचार केला तरी निष्पन्न फक्त एकच होतें. कुणाला तरी आजचें आंभोरें हीच मूळची अंबानगरी होती हें सिद्ध करण्याचा उपद्व्याप करावयाचा होता हेंच खरें.

या पत्रांत व अभंगांत मिळून हरिनाथाचा जन्म संवत् १२१५, रघुनाथाशीं त्यांची भेट शके १०९०, त्यांची माता सरस्वती, पिता सत्यदेव, याची माहिती दिली आहे. अजून मुकुंदराजांच्या स्थलकालाचा निश्चय होत नाहीं, बापूजी हळदे व मुरहरमहाराज पाठक यांनी ही हकिकत कुठून पैदा केली असेल बरे ? हरिनाथानें यज्ञ केला त्या वेळीं चैतन्येश्वर प्रकट झाले व ते हल्लीं आंभोरला उपलब्ध आहेत, ही विवेकसिंधूच्या विरुद्ध जाणारी माहिती या पत्रांत कुठून आली ? हरिनाथांनी तप अंबानगरींत केलें. हीं पत्रें तें तप वारणासींत झाल्याचें म्हणतात. याचा अर्थ कोण्या तरी आधुनिकानें विवेकसिंधूंतील १८।४६ वर गोता खाल्ला हा नाहीं काय ? रघुनाथ बोबडे घराण्यांतील ही माहिती यांनी कुठून पैदा केली ? रघुनाथानें हरिनाथाच्या समोर समाधि घेतली याला विवेकसिंधूत आधार आहे काय ? मुकुंदराज म्हणतो, जयत्पाळासाठीं विवेकसिंधु लिहिला. हा ग्रंथ त्यालाच उद्देशून आहे. तेव्हां तो उभयतांच्या भेटीच्या नंतरचा असला पाहिजे. पण पत्रांत तर विवेकसिंधु मुकुंदराजांनी आधीं लिहिला आणि जैत्रपाळाची भेट नंतर झाली असा उल्लेख आहे. ही माहिती त्यांना कुठून मिळाली असावी ? याच पत्रांत गंधर्व घोड्याचा उल्लेख करून हळदे यांनी फार मोठी चूक केली आहे. कारण मलयगंधर्वाची कथा सर्वप्रथम वऱ्हाडच्या उद्धवसुतांत आढळते व ती कथा मुकुंदराज अंबेजोगाईचे आहेत असें स्पष्ट सांगणारी आहे. उरलेल्या सर्वांनी मलयगंधर्वाची कथा उद्धवसुतांतून तरी घेतलेली असावी अगर त्या साऱ्यांचें उगमस्थान कुठें तरी एकत्र असावें. पण मलयगंधर्व-कथा मुकुंदराज अंबेजोगाईचे असें सांगणारी रामदासी परंपरेची कथा आहे. ही कथा भोपाळसाठीं वापरल्याचा पुरावा हळदे यांना कुठून मिळाला ? शके १७३१ सालीं आंभोरला उपलब्ध असणारा पुरावा जर इतका विपुल असेल तर आज तो कां सांपडत नाहीं ? हरिनाथाचा जन्म संवतांत पण मुकुंदराजांचें भोपाळींगमन शालिवाहन शकांत कां ? दैनंदिन व्यव-

हारांत शके १७३१ सालीं नागपूरला 'फणींद्रपुर', चांद्याला 'शशिग्राम' असें म्हणत होते काय? विवेकसिंधु सांगतो, हरिनाथाचें मौंजीबंधन झालें. मग वेदाध्ययन झालें, मग बारा वर्षें पाशुपतव्रताचें आचरण झालें. त्यानंतर रामचंद्राला उपदेश झाला. हीं पत्रें सांगतात रामचंद्र ऊर्फ रघुनाथ शरण आला त्या वेळीं हरिनाथाचें वय १० वर्षांचें होतें. छोट्याछोट्या पत्रांत इतक्या विसंगति कां आढळाव्या? याचें स्पष्टीकरण होणें जरूर आहे.

शके १७३१ ला पत्राच्या खालीं आज्ञाधारक म्हणून नांव लिहिण्याची पद्धति होती काय? आमच्या मतें ही पद्धति इंग्रजींतून मराठींत आली आहे. शके १७३१ ला संतचरित्रकार संतांच्या मूळ गांवीं पत्रें पाठवून शक्यतो अस्सल माहिती गोळा करून चरित्रें लिहीत असत काय? आमच्या मतें हा काळ ऐकीव माहितीवर भर ठेवण्याचा आहे. त्या काळचा एक गोविंद रघुनाथ हळदे पोथ्या पुराणें पाहतो, सर्व माहितगारांशीं चर्चा करतो व चर्चेच्या अंतीं आलेला निष्कर्ष पत्रानें कळवतो अशा प्रकारचा चिकित्सक अभ्यास शके १७३१ सालीं होत होता काय? वरील सर्व कारणांमुळें हीं पत्रें व त्यावर आधारलेले अभंग हें सारेंच प्रकरण बनावट आहे, पुरावा तयार करण्यासाठीं हेतुपुरस्सर रचलेलें आहे असें आमचें स्पष्ट मत आहे.

ज्या प्रा. डोळक्यांनी हीं पत्रें पुढें आणलीं त्यांना त्यांच्या विश्वसनीयतेची निःशंक खात्री देतां आली नाहीं–ती दिली आहे, कृ. पां. कुळकर्णी यांनी! त्यांच्या मतें हे अस्सल कागदपत्र आहेत. कुठल्याहि पौराणिक कथेपेक्षां तें केव्हांहि जास्त विश्वसनीय आहेत. आम्ही तर संशोधनांतील या त्यांच्या धाडसी विधानानुळें कांहीं काळ अवाक् झालों. येहोळी शिलालेख, कौरव–पांडवांचें युद्ध इ. स. पू. ३१०१ ला झाल्याचें सांगतों. भारतीय युद्धकाल निर्णयाचा हा अस्सल पुरावा म्हणून संशोधक मान्य करतील काय? मुकुंदराज हे शके १११० चे. पत्र शके १७३१ चें. पत्र सांगतें कीं, पत्रलेखकानें परंपरागत उपलब्ध माहितीचा वापर केला. शके १७३१ चें पत्र शके १११० सालासाठीं जर अस्सल म्हणावें तर उत्तरकालीन शालिवाहन शकाचा उल्लेख करणारे शिलालेख या शकाच्या

चर्चेत अस्सल कां ठरूं नयेत ? आमच्या मतें प्रत्यक्ष माहिती ज्यांत ग्रथित आहे, असें समकालीन कागदपत्र, अस्सल म्हणत असतात. कुळकर्णी यांच्या या अस्सलपणाच्या मुद्द्याला आमच्याजवळ दुसरें उत्तर नाहीं.

भक्तिरहस्य इ.

विदर्भांत अशांत उपलब्ध झालेल्या संतचरित्रांचा उल्लेख आंभोरपक्षाकडून अधूनमधून होत असतो. यांतील एक ग्रंथ शके १७५० चा 'धर्मपुरीमाहात्म्य' हा आहे आणि दुसरा त्यावर आधारलेला केशव जयरामाचा शं. १७७९ तील 'भक्तिरहस्य' हा ग्रंथ आहे. आंभोरच्या समर्थनासाठीं या ग्रंथांचा नेहमीं हवाला दिला जातो; पण या ग्रंथांतील उतारे देतांना पद्धतशीरपणें स्थलनिर्देश टाळलेले असतात. मुकुंदराज अंबानगरीचे अगर अंबावतीपुरीचे इतका तुकडा या ग्रंथांतून घ्यावयाचा. अंबानगरी म्हणजे आंभोर याचा पुरावा कळमेश्वर कागदपत्रांतून घ्यावयाचा. रघुनाथ हरिनाथास शरण आला याचा पुरावा भक्तिरहस्यांतून आणि रघुनाथ बोबडे वंशांतील चांद्याचा होता याचा पुरावा कळमेश्वर कागदपत्रांतून. असा सतत खेळ चालूं असतो. कुळकर्णी यांच्या पद्धतीनें सांगावयाचें म्हणजे यक्षदेव अम्नाय, भक्तिरहस्य व कळमेश्वराचें कागदपत्र यांनीं मिळून एक परंपरा होते; पण अशी परंपरा होते काय, याचा पुरावा मात्र दिला जात नाहीं. कळमेश्वरी कागदपत्रें बनावट आहेत आणि धर्मरहस्य, भक्तिरहस्य हे ग्रंथ जरी आमच्या पाहण्यांत आले नसले तरी त्यांचा जो हातचा राखून उपयोग होतो त्यावरून या ग्रंथांतील माहिती अंबावतीपुरीविषयीं आहे म्हणजे अंबेजोगाईविषयीं आहे. आंभोरविषयीं नाहीं असें आमचें मत बनलें आहे. शिवाय हे ग्रंथ फारच उत्तरकालीन आहेत हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे. उदा. भक्तिरहस्यांत खालील उतारा आहे:-

जयजयकारे करून । उत्साह करीती संतजन ।
नंतर मुकुंदस्वामीन । ग्रंथ पूर्ण आरंभिला ॥७७॥
बैसोनिया समाधीपाशी । वाचती केलिया ओवीशी ।
हुंकार शब्द निघता तिशी । मग ग्रंथाशी लाविती ॥७८॥

अष्टादशाध्याय पर्यंत । येच रीती केला ग्रंथ ।
विवेकसिंधुचा गुह्यार्थ । जाणति संतानुभवे ॥७९॥

आतां या उताऱ्यांत मुकुंदराजांनी ग्रंथ कुणाच्या समाधीपाशी बसून लिहिला हे स्पष्ट नाहीं; पण कळमेश्वर कागदपत्रांनी हरिनाथ आणि रघुनाथ यांची समाधि एकत्र असल्याचें सांगितलें आहे. त्यावरून ही समाधि जिथें असेल तिथें मुकुंदराजांनी ग्रंथ लिहिला असें समजावयाचें आणि समाधि कुठें आहे तर आंभोरला. आंभोरची समाधि मुकुंदराजांच्या आजेगुरूची कशावरून तर कळमेश्वर कागदपत्राचा पुरावा आहे म्हणून. जर सगळेंच कळमेश्वर कागदपत्रावरून ठरवावयाचें तर उपरोक्त ग्रंथ उद्धृत तरी कशासाठीं करावयाचे ; याचें कारण, आंभोर पक्षाचे समर्थक असा भास निर्माण करूं इच्छितात कीं, जें कळमेश्वर कागदपत्रांत आहे तें अजूनहि कांहीं ठिकाणीं आहे. हा भास निर्माण करण्यांत यश आलें म्हणजे कळमेश्वर कागदपत्र अस्सल ठरतात अशी ही जोड आहे. सारांश मराठवाड्यांतील, पश्चिम महाराष्ट्रांतील अगर विदर्भातील शके १८३५ पूर्व कोणतेहि उल्लेख जर ते अस्सल असले तर, एक तर मोघम अंबानगरीचा उल्लेख करतात अगर दुसरे म्हणजे जोगाई अंब्याचा उल्लेख करतात असा आमचा दावा आहे. हा दावा खोटा पाडणारा पुरावा आंभोर पक्षांकडून अजून आलेला नाहीं.

यक्षदेव वृद्धान्वय

मुकुंदराजांच्या स्थलनिर्णयाच्या संबंधांत महानुभावीय मेघचंद्रकृत 'यक्षदेव वृद्धान्वय' आणि 'वृद्धाचार' वगैरे ग्रंथांचा अभिनिवेशानें उल्लेख केला जातो. हा ग्रंथ शके १६६१ चा आहे. हे ग्रंथ आमच्या पाहण्यांत आलेले नाहींत. त्यांतील एकूण २ उतारे आमच्या समोर आहेत. ते असेः–

१) गुरु आदिनाथु शिष्य हरिनाथु । तेणें रघुनाथु बोधियेला ।
वैणगंगेतीरि अंब्रावतीपुरी । भेटला मुरारी रामदेवा ।
रामासी वेदांतु नागेंद्रा सिद्धांतु । गुरु नागनाथु आम्हासवे ।

२) राजोरा रोहणे झाडीमंडळीशी । रावो पुण्यराशी जयत्पाळ ।
ज्येष्ठ तात बंधु नृपति मुकुंद । योगिज्ञान सिंधु ब्रह्मचारी ।
नैश्वर संसार ज्ञाने जाणोनिया । मग तो राघवा अनुसरे ।
नृसिंह बल्लाळ पुत्र जयत्पाळ । अनुज अमळ महादेवु ।
कुबेराही पशी संपती विशेष । पोटी नसे वंश जयत्पाळ ।
धाकला अनुज महेश भुभुज । तयाचा आत्मजु सारंगु तो ।
घेओनी पल्लवी राज्यभार घाली । संपत्ति वोपिली बंधुपुत्रा ।
आपण मुकुंदा परिशरण आला । संग त्याग केला जयत्पाळे ।
मुकुंदाचे देहे बाणली विरीक्त । जाली चित्तवृत्ति समाधिस्थ ।
जयत्पाळ राव मुकुंदा विनवी । वेदांतु गोसावी निरोपिजे ।
तव गुरुराये महाराष्ट्रीया वाणी । वेदांतु कथोनि तोषविला ।
विवेकसिंधु पै नामे संबोधिली । तोचि लोकी आली आजवरी ।
नमो आदिनाथा नमो हरिनाथा । वेदांतु सिद्धांता निरोपकु ।
नमो रामनाथा नमो श्रीमुकुंदा । खंडिले दुर्मता पाखंडिया ।

या उताऱ्यांत हरिनाथांनी वैनगंगेच्या तीरीं अंबावतीपुरींत रघुनाथ वगैरे शिष्यांना उपदेश दिल्याचें म्हटलें आहे व जैत्रपाळाचें राज्य झाडीमंडळांत होते असा एक मोघम उल्लेख केला आहे. ज्या अर्थी झाडीमंडळ म्हणजे वऱ्हाड, जैत्रपाळ वऱ्हाडचा त्या अर्थी अंबावतीपुरी विदर्भांत आली पाहिजे अशी ही साखळी आहे. झाडीमंडळ या उल्लेखानें महानुभावीय ग्रंथकारांना कुठपर्यंतचा मुलुख अभिप्रेत होता हें समजण्यास मार्ग नाहीं. त्यांनी केलेल्या महाराष्ट्राच्या खंडमंडळाच्या व्याख्या मोठ्या ऐसपैस आहेत. त्यामुळें सगळा मराठवाडा झाडीमंडळांतच येत होता किंवा नव्हता हें सांगणें कठीण आहे. पण मेघचंद्रानें अंबावतीपुरी नेमकी कुठें आहे, हें सांगितलेलें दिसत नाहीं. विवेकसिंधूतील परंपरागत उल्लेख "वैन्यगंगेचिया तीरी । मनोहर अंबानगरी" । हा मेघचंद्राच्या नजरेसमोर असावा. त्यानुळें त्या उल्लेखावरून कांहींहि सिद्ध होणार नाहीं. आदिनाथ, हरिनाथ ही परंपरा अस्सल शैव, अद्वैती, शंकराचार्याभिमानी, द्वैती, वैष्णव महानुभावांनी ही परंपरा आपल्यांत सामावून कां घ्यावी हें कळत नाहीं. विवेकसिंधूंचें लोकप्रियत्व हेंहि एक कारण असावें. हरिनाथाचें निधन विवेकसिंधु

पूर्ण होण्याच्या आधीं झालें असावें असें मानणें भाग आहे. विवेकसिंधु शके १११० चा. जर हरिनाथाचा शिष्य नागेंद्र अगर नागनाथ हा महानुभावीय ग्रंथकार म्हणतात त्याप्रमाणें नागदेवाचार्य असेल तर त्याचा मृत्यु शके १२२८ ला झाला. विवेकसिंधूच्या निर्मितीच्या वेळीं नागदेव हयात असला पाहिजे. उपदेश घेण्याइतका मोठाहि असला पाहिजे. तेव्हां मरतांना त्याचें वय १२५ च्या वर जाते. नसतां विवेकसिंधूच्या फक्त कांहीं प्रतींत आढळणारा १११० चा कालोल्लेख खोटा ठरतो. [तो खोटा ठरला कीं, साऱ्या शारंगधर प्रकरणाचा न सांगतां निकाल लागला. वरील उताऱ्यांतील १११० व शारंगधर खरे असतील तर 'गुरु नागनाथु आम्हासवें' हें खोटें असेल. अगर याच्या उलट दुसरें खरें असेल तर पहिलें खोटें ठरलें पाहिजे.] यच्चयावत् सर्व परंपरा मुकुंदराज आणि जैत्रपाळ यांचा संबंध त्याला शरण आणून शिष्य करण्याचा समजते. यक्षदेव अम्नाय, जैत्रपाळ आपणहून शरण आल्याचें सांगतो. यक्षदेवाच्या वृद्धाचारांत निवृत्ति आणि ज्ञानेश्वर हेंहि एका आरतींत येतात. ही मंडळी महानुभाव ग्रंथांत कशी आली याचें आश्चर्य वाटतें. मुकुंदराज आणि जैत्रपाळ हे परस्परांचे जवळचे बिरादर. (चुलतभाऊ अगर चुलते) जैत्रपाळ आणि शारंगधर ही जोडी काकापुतण्याची इ. माहितीहि परंपरा अगर पुरावा यावर टिकणारी नाहीं. तेव्हां महानुभावीय ग्रंथांतील हिंदु संतांचे उल्लेख थोडे जपून वापरले तरच सत्यसंशोधनाला मदत होईल. आहे त्या अवस्थेंत यक्षदेव अम्नाय बैतुल, खेडले, आंभोर, भोपाळ यांपैकीं कशाचाहि उल्लेख करीत नाहीं. येवढें ध्यानांत ठेवलें म्हणजे आंभोर पक्षाचा त्यावरील आग्रह वृथा असल्याचें दिसून येईल.

आपल्या पुराणग्रंथांत ज्याप्रमाणें इक्ष्वाकु वंशांत सिद्धार्थ गौतम व त्याचा मुलगा राहुल हे राजे म्हणून जाऊन बसले किंवा बुद्ध हा पुराणांनी विष्णूचाच एक अवतार करून टाकला तसल्या प्रकारचा हा महानुभावीय प्रयत्न दिसतो. महानुभावीय वाङांत कधीं कधीं विवेकसिंधूची पंचाध्यायी पोथी आढळते. यावरून त्यांना पहिले पांच अध्याय प्रमाण असल्याचें भासतें. पण तो केवळ भासच आहे. कारण पहिल्याच अध्यायाचें पहिलें नमन शंकराला अद्वैत भूमिकेंतून आहे. विवेकसिंधूचा महानु-

भावांत शिरकाव उत्तरकालीन असावा व म्हणून तो पचवून टाकण्याचा एक प्रयत्न या दृष्टीनें त्याकडे पाहिलें पाहिजे. सारांश आंभोरच्या स्थलनिर्णयाला यक्षदेव अम्नायाचा पुरावा उपयोगी पडूं शकत नाहीं.

उपसंहार

येथवर आम्ही केलेल्या विवेचनांतून मुकुंदराजांना अभिप्रेत अंबानगरी कोणती असावी हें स्पष्ट झालेंच असेल. आम्ही आंभोर पक्षाचा उदय विद्वानांच्या डोक्यांतील व राजवाडे उत्तरकालीन आहे हें सिद्ध केलें आहे. आंभोरपक्षाचा परामर्श घेऊन त्यांनीं पुढें मांडलेल्या पुराव्याचें स्वरूपदर्शन केलें आहे. मुकुंदराज परंपरा (आदिनाथ ते बकाजी रंगनाथ) मराठवाड्यांतील हें दाखविलें आहे. मुकुंदराज अंबेजोगाईचे हें सांगणारा सर्वांत जुना पुरावा योगेश्वरीमाहात्म्य याची चिकित्सा केली आहे. मुकुंदराजांना अभिप्रेत असलेली अंबानगरी कोणती हें विवेकसिंधूंतील त्यांच्याच शब्दांवरून सिद्ध केलें आहे. मुकुंदराजांना अंबेजोगाईचे समजणारी प्रदीर्घ परंपरा दिली आहे. मराठी वाङ्मयांत खरोखरी आंभोरचा संबंध मुकुंदराजांशीं दाखविणारी परंपराच नाहीं असें दाखवून दिलें आहे. विदर्भातील मुकुंदपरंपरेचे मठ बकाजी उत्तरकालीन असल्याचें मत मांडलें आहे व आंभोर बाजूच्या अद्यथावत् समर्थकांपर्यंत सर्वांचा यथामति विचार केला आहे. हा विचार करतांना क्वचित् कठोर टीका केली आहे; पण तिचा हेतु व्यक्तीवर हल्ले करणें हा नाहीं, हें आम्ही नम्रपणें सुचवूं इच्छितों. बारकाईनें ही पुस्तिका चाळल्यास हिच्यांत आमच्या बाजूची मांडणी करण्यावरच्च आम्ही जास्तींत जास्त भर दिला आहे हें दिसेल. इतरांच्या खंडनावर भर दिलेला नाहीं हें कळून येईल. या पुस्तिकेमुळें आंभोरपक्ष समाधानी होईल अशी आम्हाला अपेक्षा नाहीं; पण महाराष्ट्रीय चिकित्सक वाचकांना मुकुंदराजांना अभिप्रेत अंबानगरी अंबेजोगाई आहे हें पटेल असा विश्वास वाटतो. इति.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 376464.... विः निरो.
क्रमांक ....1.3.46.... नोंः दिः .....
20/1/...

१. परिशिष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
नं 99806

१) वाणीगंगा

ब्रह्मवाण्याः समुत्पत्तिं कथयामि द्विजोत्तमाः । यस्याः स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ॥

विधेमिथ्यावादिनस्ते जलरूपाभविष्यति ॥ वाणीगंगामवाप्याथ निजरूपमवाप्स्यति ॥

ततःसा ब्रह्मणोवाणीधारापुर्याः समीपतः । तडागतो विनिर्गत्य प्राप्ता गंगाभघापहां ॥ तद्वाणीसंगमन्नामतीर्थमत्यद्भुतंभुवि । यस्यस्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ४३

न वाणीसंगमादन्यत्तीर्थं पापहरंभुवि । यत्रस्नाता नरायाति तद्विष्णोः परमंपदं ॥४४॥

ये वाणीसंगमेस्नात्वा तर्पयंति सुरानृषीन् । पितृंस्तेनाक्षया तृप्तिर्जायतेनात्रसंशयः ॥४५॥

(योगेश्वरीमहात्म अ. ४)

२) वाणगंगेचा गोदावरीमाहात्म्यांत उल्लेख

"सरस्वातीसंगमश्च वाणीसंगमएवच । गौतम्यासंगतादेवी वाण्येवच सरस्वति ॥२२॥ ब्रह्माविधुयवाग्दोष्टयस्वंच धामागमत्पुनः ॥ तस्मात्तत्र शुचिर्भूत्वास्नात्वातत्रचसंगमे ॥

(गौतमीमहात्म्य अ. ६६)

३) मुकुंदराज व जैत्रपालविषयक उल्लेख.

योगेश्वरी क्षेत्रांतील सिद्धपुरुषांचीं स्थानें.

बहवः संतिसिद्धावै साधवश्च तथापरे ।
षडशीतिः सिद्ध मुख्यास्तेषां प्राधानिकान् श्रुणु ।
आनंदभैरवो नाम्ना बुटीनाथः स उच्यते ॥
मुकुंदराजसिद्धश्च द्वितीयः परिकीर्तितः ।
तृतीयो नागनाथश्च सिद्धानंदश्चतुर्थकः ॥
नाम्नावै परमानंदः प्रख्यातस्तुसएवहि ।
पंचमो विमलोनाम षष्ठीत्वं रेणुकाभिधा ॥
षडेते कथिताः श्रेष्ठास्तेषां स्छानानि मे श्रुणु ।
ब्रह्मावाण्याजयंत्याश्च संगमोयत्रवर्तते ॥
जनार्दनगिरिस्तत्र आनंद भैरवः स्छितः ।
सेवाकर्तृ जनानांस संतुष्टोयदि जायते ॥
ददाति दर्शनं दत्वा सुवर्णादि क्रिया मनुं ।
प्रकुर्वंति जनास्तत्र स्नानदान मभीक्ष्णशः ॥
पूजनं दर्शनं वासंते नराः पुण्यमूर्तयः
सिद्धनाथ प्रसादेन तीर्त्वा दुःखान्यनेकशः

× × × ×

मुकुंदराज

मुकुंदराज सिद्धश्च मुकुंदे पर्वते स्छितः ।
समहान् शीघ्रकार्यंच विप्राणां सुसुखावहः ।
कर्ता सर्वजनैः पूज्यः मनोरथ करः सदा ॥
अश्वदर्याः समीपस्छ गुहायां सर्वदास्छितः ।
करोति रक्षणंपुंसांभक्तया प्रभजतां नृणां ॥
तत्रवासाद्यनुष्ठानात दुर्लभं प्राप्य मानवः ।
ज्ञानवैराग्य माप्नोतिकामांश्चैव प्रसादतः ॥
मुकुंदराजेति स्मरन् तिष्ठतियः सदा ।
मुच्यते सर्वपापेभ्यो भुक्तिंमुक्तिंच विन्दति ॥

सिद्धःपूर्वं गुहेयासन्गुप्तोऽभूवह ।
योगधारणया काशींगत्वा सदास्थितः ॥
ग्रंथान्नानाविधांश्चैव भक्तानुग्रह काम्यया ।
सर्ववेदांतशास्त्राणां सारमुधृत्य सत्तमः ॥
विवेकसिंधुपरमामृतं सचाकरोत्सुधीः ।
सिद्धानामृषभोयोगी मुकुंदः सिद्धराजकः ॥
साधुपीडांततोश्रुत्वा जिनपालेन वैकृतां ।
स्वक्षेत्रे पुनरांबेतु गुहायां प्रगटोभवत् ॥
जिनपालं विजित्वैवं सन्मतेनैव कुंठितम्
कृत्वा शिष्यं जयत्पालं साधुमुक्तिं करिष्यति ॥

(योगेश्वरीमहात्म अ. २२)

× × × ×

वर्णितंसुमहादिव्यं योगिन्याच विराजितं ।
इतिदेव्याः पुराणार्थं संगृह्य सुमनोहरं ॥
योगेश्वरी महात्म्यंच नानाख्यानैर्विराजितं ॥
इत्थं योगेश्वरी देव्याः माहात्म्यं वर्णितं मया ।
कथितं वो द्विजश्रेष्ठा भवत्प्रश्नानुसारतः ।
त्रिंशाध्याय कथा सारं श्रुणुयाद्यः पठेन्नरः ॥
सर्वान्कामानवाप्नोति सत्यं सत्यं न संशयः ।
कृपावलोकतोयस्याः मायामोह निबंधनं ।
दूरी भवतितामंबां वंदे योगेश्वरीं सदा ॥
योगेश्वरी विबुध प्रार्थनयाऽवतीर्य दंतासुरंतु विनिहत्य उवासचांबे । तस्या महात्म्य मखिलाघ हरं हि कृष्ण व्यासेन यत्कृतमिदं किल देवि तुष्टयै ॥
शुभं भवत्विदं यस्या महात्म्यं सत्सुसंमतं
योगेश्वरी प्रेरण्ययाकृतं मेसा प्रसिदतु ॥
इति श्री भविष्योत्तर पुराणे योगेश्वरी महात्म्ये त्रिस्छली वर्णनं क्षेत्र चतुर्द्वार यात्रा महिमा वर्णनं.....त्रिंशोध्यायः

योगेश्वरीमहात्म अ. ३०

२ परिशिष्ट

कुंभकर्णटाकळी व मुडलगी मठाची परंपरा

हरिनाथ, रघुनाथ व मुकुंदराजांच्या वास्तव्यस्थानाचा परिसर अंबेजोगाई होय आणि याच परिसरांत मुकुंदराज परंपरेतील ठळक व्यक्ती होऊन गेल्या हा मुद्दा आम्ही स्थलनिर्णयाच्या वादांत वारंवार स्पष्ट करीत आलों आहों. पुस्तक छापलें जात असतांना प्रा. पंडित आवळीकर यांचे लिखाण प्रसिद्ध झालें. महाराष्ट्र साहित्य पत्रिका वर्ष ३२ अंक १२७, नवभारत सप्टेंबर १९५८ आणि नवभारत जुलै १९५९ या तीन लेखांत मिळून प्रा. महाशयांनी बेळगांवकडे गोकाक जिल्ह्यांत मुडलगी येथें जो मुकुंदराज परंपरेचा मठ आहे तेथील मौलिक माहिती उजेडांत आणली. या मुडलगी मठाचे मूळ पुरुष रंगबोधस्वामी हे मराठवाड्यांतील, परभणी जिल्ह्यांतील कुंभकर्ण टाकळी येथील राहणारे होते. तेथून ते मुडलगीकडे गुरुआज्ञेमुळें गेले. कुंभकर्ण टाकळी येथें होऊन गेलेल्या प्रसिद्ध सहजबोध स्वामींचे ते शिष्य होत. मुकुंदराजांच्या सर्व उपलब्ध परंपरांत सहजबोधांचें नांव प्रामुख्यानें आढळतें. प्रा. आवळीकरांनी उजेडांत आणलेल्या "देशिकचरित्र" या ग्रंथांत सहजबोधस्वामी टाकळी गांवांत मठ करून राहत होते असें म्हटलें आहे. "तेथे सहजबोधस्वामी गुरुवर। मठ करूनि निरंतर। तयाग्रामी कृपा कर। वर्ते साचार ब्रह्ममूर्ति॥ श्रीमन्महासुळमठ। गंगागोदावरी तटाक। कुंभकोण टाकळी नगर। सिद्धसिंव्हासनाधीश्वर॥ श्रीसहजबोध स्वामी...इ. प्रस्तुत लेखकाने आवळीकरांच्या या माहितीवरून शोध घेऊन कुंभकर्ण टाकळीची यात्रा केली. हा टाकळी मठ मुकुंदराजांच्या परंपरेवर प्रकाश टाकणारा महत्त्वाचा पुरावा असल्यामुळें तेथील शोध माहिती थोडक्यांत पुढें दिली आहे :–

सहजबोधांचे स्थान असणारी ही कुंभकर्ण टाकळी अंबेजोगाईहून ३०।३५ मैलाच्या परिसरांत आहे. हरिनाथ मुकुंदराजांची अंबेजोगाई, रघुनाथांची रत्नेश्वररामपुरी व सहजबोधांची कुंभकर्ण टाकळी ही ठिकाणें परस्परांपासून फारशी दूर नाहींत. परभणी ते जिंतूर या सडकेवर परभणी-पासून ६ मैलावर हें ठिकाण आहे. गोदावरी येथून १०।१२ मैल लांब असली तरी हा गोदावरीचाच परिसर आहे असें सर्वत्र मानलें जातें. आख्यायिका अशी आहे कीं, या गांवांतील नृसिंहलक्ष्मीतीर्थाच्या विहिरींत पत्रिका लिहून टाकली कीं, सहस्रभोजनाकरितां किंवा प्रयोजनाकरितां विहिरींतून आपोआप अनेक भांडी म्हणजे कुंभ वर येत. पण चेष्टाबुद्धिमुळें हा प्रकार पुढे बंद झाला. यामुळेंच ही टाकळी कुंभकर्णटाकळी म्हणून प्रसिद्ध आहे. या गांवाचे उपनांव लालाईची टाकळी असेंहि आहे. स्वामी सहजबोधांची समाधी तेथें एका शेतांत आहे. सहजबोधांचे वंशज अद्याप तेथें विद्यमान आहेत. पण त्यांचेजवळ कांहीं स्फुटपदें व अगदीं अलीकडे म्हणजे शके १८४३ मध्यें ऐकीव माहितीवरून लिहिलेला "सहजबोध कथामृत किंवा लीलामृत हा ग्रंथ खेरीज करून फारशी माहिती उपलब्ध झाली नाहीं. प्रस्तुत ओवीबद्ध ग्रंथ यशवंतराव कातनेश्वरकर व रामकृष्ण या दोघांनी मिळून लिहिला.

या ग्रंथाच्या आधारें जी माहिती कळते ती अशी :– सहजबोध हे मुळचे जिंतुर जवळील भोगांवचे राहणारें. (भोगावति जन्मभूमि। वास्तव्य टंकावति ग्रामी.) मातापित्याचें नांव विठ्ठलपंत व रुखमाई. गोत्र शांडिल्य. वृत्ती कुळकर्णीपण. वडीला बरोबर गांवचा शेतसारा घेऊन कचेरीच्या गांवास जात असतां रस्त्यांत सहजबोध एका विहिरींत पाणी पिण्यासाठी उतरले. ते पाण्यातून वर आलेच नाहीत. मुलगा विहिरींत बुडाला असें समजून वडील दुःखाने घरीं आले व सहा महिने वाट पाहून पलाशविधीने क्रियाकर्म केले. तोंच गावांत खबर आली कीं सहजबोध जिवंत आहेत. सहजबोधांनी आई-बापाचा संबंध तुटला असें गृहित धरले. गोदेच्या कांठी गंगाखेडास कोणी निजानंद नामक एक सिद्ध पुरुष होते त्याना गुरु केले. त्यांची बारावर्षें सेवा केली. गुरूनें सहजबोधाचा ज्योतिषानें वर्तविलेला अपमृत्यु चुकवला आणि

टंकावति ऊर्फ कुंभकर्णटाकळी येथें जाऊन राहण्याची आज्ञा केली. सहजबोधांनी ज्ञानेश्वराप्रमाणे निर्जीव भिंत चालविली व सिद्धांचा गर्व परिहार केला असें त्यांचें सामर्थ्य. (निर्जीव चालवूनि भिंति । हरविली सिद्धगर्वोक्ति । जे जन सहजबोध वदती । ते कलिमाजी उद्धरती ।।) मुडलगी मठाचे मूळ पुरुष रंगबोध व त्यांचे वडील कोनेरीबोध हे दोघेहि या सहजबोधांचें शिष्य. सहजबोध लीलामृत ग्रंथात सहजबोधांच्या कुटुंबाचे नांव इंदिरा दिलें आहे. त्यांची समाधी गांवाबाहेर पूर्वेकडे एका शेतांत आहे. त्यांनी जिवंत समाधि घेतली किंवा जमीन दुभंगून ते जमिनीत गुप्त झाले असें सहजबोध लीलामृतात म्हटलें आहे. कार्तिक पौर्णिमेला कुंभकर्णटाकळीस मोठा उत्सव होतो. ही सहजबोधांची निर्याण तिथी मानली जाते.

शिवकल्याण हे सहजबोधांचे पुत्र. मुडलगी मठाच्या कागदपत्रांत ते सहजबोधांचे नातू असल्याचा उल्लेख केला आहे. रंगबोधांनी "श्री सहजबोध स्वामी सद्गुरु यांचे नातु । श्री शिवकल्याणबोध स्वामी" असे पत्रांत म्हटलें आहे. दोघेहि समकालीन असल्यामुळे शिवकल्याण हे सहजबोधांचे नातू असणे अधिक शक्य आहे. आवळीकरांच्यामते रंगबोधाचा निर्याणकाळ शके १५८१ असावा. व त्यांच्या रंगबोधिनी या ग्रंथाचा रचनाकाळ शके १५४८ असावा. सहजबोध हे रंगबोधांचे गुरू. तेव्हां त्यांचा काळ स्थूलमानाने शके १५०० ते १५५० च्या आंत असावा. शिवकल्याणाच्या नांवेहि अनेक चमत्कार नमूद आहेत. (चित्रा हस्ते लावूनि दीपका, करिसी भागवत पारायण । आर्वी माजी वस्ती करूनि दाखवी चरणदीना.) टाकळीजवळ आरवी नांवाच्या गांवी शिवकल्याणाची समाधी आहे. प्रभावति (परभणी) च्या एका राजसरदाराच्या अल्पायु पुत्रास शिवकल्याणांनी दीर्घायु केले. त्यामुळे सहजबोधांच्या समाधी उत्सवासाठी कित्येक चाहुर जमीन सरकारांतून इनाम मिळाली. शिवकल्याण श्रावण वद्य अष्टमीस निर्याण पावले. त्यांचे पुत्र आनंदबोध उर्फ उद्बोध होत. उद्बोधाचे रंगाख्य किंवा रंगबोध नामक एक कीर्तिवंत पुत्र झाले. रंगबोधाचे पुत्र शिवराम होत. यांची पत्नी वेणुबाई ही महान पतिव्रता होती. ही पतीबरोबर सति गेली. सहजबोधांच्या वंशजाच्या घराच्या पाठीमागे शिवराम वेणुबाईची समाधि आहे. मामासाहेब

नामक एका अधिकारी शिष्याचीहि समाधि तेथेच आहे. शिवरामाचे पुत्र गोविंद. त्यांचे पुत्र शिवकल्याण. शिवकल्याणाचे दिगंबर. त्यांचे पुत्र पुनः शिवकल्याण. शिवकल्याणाचे दिगंबर. अशी ही वंशपरंपरा आहे. शेवटचे दिगंबर हे कुंभकर्णटाकळीला सहजबोधांचे आज विद्यमान वंशज आहेत.

कुंभकर्णटाकळी मठांत मुकुंदराज परंपरेची विशेष माहिती सांगणारे कोणी आढळून येत नाही. गुरुवंश परंपरेच्या कांही अशुद्ध श्लोक पंक्ति एका पदाच्या वहीत आढळल्या ती परंपरा अशी :–

आदिनाथ–कमलासन–नारद–सनकादिक महामूनि–दुर्वास–दत्तात्रय ....तेनेनकृपयालोके मुकुंदभारती मुनीः यानंतर नृसिंहभारती, विश्वनाथ व निजानंद योगी हीं नांवें येतात. मुकुंदमुनीना येथें भारती म्हटले आहे ते चिंत्य आहे. सहजबोधापासून पुढील नांवे वंशपरंपरेची आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नवभारत ऑगस्ट १९५९ च्या अंकांत मुकुंदराजावर जो लेख लिहिला आहे त्यांत मुकुंदराजांचा गुरूसंप्रदाय हा दत्तात्रेयोपासक अर्थात् अवधुत नामक सन्यासी सांप्रदाय असावा असा जो मुद्दा मांडला आहे त्यास वरील माहिती पोषक आहे. मुडलगी मठांतील रूक्मागंदानें शिवबोध पंचरत्नमालिका स्तोत्रांत "साक्षात् दत्त मुकुंदराजमुनी। तो जो आदि विद्वान्कवी। जेणे ग्रंथ विवेकसिंधु रचिला। तत्संप्रदायार्णवी ॥ या शब्दांत मुकुंदराजांना साक्षात् 'दत्त' असेंहि म्हटलें आहे. ज्ञानबोधाने "औधुत यतीवर्ये ज्ञानवैराग्यदायक हरियोगी" असें म्हटलें आहे आणि खुद्द मुकुंदराजांना विवेकसिंधूंत "म्हणौनि शिवादिगुरूपरियंत। ते जाणावे अवधुत। अमुर्त मुर्तिमंत। परब्रह्म जे॥ थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे शिवदिन केसरीनें सिद्धांतविजय या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें नाथ, दत्त, शांकर सर्व संप्रदायक्रम आदिनाथापासूनच निर्माण झाल्यामुळें आदिनाथ कैलासपति हेच सर्व सांप्रदायाचे आदिगुरु होत. "ऐसे अनंतक्रम जाण। श्रीआदिनाथापासून। म्हणोनि आदिगुरु पूर्ण कैलासपति."

सारांश मुकुंदराजांच्या साक्षात परंपरेचा मठ म्हणून सहजबोधांच्या कुंभकर्ण टाकळीचें महत्त्व विशेष आहे. मुकुंदराज परंपरेचा भारती मठ

समर्थापर्यंत अंबेजोगाईस होता हा उल्लेख या आधीं येऊन गेला आहे. हरिनाथ शिष्य सुरेंद्रभारती अंबानगरीचेंच आणि दुसरे शिष्य रघुनाथ हे गोदाकांठच्या रत्नेश्वर रामपुरीचे. प्रतिमुकुंदराज ज्यांना म्हणतात ते केशवस्वामी हे कल्याणी भागानगरचे व कल्ल्याणी एक्केहाळी, महागांव अपचंद ही मुकुंदराजपरंपरेची स्थानेंहि मराठवाड्यांतीलच. विवेकसिंधूंच्या धर्तीवर "विवेकभास्कर" नांवाचा ग्रंथ लिहिणारा केशवसांप्रदायी नागेश ऊर्फ नागेंद्र याज्ञवल्कि व त्याचा शिष्य बकाजी रंगनाथ नांदेडचे. शके १७१८ तील प्रस्तुत ग्रंथ नांदेडला लिहिला. याचा उल्लेख मागें आला आहे. अंभोरकडील सर्व मठ बकाजी रंगनाथ वऱ्हाडला गेल्यानंतरचे ही गोष्ट याआधी मांडलेली आहे.

मुलगडीमठ

मुकुंदराजांच्या परंपरेतील मुडलगी मठाचे मूळ पुरुष रंगबोध व त्यांचे वडील कोनेरीबोध हे दोघेहि सहजबोध स्वामींचे शिष्य होत. हेहि मूळ राहणार कुंभकर्ण टाकळीचेच. सहजबोधानी आज्ञा केल्यावरून रंगबोध हे लोकोद्धारा करतां गुरुच्या पादुका बरोबर घेऊन बाहेर पडले व दक्षिणेकडे जात असतांना "ये रे रंग्या" अशी त्यांना गुरूची हांक ऐकूं आली व सिद्धदर्शन झाले. ही घटना गोकाक कडील मुडलगी गांवाजवळ घडून आली. म्हणून ते तेथेच थांबले; व मठ करून राहिले. रंगबोध हे मोठे अधिकारी सत्पुरुष होते. त्यांचे सिद्धीचमत्कार व अनेक लीला गुरूनाथकृत देशिक चरित्रांत वर्णन केल्या आहेत. रंगबोधांच्या पत्नी ह्याहि मोठ्या साध्वी व सुविद्य होत्या. मुकुंदराज परंपरेत रंगबोधांचे नांव सुद्धा ठळक आहे. भागानगरकर केशवस्वामी या नांवाने प्रसिद्ध असणारे कल्याणीचे केशवस्वामी हे रंगबोधांचे शिष्य होत असे देशिक चारत्रांत म्हटले आहे. रंगबोधांची महाराष्ट्रांतील तत्कालीन संतमंडळांत चांगली प्रसिद्धी असावी. कुंभकर्ण टाकळीशी प्रारंभी प्रारंभी तरी मुडलगी मठाचा संबंध असावा असे रंगबोधांच्या पत्रव्यवहारावरून वाटते.

रंगबोधांचे पुत्र अद्वयबोध होत. हे जनकाप्रमाणे विदेही व मोठे अधिकारी सत्पुरुष होते असें वर्णन आहे. अद्वयबोधाचे पुत्र शिवबोध पुढे रंगबोधनंतर शिवबोध, संगबोध व कल्मषबोध (विद्यमान) अशी वंशपरंपरा आहे. देशिक चरित्राचा कर्ता गुरुनाथ (शके १७०७) हा व संगबोध समकालीन होत. रंगबोध, अद्वयबोध यांनी व पुढील वंशजानी लिहिलेले अनेक ग्रंथ टीका व पदपदांतरे मुडलगी मठांत आहेत. विशेषतः मुकुंदराज-परंपरेवरील साहित्य मौलिक आहे. मुडलगी मठाची व परंपरेची जी मौलिक ओळख प्रा. पंडित आवळीकरानी करून दिली आहे ती मुळांतून पाहण्याजोगी आहे. देशिक चरित्रांत मुडलगी मठाची गुरुपरंपरा दिलीच आहे. ती अशी :— आदिनाथ ते श्री शंकराचार्य जगद्गुरु पुढे हरिनाथ →रघुनाथ →मुकुंदराज → जगन्नाथ, ॥ मग सहजबोध यथार्थ । वास टाकळीत गोदातीर ॥ तयाचे शिष्य रंगबोध इत्यादि.

जातां जातां एका प्रश्नाचा उल्लेख करावासा वाटतो. प्रा. आवळीकरानां हरिनाथ हे श्री शंकराचार्यांचे शिष्य असावेत असें वाटते. मुकुंदराज स्वतः शांकरमतानुयायी होते हें प्रसिद्ध आहे. त्यामुळें हरिनाथ, रघुनाथ, मुकुंदराज ही त्रयीहि शांकरमतानुयायी असणें संभवते. पण जुन्या परंपरेंतील नांवें बहूधा संपूर्ण नसतात. आठवली तितकी परंपरा दिलेली असते. शुकानंतर गौडपाद आले म्हणून गौडपाद जसे इ. स. च्या आरंभाच्या मागे जात नाहीत, त्याप्रमाणे श्री शंकराचार्यानंतर हरिनाथ आले म्हणून ते आठव्या शतकांत जात नाहीत. मुकुंदराजांनी हरिनाथाचे साक्षात शिष्य रघुनाथ व त्यांचे साक्षात शिष्य आपण असल्याचा विवेकसिंधूत उल्लेख केला आहे. हरिनाथांचा काळ मुकुंदराजांच्या फार मागे जात नाही. उलट मुकुंदराजांनी हरिनाथांना पाहिले असावे असा तर्क करण्यास जागा आहे.

कुंभकर्णटाकळी व मुडलगी मठाच्या नव्यानें उजेडांत येत अडणाऱ्या या परंपरा हरिनाथ, मुकुंदराज हे अंबेजागाईचे याविषयीं विद्वानांचे समाधान करण्यास उपोद्बलक साह्यकर्त्या ठरतील अशी आशा आहे. या माहितीनें हरिनाथ मुकुंदराजांच्या मराठवाड्यांतील साक्षात परंपरेवरच प्रकाश पडला गेला आहे असें नसून पर्यायानें स्थल निर्णयाच्या प्रश्नावरहि महत्त्वाचा प्रकाश पडत आहे.

३. परिशिष्ट

मुकुंदराज व जैत्रपाळ; काळ

मुकुंदराजांच्या स्थलनिर्णयाचा प्रश्न सोडविण्याच्या मार्गावर जसे आपण निश्चितपणें येऊन पोंचलों; तसा प्रकार कालनिर्णयाचा नाही. भिन्नभिन्न मतांमुळें व योग्य माहितीच्या अभावी कालनिर्णयासहि फाटे फुटत आहेत. बहुतेक विद्वानांचा कल मुकुंदराज हे मराठी भाषेचे आदिकवि होते व ते ज्ञानेश्वर पूर्वकाळांत होऊन गेले असा आहे. विवेकसिंधूच्या शेवटीं शके 'अकराशे दाहोत्तरू। साधारण नाम संवत्सरू। तैं राजा शारंगधरू। राज्य करी॥ अशा अर्थाची ओवी क्वचितच सांपडते. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी आपल्या विवेकसिंधुच्या चिकित्सक आवृत्तिसाठीं ज्या सुमारे ९५ पोथ्या गोळा केल्या त्यांपैकीं शके १६७८ मधील 'छ' प्रत आणि शके १७९९ मधील 'रा' प्रत या दोन प्रति वजा जाता इतर कोठल्याहि प्रतीत कालनिर्णयाच्या ओव्या नाहींत. त्यांतल्या त्यांत जुन्या असणाऱ्या "छ" प्रतींत उपरोक्त ओव्या ग्रंथपूर्ण झाल्यानंतर काकपद घालून बाजूला लिहिलेल्या आढळतात. उरलेल्या सर्व प्रतींत कालनिर्णयाची ओवी लुप्त आहे. यामुळे प्रस्तुत ओवी प्रक्षिप्त किंवा अपवादात्मक मानण्याखेरीज दुसरा मार्ग उरत नाही. मुकुंदराजांचा काळ ठरविण्याचा दुसरा प्रयत्न राजा जयत्रपाळाचा काळ ठरवून त्या आधारें मुकुंदराजावर प्रकाश टाकतां आल्यास पाहणें हा होऊं शकेल. पण समकालीन पुराव्याच्या व माहितीच्या अभावी स्वतः राजा जैत्रपाळच स्थलकालाच्या बाबतीत संदिग्ध आहे. त्यामुळे याहि मार्गाने कालनिश्चिति होऊं शकत नाही. तिसरा मार्ग हरिनाथ, रघुनाथ किंवा सुरेंद्रभारती यांपैकी कुणाचातरी काळ निश्चित करून त्यां आधारे मुकुंदराजाकडे पाहणें हा होऊं शकेल, पण हाहि दुबा कच्चा आहे.

अनुक्रमांक ११३९६५६५ वि: ... क्रमांक ...१३५६... नो दि. २८/१...

एवंच उपलब्ध पुराव्याचा विचार करतां मुकुंदराजांच्या कालनिर्णयासंबंधी निश्चित कांहीं सांगणे कठीण आहे; हें नाकारतां येणार नाही.

"शके अकराशे दाहोत्तरूं" ही ओवी जरी प्रक्षिप्त किंवा अपवादात्मक असली तरी तिला बहुमताचा व परंपरेचा फार मोठा आधार आहे. दीर्घकालापासून मुकुंदराज हे मराठीचे आदिकवि व ते ज्ञानेश्वर पूर्वकालांत होऊन गेले हें मत सुप्रतिष्ठित आहे. या मताच्या विरुद्ध जाणारा निर्णायक पुरावा जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत पुराव्याचा जरी नसला तरी परंपरेचा आधार असणारा मुद्दा अग्राह्य ठरविण्यास फारसें महत्त्वाचें असें कारण दिसत नाही. महिपति, उद्धवसुत, आत्माराम वगैरे संतकवींनी मुकुंदराजांच्या संदर्भात जी "मलयगंधर्व" कथा दिली आहे तिचा रोख मुकुंदराज हे ज्ञानेश्वरपूर्वकाळी होऊन गेले असा आहे.

भाषेच्या अर्वाचीनीकरणामुळें अलिकडे कांहीं विद्वानांना मुकुंदराजांना ज्ञानेश्वर उत्तरकालांत शक्यतर एकनाथ उत्तरकालांत ओढण्याचा मोह होऊं लागला आहे. प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनी "चित्रमयजगत" १९५९ च्या दिवाळी अंकांत अलीकडे एक लेख लिहिला आहे. त्यांच्या मतें संस्कृत "विवेकसिंधु हा ग्रंथ प्राचीन असून त्या मानाने मराठींत विवेकसिंधूचें अनुवादन अर्वाचीन आहे. आणि हें मराठीकरणाचें कार्य एकनाथ उत्तरकालीन असणारा एकनाथ शिष्य मुकुंदराज याचें आहे. आपलें मत प्रस्थापित करण्यासाठीं श्री. बेंद्रे यांनी पुष्कळच कौशल्य व्यक्त केलें आहे. पण संस्कृत विवेकसिंधु म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या महाभाष्यांतच अमल मुकुंदमुनींनी महाराष्ट्र वाणींत मूळ विगुंफन केल्याचा उल्लेख आहे. त्यामुळें संस्कृत विवकसिंधु व मराठी विवेकसिंधु असल्यास दोन्हींही एकनाथ उत्तरकालीन असतील, नसल्यास दोन्हींही एकनाथ पूर्वकालीन असतील. दोन मुकुंदराज कल्पून मुकुंदमुनीना फोडण्याचे कांहीं कारण दिसत नाही. विवेकसिंधूचा गुरुचरित्रावर झालेला परिणाम लक्षांत घेतां मुकुंदराज निश्चितपणे एकनाथ पूर्वकालीन कवि असले पाहिजेत हें कळतें. एकनाथांच्याहि आधी होऊन गेलेल्या दगडो शिवदास नामक कवीच्या "निर्वाणसार" या ग्रंथाची एक त्रुटित प्रत आमच्या संग्रही आहे. या दगडो शिवदासानें

मुकुंदराजाचा, विवेकसिंधुचा व राजा जैत्रपालाचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे आणि या ग्रंथावर विवेकसिंधूच्या भाषेची व विषय विवेचनाची विलक्षण छाप आहे. शके १४४० ते १४७० या काळांत होऊन गेलेल्या मृत्युंजय कवीला, मुकुंदराज हे पूर्वकालीन कवि म्हणून ज्ञात आहेत. "मुकुंदराज ज्ञानेश्वर । प्रमुख देशभाषाकार । अशा शब्दांत नाथ कालीन संतकवींनी प्रमुख देशभाषाकार म्हणून मुकुंदराज ज्ञानेश्वरांचा बरोबरीने उल्लेख केला आहे. मुकुंदराज हे आदि कवि असल्याची अशी अनेक संतवचनें उद्धृत करतां येतील. हें सगळें पाहतांना मुकुंदराजांना तर्काची अगर विवेचनाची कुठलीहि दोरी एकनाथ उत्तरकाली ओढूं शकत नाही असें निश्चित वाटते. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी दीर्घ परिश्रमाने विवेकसिंधूची ज्या चिकित्सक आवृतींत सिद्ध केलें आहे; तिच्या प्रस्तावनेंतच विवेकसिंधुचें व्याकरणिक स्वरूप किती प्राचीन आहे याचा पुरावा त्यांनी दिला आहे.

नांदेडचे एक होतकरु लेखक श्री. भुजंग वाडीकर यांनी प्रतिष्ठान मासिकाच्या मे १९५९ या अंकात एक लेख लिहिला आहे. या लेखांत मुकुंदराजांना ज्ञानेश्वरांच्या उत्तरकालीं पण सर्वदर्शन संग्राहाच्या पूर्वकाली म्हणजेच एकनाथ पूर्वकालीं ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मतें "राऊळ" "महात्मा" "मार्ग" या सारखे अनेक शब्द मुकुंदराजांनी ज्ञानेश्वरांना ज्ञात नसणाऱ्या अर्थांनी वापरले आहेत. आणि महानुभाव धर्माच्या चळवळीने निर्माण झालेले त्या शब्दांचे विशिष्ट अर्थ मुकुंदराजांना अभिप्रेत आहेत. उदाहरणार्थ. "राऊळ" हा शब्द राजाला उद्देशून वापरणें निराळे आणि गुरूला उद्देशून वापरणें निराळे. राऊळ म्हणजे गुरु ही पद्धति महानुभावांची. महानुभावांनी जर भाषेच्या नित्य वापरांतून असें अर्थ उचलले असते तर ते ज्ञानेश्वरांना ज्ञात असते. पण ज्ञानेश्वरांना 'राऊळ' म्हणजे गुरु हे ज्ञात नाही. मुकुंदराजांना हा अर्थ माहित आहे; व त्यांनी या अर्थाने 'राऊळ' शब्द ज्ञानेश्वरोत्तर महानुभाव वापरांतून उचलला असावा. श्री. वाडीकर यांची ही चिकित्सा बरीच फसवी आहे. विशेषतः ज्या ग्रंथावरून अर्वाचीनीकरणाचा प्रवाह ओघळून गेला आहे, त्या ग्रंथाच्या उपलब्ध

भाषिक वैशिष्ट्यांवरून मूळ ग्रंथकाराचा काळ ठरविणे फारसे समाधानकारक वाटत नाही. श्री. वाडीकरांना मुकुंदराजांनी अस्पष्टपणे ज्ञानेश्वराचा उलेख केला असावा असें वाटते. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत नवरसाचे उपलवर्णे असूं नये असा तो उल्लेख आहे. १.१७–१८–१९. वि. सिं. श्री. वाडीकरांच्या मते मुकुंदराजांनी ज्ञानेश्वरांना एक कोपरखळी मारली असावी. पण अंदाजच करावयाचा तर ज्ञानेश्वरींतहि मुकुंदराजांचा अस्पष्ट उल्लेख दाखविता येइल. पहा ज्ञानेश्वरी ६–११. तेव्हां याहि मुद्याला फारसे महत्व देतां येणार नाही. वाडीकरांनी सर्वांत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे; तो तिसरा. त्यांचे म्हणणें, माया ही ब्रह्माची उपाधि आणि अविद्या ही जीवाची उपाधि, असा अविद्या मायेंतील भेद तत्त्वज्ञानांत अति उत्तरकालीं सुचविण्यांत आला आहे. हा भेद प्रथमतः ज्या कुणी टाकला असेल तो माणुस मध्वाचार्यांना उत्तरकालीन आहे. कारण मध्वाचार्यांत या भेदाची जाणीव नाही. त्यामुळे मुकुंदराज मध्वाचार्योत्तर असले पाहिजेंत. वाडीकर एक गोष्ट विसरतात ती ही कीं एखादा विचार मुकुंदराजांनाहि प्रथमतः सुचूं शकतो. एवंच मुकुंदराजांना ज्ञानदेव उत्तरकालीन मानण्याचा निश्चित पुरावा अजून पुढें आलेला नाही.

श्री. वाडीकर यांच्या लेखाचा जरी प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी तकतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नवभारत १९५९ च्या अंकात मुकुंदराजांच्या विवेकसिंधुवर जो लेख लिहिला आहे, त्यांत शांकर तत्वज्ञान हेंच मुकुंदराजांना कसें अभिप्रेत होतें यार्चे मार्मिक व सविस्तर विवेचन केलें आहे. "मराठी भाषेच्या वेषांतला शांकरमठांतला सुबोध वेदांत पाठ म्हणजेच विवेकसिंधु होय. हें संन्यास–योगाचें वातावरण मुकुंदराजांचे ज्ञानदेव पूर्व युगांतील मानसिक वास्तव्य सूचित करतें." यावरून आचार्यांच्या अद्वैत तत्वज्ञानाचे मुकुंदराज हे मराठीतील पहिले प्रवक्ते असें म्हणण्यास कांहीं हरकत नाही.

मुकुंदराजांच्या कालनिर्णयाच्या बाबतींत अलीकडे मेघचंद्रकृत 'यक्षदेव अम्नायांतील माहितीचा आधार घेतला जातो. हा ग्रंथ शके १६६१ चा. या ग्रंथांत हरिनाथ, रघुनाथ, मुकुंदराज ही गुरूत्रयी व नृसिंह, बल्लाळ व जयत्रपाळ ही राजत्रयी याविषयी कांहीं माहिती आढळते. शिवाय काल-

निदर्शक ओवींतील राजा शारंगधर, जैयत्रपाळाचा पुतण्या होऊन आला आहे. मुकुंदराज व जैत्रपाल हे एकाच कुळांतील म्हटले आहेत. पण जैत्रपाळाचे वडील व आजे मुकुंदराजांचे जवळचे नातेवाईक असते तर जैत्रपाळाचा उल्लेख विवेकसिंधूत करतांना मुकुंदराजांनी आपणहि त्याच कुळांतील आहों हे सांगणें टाळलें नसतें. या यक्षदेव अम्नाय कर्त्याने हरिनाथ शिष्य नागार्जुन उर्फ नागेंद्र यास प्रसिद्ध महानुभाव आचार्य नागदेवाचार्य बनविलें आहे. मुकुंदराज यांचा वृद्धापकाळांतील विवेकसिंधु ग्रंथ शके १११० चा. व स्वतः नागदेवाचार्य यांचा जन्म शके ११६२ चा ही संगति कशी जुळणार ? या ग्रंथांतील माहिती ग्रंथकाराने कोठून घेतली तें कळत नाही. तिची विश्वसनीयता बरीच कमी आहे. कालनिदर्शक ओवींतील शारंगधर ज्या ग्रंथाने जयत्रपाळाचा राजकीय वारस बनविला त्या ग्रंथाचा पुरावा म्हणून किंमत अजून ठरवावयाची आहे. आमच्या मतें हरिनाथाचा शिष्य प्रसिद्ध नागार्जुन हा नागदेवाचार्य नसून ज्ञानेश्वर पूर्वकालांतील कुणी नाथपंथी सिद्ध असावा. एका जुन्या संत नामावळीत त्याचा उल्लेख असा आहे. "नाथपंथी सिद्ध-गुरू ।... चरपट चौरंगी....अच्युत सारंगी । नागार्जून जगन्नाथ वेंगी । शरण पांडुरंग निंबागे ॥ गैनी, निवृत्ति ज्ञानेश्वर । सोपान मुक्ताबाई अवतार ।... इ. ज्ञानेश्वरांच्या म्हणून समजल्या गेलेल्या उत्तर गीता या टीकेंत गोरक्ष कोनेरी या नाथपंथी सिद्धाबरोबर नागार्जुनाचाहि उल्लेख आहे. तेव्हां नागपंथी नागार्जुन हा महानुभाव आचार्य नागदेवाचार्य खचित नव्हे. कलियुगांतील एक अवतारी पुरुष म्हणून हरिनाथांचा उल्लेख महानुभाव ग्रंथात आढळतो. पण हा एक आधार वगळला तर हरिनाथांनी नागार्जुन भटासी आचार्यत्व देऊन महात्म्य मार्ग प्रगट केला ही अन्वयसारांतील महानुभावांची माहिती नंतर जोडलेली वाटते. यक्षदेव अम्नायाच्या एका आरतींत मुकुंदराजाला निवृत्तिनाथाचा गुरू आणि ज्ञानेश्वराला हरिद्राचा गुरू करून टाकलें आहे. या माहितीतील घोटाळा कांही उलगडून सांगावयाची गरज नाही.

अशी ही सर्व परिस्थिती असल्यामुळे जोपर्यंत सबळ विरोधी पुरावा पुढे येत नाही तोपर्यंत आम्ही परंपरेप्रमाणे मुकुंदराजांना ज्ञानेश्वर पूर्वकाळांतील

मराठीचे आदि कवि मानतों व विवेकसिंधु हा ग्रंथ शके १११० च्या सुमाराचा असणे संभवनीय मानतों.

राजा जयत्रपाळ याच्या संबंधीची माहितीहि अस्पष्ट आहे. कोणी त्याला देवगिरीच्या यादव राजापैकी भिल्लमाचा मुलगा ठरविलें आहे. तर कुणी द्वारसमुद्राच्या होयसाळ परंपरेंत नृसिंह, बल्लाळ, जैत्रपाळ ही राजत्रयी नेऊन बसविली आहे. काकतीय गणपतीदेव याचा मांडलिक मनुमसिद्धी, याचा समकालीन तेलगु ग्रंथकार तिक्कना याच्या ग्रंथात "महाराष्ट्र सामंत सारंगु" याचा उल्लेख आला आहे. गणपति देव काकतीय याचा काल इ. स. १११९ हा आहे. सदरहू सारंग जोपर्यंत महाराष्ट्रांतील शिलालेख, ताम्रपत्रांनें सिद्ध होत नाही तोवर जमेस धरता येत नाही. कलचुरी घराण्याचा एक मांडलिक राजा जैत्रपाल हा जैन धर्मी असून त्याची राजधानी जोगाईआंबे होती असा उल्लेख जेम्सबर्जेसने आपल्या ग्रंथांत केला आहे. पण पुरावा दिलेला नाही.

"Ambe Jogai was the seat of Jaitrapal, one of the great feudatories of the Kalyan Kingdom. It is said that of this family there were originally five brothers from whom descended the Pancham Jainas of whom 80,000 became Proselytes to Basav and are now the Pacham Lingayat."

(अर्केलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया खंड ३ रा पृष्ट ४९)

मुकुंदराजांनी ज्या काळांत विवेकसिंधु लिहिला तो काळ व लिंगायत पंथाच्या स्थापनेचा काळ यांत फारसें अंतर नाही. याच काळांत जैनधर्मास ओहटी आपलेकडे लागत होती. योगेश्वरी महात्म्यांतील जयत्रपाळ जैन असल्याचा उल्लेख खरा असल्याचा संभव आहे. आहे या अवस्थेत जो काळ मुकुंदराजांचा तोच जयत्रपाळाचा. व दोघांचाहि काळ ज्ञानेश्वरापूर्वीचा असें स्थुलमानाने मानण्यास हरकती नाही.

परिशिष्ट क्रमांक ४

श्री. रामचंद्र विठ्ठल बोबडे यांचा विवेकसिंधु

मुकुंदराजांच्या स्थल–काल विषयक वादांत माननीय श्री. बाबा बोबडे यांचें स्थान सर्व विलक्षण आहे. आम्ही ज्या कागदपत्रांविषयीं तें बनावट असावेत असें मत नोंदविलें आहे त्या कळमेश्वर मंदिरांतील कागदपत्रांचे व मुरहरी बाबांच्या अभंगांचे संशोधक श्री. रा. वि. बोबडे हेच होत. आणि विवेकसिंधूच्या ज्या प्रतीचे परीक्षण प्रस्तुत आहे तिचे संशोधक सुद्धा बोबडे हेच आहेत. श्री. बोबडे यांनाच ही कागदपत्रें सांपडावी हा योगायोगहि गमतीचा समजावा लागेल. सदर विवेकसिंधूची प्रत बोबडे यांनी १९६० साली प्रकाशित केली आहे. त्यांच्या मतें, त्यांनी प्रकाशित केलेली प्रत शके ११२२ मधील म्हणजे मुकुंदराजांनी विवेकसिंधु लिहिला त्यानंतर अवघ्या बारा वर्षांनी कृष्णभट रामभट पंडित राहणार वन्नर तापीतीर यांनी नकलेली आहे. जर हें त्यांचें म्हणणें खरें असेल तर सदर हस्तलिखित उपलब्ध सर्वांत जुनें हस्तलिखित आणि सदर प्रत विवेकसिंधूची सर्वांत विश्वसनीय प्रत म्हणावी लागेल. आमच्या मतें या प्रतींतील कांही ओव्या कळमेश्वर मंदिराचें कागदपत्र निर्माण झाल्याच्या नंतरच्या असून उरलेली प्रत अगदी अलीकडील आहे.

सदर प्रत इ. स. १९५८ ला मुलतापी येथे एका साधुकडून श्री. बोबडे यांना उपलब्ध झाली. ती बोबडे यांनी स्वतः नकलून घेतलेली आहे. मूळ प्रतीची शेवटची दोन पाने बोबडे यांच्या जवळ उपलब्ध असून त्यांनी त्या पानांचे छाप आपल्या प्रतींत उद्धृत केलें आहेत. बोबडे यांना साक्षात्कार होत असतात. गुप्त होणारे साधू भेटत असतात. एकदां तर प्रत्यक्ष मुकुंदराजांनीच त्यांना दर्शन दिलें; व संशोधनांत मार्गदर्शन केलें. तेंव्हा अशा एका 'अधिकारी' पुरुषाने संपादित केलेली ही प्रत तपासून घेतली पाहिजे. श्री.

अनुक्रमांक 31666 वि: 1907
क्रमांक 7345 नों: दि: 25-12-

बोबडे यांनी जीं पानें मूळ प्रतीतील म्हणून त्यांचीं छायाचित्रें उध्दृत केलीं आहेत त्या पानांची अक्षर वाटिका अलीकडील आहे. विवेकसिंधूच्या चिकित्सक आवृत्तीसाठीं प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनी वापरलेली जी विवेकसिंधूची 'ना' प्रत आहे तींतील लेखनसुद्धा सदर बोबडीय प्रतीच्या पेक्षा जुने दिसतें. आणि 'घ' प्रत इ. स. च्या पंधराव्या शतकाच्या मागे जाणार नाही असें आमचें मत आहे. दोन पानांच्या छायाचित्रांचा असा निकाल लागला. उरलेला ग्रंथ तर बोबडे, यांच्या हस्ताक्षरांतील आहे. तेव्हां सदर प्रत संशोधित करणारे बोबडे त्यांचें कौतुक करणारे नामदार अगे, प्रा. डोळके, प्रा. भा. श्री. परांजपे यांच्या विषयीं काय म्हणावें हें सांगतां येणें कठीण आहे.

प्रा. डोळके यांनी ही प्रत शके ११२२ मध्यें लिहीलेल्या प्रतीची कालांतराने नकललेली प्रत असूं शकेल असें मोघम उडवाउडवीचें समर्थन प्रस्तावनेंत केलें आहे. विवेकसिंधूच्या सर्वच उपलब्ध प्रती त्या आधीच्या प्रतीवरून नकललेल्या आहेत. आणि आधीच्या प्रती, त्या आधीच्या प्रतीवरून नकललेल्या आहेत. म्हणजे उपलब्ध सर्वच प्रती १११० तील विवेकसिंधूच्या कालांतराने नकलेल्या प्रती आहेत. या भूमिकेंत फारसा मोठेपणा नाही. प्रा. डोळके यांनी प्रामाणिकपणें बोबडे यांच्या सदर प्रतीच्या म्हणजेच 'मूलतापी' हस्तलिखिताच्या काळाविषयीं निश्चित विधान करावयाला हवें होतें. डोळके म्हणतात– बोबडे यांच्या प्रतींत सर्वत्र आज अ-कारान्त असणारी पुल्लिंगी नामें अ–कारान्तच आहेत. ज्ञानेश्वरीय अगर महानुभावीय ग्रंथाप्रमाणें उ–कारान्त किंवा ओ–कारान्त नाहीत. कदाचित् हा फरक स्थानिक फरक असावा. आमच्या मतें असें विधान करण्यापूर्वी विदर्भातील जुन्या मराठी हस्तलिखितांचा जर थोडासा आधार डोळके यांनी दिला असता तर बरें झालें असतें. एवंच प्रा. डोळके यांची सर्व प्रस्तावना उडवाउडवीची व नाइलाजाची अशी दिसते अर्थातच याचें कारण आम्हाला समजूं शकलें नाही.

आमच्या मतें सदर प्रत अगदीच अलीकडील आहे. हा मुद्दा तीन पुराव्यावर निकालांत निघणारा आहे. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी विवेक-सिंधूच्या चिकित्सक आवृत्तीसाठी जो सुमारें शंभर प्रतींचा अभ्यास केलल

आहे; व विवेकसिंधूच्या उपलब्ध हस्तलिखितांचा जो वंशवृक्ष दिलेला आहे त्या प्रमाणें पाहतां उपलब्ध प्रतींत 'ग', 'घ' आणि 'पं' या प्रती मुळाशीं जास्तींत जास्त जवळ आहेत. पैकी 'ग' प्रत शके १५९२ ची, 'घ' प्रत शके सोळाशेच्या केव्हांतरी नंतरची आणि 'पं' प्रत बरीच नंतरची अशी आहे. जर बोबडे यांची 'मूलतापी' प्रत शके ११२२ ची असेल तर वंशवृक्षांत तिचें स्थान 'ग' 'घ' आणि 'पं' यांच्या वर सिद्ध करतां आलें पाहिजे. आम्ही या वंशवृक्षाशी बोबडे यांच्या प्रतीचा ताळा जुळवून पाहतां ही प्रत शके १६७८ च्या 'छ' प्रतीच्या थोडी मागेपुढे जाणारी अशी आढळली. चिकित्सक विवेकसिंधूंत असलेल्या वंशवृक्षाशी तुलना करून या प्रतीचें प्राचीनत्व बोबडे यांनी अगर त्यांची भलावण करणाऱ्यानी सिद्ध करून दाखवावें अशी आमची विनंति आहे. सदर प्रतींत अकारान्त पुल्लिंगी नामें अ–कारान्त आहेत. उ–कारान्त अगर ओ–कारान्त नाहीत अेवढाच फरक नाहीं; अितरहि सर्व प्रकारची अर्वाचीनता सदर प्रतींत दिसते. चिकित्सक आवृत्तींत अं. १–४४ मध्यें 'हरूष' असा शब्द आहे. बोबडे यांच्या प्रतींत हा शब्द 'हर्ष' असा आहे. अ. १.२३ व २४ चिकित्सक प्रतींत म्हणौनि, देयावे, कींजैल, बोलिजैल, आइकतु, महानुभावे असें शब्द आले आहेत. बोबडे प्रतींत म्हणोनि, कींजेल, बोलिजेल, ऐकोत, महानुभाव असे शब्द आले आहेत. प्रा. कृ. पं. कुळकर्णी यांनी विवेकसिंधूचें प्राचीनत्व ठरविण्यासाठीं आपल्या आवृत्तीच्या प्रस्तावना पृष्ठ ७७ तें ७९ जो पुरावा दिला आहे त्यांतील कांहीहि बोबडे यांच्या प्रतीला लागूं पडत नाहीं. हा केवळ स्थानिक फरक आहे असें जर डोळके म्हणणार असतील; तर त्याचा अर्थ सर्व महाराष्ट्रांत मराठी भाषा ज्या स्वरूपांत शकाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत होती त्याच स्वरूपांत केवळ स्थानिक बद्दल म्हणून विदर्भांत वाराव्या शतकाच्या पूर्वार्धांत होती असें म्हणावें लागेल. विदर्भस्थ संशोधकांच्या विषयीं आमच्या मनांत अतीव आदर आहे. त्यांच्यांतील एखादा ज्येष्ठ संशोधक असें म्हणण्याची आम्ही वाट पाहत आहों. याहि पेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे विवेक सिंधूंतील सतरावें प्रकरणहि आहे. विवेक-सिंधूच्या ज्या अतिप्राचीन प्रती उपलब्ध आहेत त्यांत उत्तरार्ध असणाऱ्या

व कालोल्लेख असणाऱ्या प्रती तीन आहेत. ज्यांना प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी 'क' 'ख' 'ग' हीं नांवें दिलेलीं आहेत व त्यांचा काळ अनुक्रमें शके १५७७-७८-९२ असा आहे. सदर प्रती पैकी 'क' प्रतीत विवेकसिंधूंतील प्रकरण १७ (ब) नाही. प्रकरण १७(अ), ३५ ओव्यांचे आहे. 'ख' प्रतींत १७ (ब) नाही. १७ (अ), ३६ ओव्यांचे आहे. 'ग' प्रतींत प्रकरण १७ अ आणि ब दान्हीहि नाहीत. प्रा. कृ. पां. कुळकर्णी पूर्ण चिकित्सेअंति विवेकसिंधूंतील प्रकरण १७ अ, आणि ब दोन्ही प्रक्षिप्त आहेत या निर्णयावर येऊन पोंचले आहेत. 'पं' प्रतींत सुद्धा १७ वें प्रकरण अजिबात नाही. शके १७१० च्या 'झ' प्रतींत १७ वें प्रकरण नाही. प्रकरण १७ (ब) असें आहे ऊं कांही प्रतींत आढळतें; पण केवळ १७ (ब) जिच्यांत आहे अशी सर्वांत जुनी प्रत शके १६७८ ची 'छ' प्रत आहे. जर बोबडे यांची प्रत ११२२ ची असेल; तर तिच्यांत प्रकरण १७ वें नसलें पाहिजे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की, तींत प्रकरण १७ वें आहे व तेंहि सतरा (ब) आहे. म्हणजे वंशवृक्षांत बोबडे प्रत 'छ' प्रतीच्या मागेपुढे आहे. बोबडे यांच्या प्रतींत प्र. १७ (ब) चा आढळ ती प्रत शकाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील आहे याचा ठसठसीत पुरावा म्हणतां येईल. या खेरीज अजून एक गोष्ट विचारांत घेण्या जोगी आहे. विवेकसिंधूच्या कांही प्रतींत चौथ्या प्रकरणाच्या सहाव्या ओवी नंतर सात ओव्या प्राक्षिप्त आहेत, या प्रक्षिप्त सात ओव्यांचा जुन्यांत जुना आढळ शके १६७५ च्या 'च' प्रतींत होतो. प्रा. कृ. पां. कुळकर्ण्यांनी ह्या ओव्या प्रक्षिप्त ठरविल्या आहेत. या प्रक्षिप्त ओव्या श्री. बाबा बोबडे यांच्या प्रतींत प्र. ४ सात ते तेरा अशा आल्या आहेत. शके १६७५ नंतरचा प्रक्षिप्त फुगवटा ११२२ च्या प्रतींत कसा आला हाहि विचार करण्या जोगा प्रश्न आहे. चिकित्सक आवृत्तीच्या ११ व्या प्रकरणांत ओवी ४३ व ४४ प्रक्षिप्त आहेत. 'घ' आणि 'ङ' या प्रतींत या ओव्या नाहीत. पण बोबडे यांच्या प्रतीत त्या आहेत. १४ व्या प्रकरणीच्या आरंभी असणाऱ्या तीन प्रक्षिप्त ओव्या ज्या 'क' 'ख' 'ग' 'पां' इ. जुन्या प्रतीत नाहीत; पण बोबड्यांच्या प्रतीत आहेत याचाहि उलगडा व्हायला पाहिजे. वरील सर्व

बाबींचा साकल्याने विचार केला तर माननीय बाबाजी बोबडे यांनी साधूच्च हवाला देऊन जी प्रत ११२२ मधील ठरविली आहे ती १७ व्या शतकाच्य उत्तरार्धांतील आहे हें पटण्यास अडचण पड्डूं नयें.

याखेरीज एक अप्रिय कर्तव्य करणें प्राप्त आहे. तें म्हणजे या प्रतींत आढळणाऱ्या अजून कांही ओव्यांसंबंधीचें आहे. शके अकराशें दाहोत्तरूं । ही विवेकसिंधूच्या कालोल्लेखाची ओवी बोबडे प्रतींत आहे. सदर ओवी जुन्यांत जुनी अशी 'छ' प्रतींत सांपडते. याखेरीज रा२ या शके १७९९ च्या प्रतींतहि ती आहे. कोणत्याहि जुन्या पोथींत ती नाही. जोपर्यंत 'ग', 'घ', 'ङ' या प्रतीच्या मागे जाणारी विवेकसिंधूची प्रत सांपडत नाही व अशा मागे जाणाऱ्या प्रतींत कालोल्लेखाची ओवी आढळत नाही तोपर्यंत बोबडे यांच्या प्रतींतील कालोल्लेखाच्या ओवीला अर्थ नाही. याहिपेक्षा धार्ष्टय म्हणजे कळमेश्वर मंदिरांतील बनावट कागदपत्रांत जी माहिती आलेली आहे तिचा उल्लेख करणारी ओवी सदर बोबडे प्रतींत आहे. सदर ओवी म्हणजे– पंचम वर्षीं व्रतबंधन । करी सत्यनारायण । नंतर वेदाध्ययन । पठण होय गुरुगृहीं ॥ उत्तरार्ध ११.४३ सदर ओवी चार चरणी आहे; व ती हरिनाथाचा पिता कुणी सत्यनारायण होता हें सांगणारी आहे. बोबडे यांची प्रत वजा जाता कुळकर्ण्यांनी अभ्यासिलेल्या १०० प्रतींत ही ओवी कुठेंहि नाही. याचा उघड अर्थ ज्यांनी कळमेश्वर मंदिरांतील बनावट कागदपत्र बनविलें त्यांनी विवेकसिंधूंत हा प्रक्षेप केला असें म्हटलें पाहिजे. माननीय बोबडे यांच्या विषयीं अनादर न दाखवितांहि सदर ओवीच्या प्रक्षिप्तपणाचा उगम शोधतां येईल. हाच प्रकार शेवटच्या अध्यायाच्या ओवी क्रमांक १३७ तें १४४ चा म्हणतां येईल. बोबडे यांच्या प्रतीचा लेखक कृष्णभट्ट रामभट्ट याच्याशी संबंधित असणाऱ्या १४२ ते १४४ या ओव्या जरी सोडल्या तरी बोबडे यांचें जें संशोधन तें म्हणजे "शक शालिवाहनाचा, शकनाम विक्रम संवताचे" याला पाठिंबा देणाऱ्या ओव्या याच प्रतींत कां आढळाव्या हें गूढ आहे. हरिनाथाचा शिष्य रामचंद्र, सुरेंद्र भारती हा रामचंद्राचा गुरू बंधू आणि हरिनाथाचा मुख्य शिष्य मुकुंदराज हे रामचंद्राचे शिष्य. त्यांच्या अति म्हातारपणीं जो ग्रंथ मुकुंदराजांनी लिहिला त्याला सुरेंद्र भारती लेखक कसा

वणार ? सुरेंद्र भारती मानाने वडील आणि वयानेहि, जोंवर नक्की पुरावा येळत नाही तोवर मुकुंदराजांना वडीलच गृहित धरला पाहिजे. असो. या श्करणी अधिक लिहिण्याची गरज नाही.

प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ प्रा. कृ पां. कुळकर्णी यांच्या चिकित्सक आवृत्तीच्या उदयानंतर आणि त्या आवृत्तींत सिद्ध केलेल्या विवेकसिंधु प्रतींच्या शिववृक्षाच्या सिद्धीनंतर बनावटपणा पचणें फार कठीण झालें आहे. जो पर्यंत प्रेखादी प्रत ' ग ', ' ध ', ' पं ' यांच्या पूर्वजस्थानी जाऊन बसत नाही तो पर्यंत मुकुंदराजांच्या स्थल–काल निश्चितीला सर्व साक्षात्कार निरुपयोगी होत.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३१५८८ दिः ...
क्रमांक ...९३५६... नोंः दिः ...
२५-६



'गोदातीर इतिहाससंशोधन मंडळ' आगामी प्रकाशनें :-

१. रघुनाथ शेषकृत "कृष्णकौतुक लीला"
संपा. : वि. अं. कानोले

२. वामन पंडिताच्या चरित्राविषयीं कांहीं नवी माहिती
ले. : वि. अं. कानोले

३. मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचें उत्तरकांड
संपा. : वि. अं. कानोले

४. संशोधनपर लेख खंड पहिला
ले. : वि. अं. कानोले

५. अॅस्टॉनॉमिकल ओरिजीन ऑफ हिंदु ट्रिनिटी
ले. : भा. रं. कुळकर्णी

मंडळाचीं सर्व प्रकाशनें मॉडर्न बुक डेपो, नांदेड व लेखन-साहित्य भांडार, परभणी येथून अगर मंडळाकडून प्राप्त होऊं शकतील.